Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक १७१ * * नागपूर *
शुक्रवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२४
पुरवणीसह पाने ८
किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## शिंदे गटाचे 'महाविजय संवाद' अभियान

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६:**
आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने राज्यात आज, शुक्रवारपासून महाविजय संवाद अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यानुसार युवा सेना, महिला आघाडी आणि पक्षाचा सोशल मीडिया या तीन विभागाकडून महायुती सरकारच्या योजना , सरकारने गेल्या अडीच वर्षात केलेल्या कामांची माहिती पोहचवली जाणार आहे. तसेच या अभियानाच्या माध्यमातून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात येणार आहे.शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी गुरुवारी पक्ष कार्यालयात आयोजित या अभियानाची घोषणा केली.

अग्राग्रलेख **खरीखरी...**

## आघाड्या की बिघाड्या?

आपल्या महाराष्ट्रात लवकरच विधानसभेचे डिंडीम वाजणार आहे. त्यामुळे जे पक्ष आघाडीवर आहेत. त्यांच्या आघाड्या असणे स्वाभाविक आहे. पण आता सर्वच छोट्या-मोठ्या पक्ष धुरिणांना आघाड्या करून आपल्या प्रभावाची चाचणी घ्यायची आहे. प्रत्येकालाच आपल्या आपल्या शक्तीचा उपयोग करून घेण्यासाठी विधानसभेची निवडणूक म्हणजे एक पर्वणी असते. आपल्या महाराष्ट्रात महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात रस्सीखेच होईल असे म्हटले जात आहे. पण या दोन आघाड्यां व्यतिरिक्त इतर कितीतरी आघाड्या आपण आघाडीवर आहोत, असे सांगत आहेत. आज मुंबईत तिसऱ्या आघाडीचे शक्तीप्रदर्शन झाले. यात परंपरागत पक्षांची भक्ती सोडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आता नवीन परिवर्तनाची शक्ती म्हणून छत्रपती संभाजी राजे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी, प्रहार जनशक्तीचे बच्चू कडू, महाराष्ट्र राज्य समितीचे शंकरराव धोंडगे, स्वतंत्र भारत पक्षाचे म्हणजेच शरद जोशी यांच्या पक्षाचे वामनराव चटप अशा बड्या बड्या व्यक्तींनी एकजूट केलेली दिसत आहे. हे सर्व पक्ष अनेक ठिकाणी स्थानिक पातळीवर चांगलेच मजबूत आहेत. राजू शेट्टी खासदार म्हणून एकेकाळी निवडून आले होते. बच्चू कडू आजही आमदार आहेत. वामनराव चटपही आमदार होते. संभाजी राजे एक वलयांकित व्यक्तिमत्व आहे. म्हणजे ही आघाडी अगदीच किरकोळ आहे, असे समजण्याचे कारण नाही. त्याशिवाय प्रकाश आंबेडकर यांची वंचित आघाडी, राज साहेब ठाकरे यांचा मनसे पक्ष आणि आणखीही दोन-तीन पक्ष विधानसभा निवडणुकीच्या रणांगणात आहेतच. आता प्रश्न असा आहे की, सध्या देशात दोनच आघाड्या एक दुसऱ्या विरुद्ध शड्डू ठोकून उभ्या आहेत. त्यात भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस हे दोन पक्ष नेतृत्व करताना दिसतात. आघाडीच्या कार्यकर्त्यांना आपणच अमुक एका ठिकाणचे योग्य उमेदवार आहोत, असे वाटते. अनेक अपक्ष निवडून येत असतात. लोकसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार एका स्वतंत्र उमेदवाराकडून, म्हणजेच वसंतदादा पाटील यांच्या नातवाकडून पराभूत झाल्याचे आपण पाहिले. बच्चू कडू आपल्या मतदारसंघाचे राजे आहेत आणि एकेकाळी मनसेने पहिल्या झटक्यात आपले 13 आमदार निवडून आणले होते. पण दुसऱ्या निवडणुकीत त्यांना त्यांच्या पक्षाची ती प्रतिमा टिकवता आली नाही. अशा प्रकारे काही अपवाद सोडल्यास ज्या ज्या महत्त्वाच्या आघाड्या आहेत. त्याच्यात बिघाड्या कशा होतील आणि आपले कसे फावेल, असा विचार या आघाड्यातील अनेक पक्ष करू शकतात. तिकडे जरांगे पाटील तर आपले उपोषण सोडून आता सत्ताधारी होण्यासाठी तयार झालेले आहेत. लोकशाहीत प्रत्येकालाच निवडून येण्याचा अधिकार आहे. पण सत्ता मिळवणे वाटते तितके सोपे काम नाही. आता जात, धर्म याचाही उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे ज्या ज्या आघाड्या निवडणुकीच्या मैदानात उतरत आहेत. त्या सर्वांनाच आपल्या पक्षाच्या विजयाची खात्री असल्याशिवाय ते घोडा मैदानावर येतील असे वाटत नाही. जम्मू काश्मीर आणि हरियाणा या दोन राज्यात अशा प्रकारच्या अनेक आघाड्या निवडणूक रिंगणात आहेत. एखादेवेळी त्रिशंकू विधानसभा दिसली. तर या आघाडीवीरांचे फावते. पण आता देशात चक्क द्विपक्षीय राजवटीकडे जनतेचा कल दिसत आहे. त्यामुळेच या तिसऱ्या आघाड्यांची कलकल कशी यशस्वी होईल, असा प्रश्न सामान्य माणस-ासमोर उभा राहतो. शेवटी असे म्हणतात 'मतामतांचा गलबला, कोणी पुसेना कोणाला' गरज पडली म्हणजे वाटेल त्याचे पाय धरावे लागतात. जसे हरियाणामध्ये भाजपने गेल्या वेळी एका चौटाला यांना पकडून पाच वर्षे सत्ता राबविली आणि जेव्हा त्यांच्या मागण्या वाढल्या. तेव्हा दुसरी व्यवस्था करून त्यांचा चक्क पोपट केला. आताची महाराष्ट्राची निवडणूक मोठी मजेदार आहे. दोन मोठे पक्ष आणि दोन पक्षांचे दोन-दोन पक्ष असा षटरंगी सामना महाराष्ट्रात रंगणार आहे. या सामन्यासाठी दिल्लीपासून मुंबईपर्यंत अनेक योद्धे लढाईसाठी सज्ज आहेत. पण आता नशीब कुणाला फळते आणि जनता कुणाला पळवते, हे या आघाड्या-बिघाड्यांचे खेळाचे स्वरूप कसे राहील. यावर अवलंबून आहे. मोठ्या आघाड्या अपेक्षेप्रमाणे जिंकू शकल्या नाहीत. तर ज्यांना आपण बिघाड्या म्हणतो. त्यांच्यासमोरही पायघड्या घालाव्या लागतात. यावेळी हा लपंडाव कोणाला कसा सिद्ध होतो. हे पाहण्यातच खरी मजा आहे. जनतेचे सर्वांनाच भले करायचे आहे. पण आधी आपण आणि मग जनता हेच खरे सूत्र असते.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## काश्मिरातील ४० हजार हत्यांसाठी
# अब्दुल्ला व नेहरू जबाबदार

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. २६:**
गृहमंत्री अमित शहा आज जम्मू-काश्मीरमध्ये निवडणूक रॅली घेत आहेत. चेनानी आणि उधमपूरमध्ये त्यांनी लोकांना संबोधित केले. जम्मू-काश्मीरमधील ४० हजार लोकांच्या हत्येला अब्दुल्ला आणि नेहरू जबाबदार आहेत, असे ते म्हणाले.



फारुख अब्दुल्ला त्यावेळी कुठे होते? ते उन्हाळ्यात लंडनमध्ये सुट्टी घालवत होते आणि महागडी मोटारसायकल चालवत होते. केवळ भाजपने जम्मू-काश्मीरमधून दहशतवाद संपवल्याचा दावा शहा यांनी केला .

आपल्या देशाच्या संसदेवर हल्ला करणाऱ्या अफझल गुरूच्या फाशीच्या शिक्षेविरोधात हे लोक आंदोलन करत होते, असे शहा म्हणाले. अफजल गुरूला फाशी देऊ नये, असे ओमर अब्दुल्ला यांनी म्हटले होते. ओमर अब्दुल्ला साहेब, तुम्ही दहशतवाद्यांना बियाणी खाऊ घालता, पण तुम्ही पसरवलेल्या दहशतीला फाशीनेच उत्तर दिले जाईल, असा इशारा त्यांनी यावेळी भाषणातून दिला.

दहशतवादाला आम्ही अंडरवर्ल्डमध्ये गाडून टाकू. आज जम्मू-काश्मीरमध्ये तिरंगा अभिमानाने फडकवला जात आहे. त्यांना शेख अब्दुल्ला यांचा झेंडा परत आणायचा आहे. जम्मू-काश्मीरमध्ये फक्त आमचा तिरंगा फडकेल. आपण पाकिस्तानशी चर्चा करावी अशी त्यांची इच्छा आहे. दहशतवाद संपेपर्यंत आम्ही पाकिस्तानशी चर्चेच्या बाजूने नाही, असे शहा यांनी ठणकावून सांगितले.

त्यांना तुरुंगातून दहशतवाद्यांची सुटका करायची आहे, पण नरेंद्र मोदी सरकारने दहशतवादाला खूप खोलवर गाडले आहे. कोणत्याही दहशतवादी किंवा दगडफेकीची तुरुंगातून सुटका होणार नाही, पहाडी बंधू-भगिनींचे आरक्षण हक्क काँग्रेस, एनसी आणि पीडीपीने ७० वर्षे हिरावून घेतल्याचा आरोपही शहा यांनी केला.

# भाजपने खेळाडू संपवले

### हरियाणा निवडणूक प्रचारादरम्यान राहुल गांधींचा आरोप

■ **वृत्तसंस्था, कर्नाल, दि. २६:**
राहुल गांधी यांनी गुरुवारी असंध, कर्नाल येथे जाहीर सभेला संबोधित केले. ते म्हणाले की, भाजपने खेळाडूंना संपवले आहे. महिला कुस्तीपटूंचा लैंगिक छळ करणाऱ्यांना वाचवले.



भारताचे सरकार चालवणारे ९० लोक आहेत. त्यात फक्त ३ दलित आहेत. तिथे ४५ असायला हवेत. हा लढा हरियाणा वाचवण्यासाठी नसून भारत आणि संविधान वाचवण्यासाठी आहे. भाजपने सर्व संस्था आरएसएसच्या ताब्यात दिल्या. संपूर्ण नियंत्रण नागपूरचे असल्याचा आरोपही राहुल गांधी यांनी केला.

पुढे राहुल म्हणाले की, भाजपच्या १०-१५ लोकांना चिनी वस्तू विकायच्या आहेत. देशात काही बनवायचे नाही. त्यांनी हरियाणात २ लाख सरकारी नोकऱ्या आणि शेतकऱ्यांना एमएसपीची कायदेशीर हमी देण्याचे आश्वासन दिले.

या रॅलीत राहुल गांधींनी भूपेंद्र हुडा आणि कुमारी सेलजा यांना मंचावर एकत्र आणले. याआधी आठवडाभरापूर्वी राहुल गांधी सकाळी अचानक कर्नालला पोहोचले होते. जिथे त्यांनी परदेशात जखमी झालेल्या तरुणाच्या कुटुंबीयांशी चर्चा केली.

जिथे तुम्हाला माझी गरज असेल तिथे संसदेत आवाज उठवावा लागेल, मी खोटे बोलत नाही, हे मोदीजींचे काम आहे. आता हरियाणाला उभं राहावं लागणार आहे, कारण देवसारख्या रडणाऱ्या मुलांचे अश्रू पुसावे लागणार आहेत. त्यांना खूश केले पाहिजे, असेही ते म्हणाले.

## एक आमदार असलेल्या पक्षालाही
# मुख्यमंत्री व्हायला आवडेल



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २६:**
एक आमदार असलेल्या पक्षालाही राज्याचा मुख्यमंत्री व्हायला आवडेल, अशा मोजकी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले सहकारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मुख्यमंत्री होण्याच्या इच्छेवर व्यक्त केली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी एका वृत्तवाहिनीशी बोलताना आपली मुख्यमंत्री होण्याची महत्त्वकांक्षा व्यक्त केली होती. माझी मुख्यमंत्री होण्याची इच्छा आहे, पण माझी गाडी उपमुख्यमंत्रीपदाहून पुढे सरकतच नाही, मग मी काय करू, असे ते एका वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणालेत.

त्यांच्या या विधानाची राजकीय वतुर्ळात खमंग चर्चा रंगली आहे. त्यावर फडणवीस यांनी मत व्यक्त केले. ते म्हणाले, अजित पवार हे त्यांच्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यांच्या पक्षाचे अध्यक्ष आहेत. ते त्यांच्या पक्षाची भूमिका मांडू शकतात, पण मी महाराष्ट्र भाजपचा नेता आहे. आमच्या पक्षात मुख्यमंत्री कोण होणार? हे पक्षाचे संसदीय मंडळ ठरवते.

मी आधूनिक अभिमन्यू आहे. मला चक्रव्यूह तोडता येते, असे सांगत फडणवीस यांनी आघाडीवरही टीका केली.

## पीएम मोदींचा पुणे दौरा रद्द

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २६:**
पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार होते. मात्र, पुण्यातील पावसामुळे त्यांचा दौरा रद्द करण्यात आला आहे.

त्यांच्या हस्ते आज पुण्यात मेट्रोसह २२ हजार कोटींच्या कामांचा शुभारंभ होणार होता. पुण्यातील स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर सायंकाळी ६.३० वा. त्यांची सभा नियोजित होती. मात्र आता पावसामुळे त्यांचा दौरा रद्द करण्यात आला आहे. पुण्यासह मुंबई, नाशिक, कोकण, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात गुरुवारी दुपारपासून धुंवाधार पाऊस कोसळत आहे.

## अब्रूनुकसानीच्या खटल्यात संजय राऊत दोषी

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २६:**
उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या बाबतीत मोठी बातमी समोर आली आहे. मेधा किरीट सोमय्या यांनी दाखल केलेल्या अब्रूनुकसानीच्या दाब्यात माझगाव न्यायालयाने त्यांना १५ दिवसांची कैदेची शिक्षा सुनावली आहे.



तथापि, नंतर त्यांना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

शौचालय प्रकरणात संजय राऊत यांनी मेधा सोमय्या यांचे नाव घेत आरोप केले होते. त्यानंतर त्यांनी राऊत यांच्यावर अब्रूनुकसानीचा दावा केला होता. मागील दोन वर्षांपासून हे प्रकरण न्यायालयात सुरू होते. त्यावर आता न्यायालयाने हा निकाल दिला आहे.

या निकालाच्या काही वेळानंतर संजय राऊत यांना जामीन देण्यात आला.

## बिहारमध्ये ४३ जणांचा बुडून मृत्यू

■ **वृत्तसंस्था, पाटणा, दि. २६:**
बिहारमध्ये जिउतिया सणादरम्यान नदी आणि तलावात आंघोळ करताना झालेल्या अपघातात आतापर्यंत ४३ जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये ३७ मुले आणि ६ महिलांचा समावेश आहे. या सर्वांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. २४ आणि २५ सप्टेंबर रोजी हे अपघात झाले.

औरंगाबाद जिल्ह्यात सर्वाधिक १० मृत्यू झाले आहेत. येथे दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये ८ मुलांचा बुडून मृत्यू झाला. वेगवेगळ्या ठिकाणांहून आलेल्या वृत्तानुसार, मृतांचा आकडा वाढू शकतो. अजूनही अनेक लोक बेपत्ता आहेत. त्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.




## त्याने आम्हाला मारले असते...
# एन्काउंटरवर सफाई

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६:**
'आम्ही 23 सप्टेंबरला अक्षय शिंदेसोबत नवी मुंबईतील तळोजा कारागृहातून बदलापूरला जात होतो. मुंब्रा बायपास रोडवर अक्षयने सहायक निरीक्षक मोरे यांच्या कंबरेतून रिव्हॉल्व्हर काढले. आम्ही त्याच्याकडून रिव्हॉल्व्हर हिसकावण्याचा प्रयत्न केला.

या झटापटीत रिव्हॉल्वरने गोळीबार केला. गोळी मोरे यांच्या मांडीला लागली. अक्षयने आणखी दोन गोळ्या झाडल्या. सुदैवाने कुणालाही गोळी लागली नाही. यानंतर मी अक्षयवर गोळीबार केला.

दोन ४ वर्षांच्या मुलींच्या लैंगिक छळाचा आरोप असलेल्या अक्षय शिंदेचा एन्काउंटर करणाऱ्या टीममध्ये निरीक्षक संजय शिंदे हे सर्वात वरिष्ठ अधिकारी आहेत. अक्षयचे वडील अण्णा शिंदे हे चकमक बनावट असल्याचे सांगत मुंबई उच्च न्यायालयात गेले. इथेच कथेत ट्विस्ट आला.

अण्णा शिंदे यांच्या याचिकेवर हायकोर्टात 25 सप्टेंबर रोजी सुनावणी झाली. या घटनेला एन्काऊंटर मानता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले. आरोपीने अचानक रिव्हॉल्व्हर हिसकावून तीन राऊंड फायर केले ही गोष्ट समजण्यापलीकडची आहे. रिव्हॉल्व्हरचे लॉक कसे उघडले? अशा प्रश्नांची सरबत्ती न्यायालयाने केली. आता पोलीस प्रशासन आणि शासनाकडून याप्रकरणी सारवासारव केली जात आहे.

## गंज, कमकुवत फ्रेम, चुकीच्या वेल्डिंगमुळे
# छत्रपतींचा पुतळा कोसळला

### :चौकशी समितीचा १६ पानी अहवाल शासनाकडे सादर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६:**
मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा गेल्या महिन्यात कोसळला होता. याप्रकरणी सरकारने एक चौकशी समिती स्थापन केली होती.

पुतळा दुर्घटना प्रकरणी ३० दिवसात चौकशीचा अहवाल सादर करावा, असे आदेश या समितीला सरकारने दिले होते. पुतळा दुर्घटनेच्या एका महिन्यानंतर चौकशी समितीने १६ पानांचा अहवाल सरकारकडे सादर केला आहे. कमकुवत फ्रेम आणि पुतळ्यात गंज चढल्यामुळे हा पुतळा कोसळल्याचे अहवालात म्हटले आहे.

भारतीय नौदलाचा वीस वर्षांहून अधिक अनुभव असलेले कमोडोर पवन धिंग्रा यांच्या अध्यक्षतेखाली, पाच सदस्य समितीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते, बांधकाम विभागाचे माजी मुख्य अभियंता विकास रामगुडे, आयआयटीचे प्रा. जांगिड, प्रा. परिदा यांचा समावेश होता.

मालवण पुतळा दुर्घटना प्रकरणात चौकशी समितीने १६ पानांचा अहवाल शासनाकडे सादर केला आहे. पुतळ्यातील गंज, कमकुवत फ्रेम आणि चुकीच्या वेल्डिंग कामामुळे हा पुतळा कोसळल्याचे, या अहवालात म्हटले आहे. पुतळा उभारलेले फ्रेमवर्क तितके मजबूत नव्हते. तसेच देखभाल योग्य पद्धतीने झाली नसल्याने पुतळ्याला काही ठिकाणी गंज चढला होता, असेही या अहवालात म्हटले आहे.

**पुन्हा छत्रपतींचा पुतळा उभारणार**

सिंधुदुर्गातील मालवणमध्ये राजकोट किल्ल्यावर पुन्हा एकदा छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्याच्या हालचाली पुन्हा सुरु झाल्या आहेत. हा पुतळा उभारण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून २० कोटी रुपयांचे निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

## वारंवार निर्देश देऊनही सहकार्य नाही; मुळशीतील टाटांच्या जमिनी ताब्यात घ्या, अजित पवारांचे निर्देश

**पुणे, दि. २६ : प्रतिनिधी**

मुळशी धरण भागातील प्रकल्पग्रस्त नागरिकांना पिण्यासह सिंचनासाठी पाणी, दळणवळणाच्या सुविधा, विद्युत दाहिनी यांसारख्या सार्वजनिक पायाभूत सुविधा मिळण्याच्या दृष्टीने वारंवार निर्देश देऊनही टाटा पॉवरकडून सहकार्य मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे मुळशी धरण भागातील टाटा पॉवर कंपनीच्या वापरात नसलेल्या जमिनींचे सर्वेक्षण करून वर्षानुवर्षे पडीक असलेल्या जमिनी सरकारच्या ताब्यात घेण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विभागीय आयुक्तांना दिले आहेत.

मुळशी धरण भागातील नागरिकांच्या विविध मागण्यांबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि. २३) मंत्रालयात बैठक झाली. बैठकीस नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव व विकास आयुक्त डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, जलसंपदा (लाभक्षेत्र विकास) विभागाचे सचिव संजय बेलसरे, टाटा पॉवरच्या हायड्रो विभागाचे मुख्य अधिकारी प्रभाकर काळे, पुणे नियोजन समितीचे सदस्य अमित कंधारे, नंदकुमार वाळंज आदी उपस्थित होते. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

पवार म्हणाले, मुळशी प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेच्या टप्पा क्रमांक एक व दोनच्या कामांबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने गती द्यावी. या गावांसाठी मागील बैठकीत ०.२० टीएमसी एवढे अतिरिक्त पाणी मंजूर करण्यात आले होते. या कामात टाटा पॉवर कंपनीकडून सहकार्य मिळत नसल्यास पाणीपुरवठा विभागाने पोलिस विभागाची मदत घ्यावी. नागरिकांना पिण्यासाठी आणि शेतकऱ्यांना सिंचनासाठी वाढीव पाणी उपलब्ध होण्यासाठी यापूर्वीच्या बैठकीत धरणाची उंची १ मीटरने वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी टाटाची ८० टक्के आणि खासगी स्वरूपाची २० टक्के जमीन संपादन करावी लागणार आहे. त्यासाठी आवश्यक असणारे सर्वेक्षण महसूल विभागाने तातडीने सुरू करावे.

मुळशी जलाशयात पर्यटनास चालना मिळून स्थानिकांना रोजगार मिळण्यासाठी याठिकाणी जेट्टी उभारण्याची स्थानिकांची मागणी आहे. यासंदर्भात महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून तांत्रिक मंजुरी प्राप्त करून घेऊन तत्काळ कार्यवाही करावी. तोपर्यंत मुळशी धरण क्षेत्रातील नागरिकांच्या दळणवळणासाठी जिल्हा परिषदेने पर्यायी नौका उपलब्ध करून द्यावी. यासाठी टाटा पॉवरने तात्काळ 'ना हरकत प्रमाणपत्र' द्यावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

# उमेदवारीसाठी शेकाप-ठाकरे गटात चुरस

## उरण विधानसभा क्षेत्रात इच्छुक उमेदवारांचा प्रचार सुरू, काँग्रेसचाही दावा

**उरण, दि. २६ : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकांचे वारे वाहू लागले असून उरण विधानसभा मतदारसंघात आता महाविकास आघाडीचे घटक पक्ष असलेल्या शिवसेना(ठाकरे गट)व शेतकरी कामगार पक्ष यांच्यात चुरस वाढली आहे. या दोन्ही घटक पक्षांच्या इच्छुकांनी मतदारसंघात आपला स्वतंत्र प्रचार ही सुरू केला आहे. यात ठाकरे गटाचे माजी आ. मनोहर भोईर व शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते प्रीतम म्हात्रे यांनी आघाडी घेतली आहे.

या दोन्ही उमेदवारांनी महाविकास आघाडीकडून निवडणूक लढविणार असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत कोणाला संधी मिळणार याकडे लक्ष लागले आहे. उरण विधानसभा मतदारसंघात लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मताधिक्य मिळालेले आहे. त्यामुळे महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात थेट लढाई झाल्यास ही विधानसभा निवडणूक अत्यंत चुरशीची होण्याची शक्यता आहे. मात्र महाविकास आघाडीचे मुख्य घटक असलेल्या शिवसेना(ठाकरे गट), शेतकरी कामगार पक्ष व काँग्रेस या तिन्ही पक्षांनी दावा केला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप समर्थित अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे. तर शिवसेना (अखंड) दुसऱ्या क्रमांकावर होती.

त्याचप्रमाणे या मतदार संघात पहिला आमदार



देणारा शेतकरी कामगार पक्ष तिसऱ्या क्रमांकावर होता. मात्र यांच्या मतामधील अंतर कमी होते. त्यामुळे अस्तित्वाच्या या निवडणुकीत या पक्षाकडून दावे केले जात आहेत.

आपण महाविकास आघाडीच्या माध्यमातूनच ही निवडणूक लढविणार असून उमेदवारी संदर्भात जो निर्णय वरिष्ठ घेतील तो आपल्याला मान्य असेल असे मत माजी आ. मनोहर भोईर यांनी व्यक्त केले आहे. तर आपल्यावर शिंदे गटाशी संपर्क असल्याचा खोटा आरोप केला जात असून अखेरपर्यंत उद्धव ठाकरे यांच्याशी एकनिष्ठ राहणार असल्याचे स्पष्टीकरण त्यांनी केले आहे.

मी महाविकास आघाडीकडून इच्छुक आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचे नेते जो निर्णय घेतील त्यानंतर शेतकरी पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील जो आदेश देतील त्यानुसार पुढील दिशा ठरविण्यात येईल असे मत प्रीतम म्हात्रे यांनी व्यक्त केले आहे.

महाविकास आघाडीतील वाढत्या दावेदारीमुळे भाजपाला या निवडणुकीत लाभ होण्याची शक्यता आहे. २०१९ च्या निवडणुकीत आमदार महेश बालदी यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवून विजयी झाले आहेत. मात्र २०२४ च्या निवडणुकीत बालदी हे भाजपाचे उमेदवार असणार आहेत. महाविकास आघाडीत बिघाडी व्हावी यासाठी त्यांच्याकडूनही प्रयत्न सुरू आहेत. यामध्ये महाविकास आघाडीत फूट पडून दोन उमेदवार उभे राहिल्यास ही निवडणूक भाजपसाठी फायद्याची ठरणार आहे.

## "पोलिसांचे कौतुक करावेसे वाटते, एन्काउंटर करून चांगलेच केले"- शर्मिला ठाकरे

**ठाणे, दि. २६ : प्रतिनिधी**

राज्याला हादरवून टाकणाऱ्या बदलापूरमधील खासगी शाळेतील लहान मुलीवरील अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा अचानक पोलिसांशी झालेल्या चकमकीत मृत्यू झाला. या खळबळजनक घटनेमुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. या प्रकरणावरून विरोधकांनी महायुती सरकारवर टीका केली. यानंतर आता या प्रकरणावरून मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, या सुनावणीत न्यायालाने पोलिसांना महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. यातच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी या एन्काउंटरचे समर्थन केले आहे.

शर्मिला ठाकरे यांनी अक्षय शिंदे चकमक प्रकरणात जखमी पोलीस निलेश मोरे यांची भेट घेतली. यानंतर मीडियाशी बोलताना शर्मिला ठाकरे म्हणाल्या की, मला एक मेसेज आला आहे. तो वाचून दाखवते. एन्काउंटर केल्याबद्दल पोलिसांचे अभिनंदन. जाणूनबुजून एन्काउंटर केले असेल, तर पोलिसांचे डबल अभिनंदन. ते एन्काउंटर कसेही असले, तरी महिलांवर अत्याचार एवढे वाढले आहेत की, जोपर्यंत कायद्याचा असा धाक निर्माण होत नाही, तोपर्यंत अशा गोष्टींवर वचक बसणार नाही. असे एन्काउंटर वरचेवर झाले पाहिजेत, असे माझे मत आहे, असे शर्मिला ठाकरे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.



पोलिसांचे खास अभिनंदन करण्यासाठी आले आहे. मी कोणत्याही राजकीय पक्षाची व्यक्ती किंवा राज ठाकरे यांची पत्नी म्हणून बोलत नाही. मी एक महिला म्हणून बोलत आहे. मी तमाम महिलांच्या बाजूने बोलते आहे. आमच्यात इतकी असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. दररोज अशा प्रकारच्या हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. अत्याचार, खून वाढले आहेत. त्यामुळे महिलांची प्रतिनिधी म्हणून बोलते. राजकारणी काय बोलतात, विरोधक काय बोलतात, न्यायालय काय म्हणते, मला त्याच्याशी काही देणेघेणे नाही. मला पोलिसांचे कौतुक करावेसे वाटते, पोलिसांनी एन्काऊंटर करून चांगलेच केले, असे स्पष्ट मत शर्मिला ठाकरे यांनी व्यक्त केले. महिलांवर होणारे अत्याचार लोकशाहीला मारक नाहीत का? वेगाने महिलांवरील अत्याचार वाढत आहेत. मी मागच्या महिन्यात तीन पीडित महिलांना भेटली आहे. हे लोकशाहीला पूरक आहे का? हैदराबादमध्ये बलात्कार करणाऱ्या आरोपीला चार पोलिसांनी चकमकीत ठार केले होते. आज जे रोज सकाळी बोंबलतात, त्याच पोलिसांनी आपल्या वर्तमानपत्रात पोलिसांचे कौतुक केले होते. मग हैदराबादच्या पोलिसांना एक न्याय आणि महाराष्ट्राच्या पोलिसांना वेगळा न्याय देऊन कसा चालेल, जर त्यांचे कौतुक होते, तर यांचेही कौतुकच झाले पाहिजे, असे शर्मिला ठाकरे यांनी सांगितले.

दरम्यान, महिलांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण व्हायची असेल, तर असे एन्काउंटर झाले पाहिजेत. पोलिसांकडे सर्व पुरावे आहेत. त्या लहान मुलींनी त्याला ओळखलेले आहे, असे उज्ज्वल निकम यांनी म्हटले आहे. म्हणजेच या प्रकरणात अक्षय शिंदेविरोधात पोलिसांकडे पुरावे नाहीत, असे नाही. दिल्लीच्या क्राइममध्ये सहा वर्षांनी शिक्षा झाली. आपण शक्ती कायदा फक्त बोलतो, आम्हाला हा शक्ती कायदा हवा, असे शर्मिला ठाकरे म्हणाल्या.

# जिल्हा नियोजन समितीचा निधी मिळेना!

## सुप्रिया सुळेंचं जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

**पुणे, दि. २६ : प्रतिनिधी**




जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी दिला जात नाही आणि आम्ही सुचविलेली काम नाकारली जात आहेत. त्या पार्श्वभूमीवर खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. त्यावेळी आमदार अशोक पवार, आमदार संजय जगताप आणि आमदार संग्राम जगताप हे सहभागी झाले होते. यावेळी राज्य सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली होती.

यावेळी सुप्रिया सुळे म्हणाल्या की, राज्यात आजवर अनेक पक्षांचे सरकार आले. त्या प्रत्येक राज्य सरकार मार्फत सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधींना निधी देताना कायम समान न्याय देण्याचे काम करण्यात आले. मात्र आता मागील काही महिन्यांपासून पुणे जिल्ह्यातील विरोधी पक्षातील लोक प्रतिनिधींना जिल्हा नियोजन समिती मार्फत कोणत्याही प्रकारचा निधी दिला जात नाही. तसेच मतदार संघात सुचविलेली कामे देखील केली जात नाही. त्यामुळे सत्ताधारी पक्षाकडून संविधान विरोधी काम सुरू आहे. या सरकारच्या कार्यपद्धतीचा निषेध व्यक्त करण्यासाठी आम्ही आंदोलन करत असल्याचे सांगत पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्यावर सुळे यांनी अप्रत्यक्षपणे टोला लगावला.

## देवळा तालुक्यात धरणात बुडून युवकाचा मृत्यू

**नाशिक, दि. २६ : प्रतिनिधी**

देवळा तालुक्यातील कांचने शिवारात असलेल्या नागोणे धरणात युवकाचा बुडून मृत्यू झाला. या घटनेविषयी देवळा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे.

कांचने येथील संदीप पिंपळे ( २७ ) हा तरुण रविवारी दुपारी चारच्या सुमारास गावाशेजारी असलेल्या नागोणे धरणात मासे पकडण्यासाठी गेला होता. त्याला धरणातील पाण्याचा अंदाज न आल्याने बुडाला. याची माहिती पोलीस पाटील दिगबर सोनवणे यांनी देवळा पोलीस ठाण्यात दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत सोमवारी स्थानिकांच्या मदतीने पिंपळे याचा मृतदेह धरणातून बाहेर काढला. देवळा ग्रामीण रुग्णालयात विच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. पिंपळे याच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगा,मुलगी असा परिवार आहे.

## मुस्लिम धर्मियांच्या भावना दुखावणारा बॅनर लावणाऱ्या दोन अज्ञात समाज कंटकांवर गुन्हा दाखल

**भिवंडी, दि. २६ : प्रतिनिधी**

तालुक्यातील वेहळे गाव आणि पिपळघर या दोन वेगवेगळ्या गावात दोन अज्ञात इसमांनी गावात मुस्लिम धर्मियांच्या भावना दुखावणाऱ्या मजकूराच्या टंकलेखनाचा बॅनर लावल्याने दोघा अज्ञात समाज कंटकांवर दोन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.यातील पहिल्या घटनेत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,२४ सप्टेंबर रोजी वेहळे गावातील मराठी शाळेजवळ एका विद्युत खांबाला अज्ञात समाज कंटकाने रोहिंग्या मुस्लिम धर्मीय आणि बांगलादेशी मुस्लिम घुसखोरांसह राष्ट्रद्रोही मुस्लिम आदींना गावात राहण्यास आणि व्यापार करण्यास तसेच अशी माणसे गावात आढळल्यास पोलिसांना व ग्रामपंचायत कार्यालयात संपर्क करावा,भाईचारा करणाऱ्या लोकांनी आपले ज्ञान आपल्या जवळ ठेवावे,तसेच सर्व चाळ मालकांनी सर्व भाडेकरूंचे भाडेकरार ग्रामपंचायत कार्यालयात जमा करावे.आपला गाव आपली जबाबदारी जय हिंद ! जय महाराष्ट्र ! वंदे मातरम !!! अशा आशयाचा मजकूर ४ बाय ४ आकाराच्या बॅनरवर टंकलेखन करून मुस्लिम धर्मियांच्या भावनांवर अत्याचार करण्याच्या उद्देशाने व विनापरवाना लावून सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण केले आहे. त्यामुळे याप्रकरणी नारपोली पोलिस ठाण्याचे पोह गोरखनाथ मारूती काळे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात समाज कंटकाच्या विरोधात नारपोली पोलिस ठाण्यात भान्यास कलम २९९,२२३ सह महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास (विकृत्तिकरण) प्रतिबंध करण्याकरीता अधि.१९९५ चे कलम ३ न्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेचा पुढील तपास पोनि (प्रशासन) प्रमोद कुंभार करीत आहेत.तर दुसऱ्या घटनेत २३ सप्टेंबर रोजी कोनगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पिंपळघर गावातील कमानीवरही बुध्दिपुरस्सर व दुष्टी उपदेशाने जय हिंद जय महाराष्ट वंदे मातरम मुस्लीम रोहिंग्यो,बांगलादेशी आणि देशद्रोही आतंकवादी फेरिवाल्याना पिंपळघर गावात प्रवेश बंदी इशारा आणि फेरीवाल्यांनी जर गावात प्रवेश केला तर फोडला जाईल माझा गाव माझी जबाबदारी आम्ही पिंपळघर ग्रामस्त पिंपळगाव अशा आशयाचा मजकुर लिहलेला व त्यावर छत्रपती शिवाजी महाराज हे अफजल खानाचा वध करीत असल्याचे छायाचित्र छापलेला बॅनर विनापरवाना लावून सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण केल्याने याप्रकरणी पोह सरस हनुमान पाटील यांच्या फिर्यादीवरून अज्ञात समाज कंटकावर कोनगाव पोलिस ठाण्यात भान्यासं कलम २९९,२२३ म.मालमत्ता विरूपणास प्रतिबंध अधिनियम ३ न्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोह रायते करीत आहेत.

# शिक्षक या देशाचे श्वास आहेत- खा. बाळ्या मामा

**भिवंडी, दि. २६ : प्रतिनिधी**



मानवाला जीवन जगण्यासाठी श्वास अत्यंत महत्त्वाचा आहे, जर श्वास नसेल तर माणूस जगूच शकत नाही त्याचप्रमाणे शिक्षक या देशाचे श्वास आहेत, शिक्षकांमुळे देशाचे भविष्य घडत असते,शिक्षक नसतील तर काहीच नाही अशी प्रतिक्रिया भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी दिली आहे.मंगळवारी भिवंडी पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या वतीने अंजुर फाटा येथील ओसवाल शाळेच्या सभागृहात आयोजित केलेल्या आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार सन्मान सोहळ्या प्रसंगी म्हात्रे बोलत होते.याप्रसंगी भिवंडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी डॉ. प्रदीप घोरपडे ,गटशिक्षण अधिकारी संजय असवले यांच्यासह तालुक्यातील शिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.गुरूप्रती आपल्या मनात श्रद्धा आहे,शिक्षकांनी आम्हाला शिकविले नसते तर आज इथं पर्यंत पोहचलो नसतो. विद्यार्थी शिकून अधिकारी राजकारणी,वकील ,इंजिनियर होऊन मोठा माणूस झाला तर तो कायम कोणत्यान कोणत्या मार्गाने शकत असतो त्यामुळे तो नेहमीच विद्यार्थी असतो मात्र शिक्षक हे कायम शिक्षकच असतात.शिक्षक हे देशातील महत्वाचे घटक आहेत मात्र इतर देशात जी वागणूक शिक्षकांना मिळते ती वागणूक दुर्दैवाने आपल्या देशात शिक्षकांना मिळत नसून त्यांचा पगार देखील तुटपुंजा असतो अशी खंत देखील म्हात्रे यांनी यावेळी व्यक्त केली.या कार्यक्रमाप्रसंगी आठ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.तर शिष्यवृत्ती व स्पर्धा परीक्षा व शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना देखील सन्मानित करण्यात आले. यावेळी कवाड जि.प शाळेच्या शिक्षिका संध्या विनायक भालेराव,दाभाड शाळेचे रवींद्र बळीराम जाधव,करंजोटी शाळेचे सुरेश बळीराम जाधव,चोरांबे झिडके शाळेच्या मिनल महेश पाटील,वडूनवघर पेंढरीपाडा शाळेचे मेघनाथ मुरलीधर तरे,सरवली पाडा शाळेच्या सुजाता विनोद निंबाळकर,पिसे चिराड पाडा शाळेचे निवास रामराव वाघमारे,पालखणे शाळेच्या स्नेहा नरेंद्र पाटील या आठ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने खासदार बाळ्या मामा यांच्या हस्ते शाल सन्मानचिन्ह व प्रशस्ती पत्र देऊन गौरविण्यात आले.

## भटक्या श्वानाच्या दंशाने अडीच वर्षीय मुलगा जखमी

**भिवंडी, दि. २६ : प्रतिनिधी**

शहरातील शांतीनगर हद्दीतील एका अडीच वर्षीय मुलाला भटक्या श्वानाने दंश केल्याने मुलगा गंभीर जखमी झाल्याची घटना मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली आहे. दरम्यान जखमी चिमुरड्याला तात्काळ इंदिरा गांधी रुग्णालयात दाखल करून त्याच्यावर उपचार करण्यात आले.परंतु या घटनेने पुन्हा एकदा महापालिकेच्या भटक्या श्वानांबाबतच्या नसबंदीचा प्रश्न चव्हाट्यावर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार,शांतीनगर परिसरातील तयब्बा मस्जिदीच्या समोर राहत असलेला अबु हिब्बान अन्सारी हा अडीच वर्षीय मुलगा दुपारी घराबाहेर खेळत होता.त्यावेळी अचानकपणे पिसाळलेल्या भटक्या श्वानाने त्यास दंश करून गंभीर जखमी केले.त्यास उपचारासाठी तात्काळ येथील स्व.इंदिरा गांधी रूग्णालयात दाखल करण्यात आले.दरम्यान त्याच्या बोटावर फ्रॅक्चर झाला असल्याचे उपचारावेळी समजले असून डॉक्टरांच्या उपचारानंतर मुलाला घरी सोडण्यात आले आहे. तर या घटनेनंतर भिवंडीत पुन्हा भटक्या श्वानांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून उपाययोजनेची मागणी जोर धरू लागली आहे.

## 12 कोटींचे सांबरकुंड धरण दोन हजार कोटींवर; 40 वर्षे अलिबागकरांना फक्त आश्वासनांचे पाणी

**अलिबाग, दि. २६ : प्रतिनिधी**

गेली चाळीस वर्षे प्रत्येक निवडणुकीत प्रस्तावित सांबरकुंड धरणाच्या 'आश्वासना'चे पाणी अलिबागकरांना पाजले जात असून सुरुवातीला बारा कोटींच्या खर्चाचे हे धरण आता दोन हजार कोटींच्या घरात पोहोचले आहे. अजूनही हे धरण कागदावरच असून आगामी विधानसभा निवडणुकांत हा मुद्दा पुन्हा गाजण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

अलिबाग तालुक्यातील रामराज, महान परिसरात सांबरकुंड मध्यम प्रकल्प प्रस्तावित आहे. रायगड जिल्ह्यात एकूण २८ धरणे असून त्यांची जलसाठा साठवणूक क्षमता ६५ दलघमी इतकी आहे. असली तरी अनेक धरणे जुनी झाल्याने गाळात रुतली आहेत. दुसऱ्या बाजूला जिल्ह्यातील लोकसंख्या आता २६ लाखांवर पोहोचल्याने जलसाठा अपुरा पडू लागला आहे. त्यामुळे नवीन धरणाची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून जोर धरू लागली आहे.

अलिबागकरांची तहान भागवण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या सांबरकुंड धरणाची मागणी निवडणुका आल्या की चर्चेत येते. मुळात हे धरण भूसंपादन प्रक्रियेतच अडकून पडले आहे. मागील पाच वर्षांत दोन सरकारे आली. त्यांनीही ही प्रक्रिया पूर्ण करून तातडीने धरण पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. पण दोन्ही सरकारांकडून निराशा पदरी पडल्याचे मत व्यक्त होत आहे.

सांबरकुंड धरणाबाबत शेतकऱ्यांसोबत अनेक बैठका झाल्या. धरणग्रस्तांचा धरणाला विरोध नाही. मात्र, वाढीव मोबदला हवा हा मुद्दा आहे. त्याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे - मुकेश चव्हाण, प्रांताधिकारी, अलिबाग.

**धरणग्रस्तांच्या मागणीवर तोडगा निघेना**

सांबरकुंड धरणग्रस्त यांना मिळणारा मोबदला २०१३ च्या निवड्यानुसार मंजूर झाला असून तो घेण्यास धरणग्रस्तांचा विरोध आहे.

नव्या भूसंपादन कायद्यानुसार मोबदला द्यावा, अशी त्यांची मागणी आहे. मात्र या मागणीचा प्रस्ताव हा शासन दरबारी धूळखात पडून आहे.

# सागरी किनारा रस्त्यासाठी हजारो झाडांचा बळी?

## बेलापूरमध्ये मानवी साखळी आंदोलन करत नागरिकांचा तीव्र विरोध

**नवी मुंबई, दि. २६ : प्रतिनिधी**

खारघर ते नेरूळ हा सागरी किनारा रस्ता तयार करण्याचे नियोजन सिडकोने केले आहे. त्याअंतर्गत पहिल्या टप्प्यात सिडकोने बेलापूर सेक्टर-१५ तसेच ११ परिसरातील नागरिकांनी लावलेल्या जवळजवळ ३० हजार झाडांवर कुऱ्हाड कोसळणार असल्याची शक्यता असून या परिसरात स्वत: लावलेल्या व निर्माण केलेल्या निसर्ग संपदेवर घाला घातला जाणार असल्यामुळे या परिसरातील नागरिकांनी मानवी साखळी करत सिडकोचा तीव्र निषेध केला. नियोजित खारघर ते नेरुळ सागरी किनारा मार्गाच्या विरोधात मुख्यमंत्री, सिडको अधिकारी यांची भेट घेणार असून वेळ पडल्यास न्यायालयाचाही दरवाजा ठोठावणार असल्याचा इशारा येथील नागरिकांनी दिला आहे.

सिडकोने याबाबत निविदा नोटीस प्रसिद्ध केली असून त्यासाठी निविदा मागवल्या आहेत. सिडकोने खारघर सेक्टर १६ जलमार्ग ते खारघर रेल्वेस्थानक येथून किल्ला गावठाण ते नेरुळ जेट्टीमार्गे निवासी भागापर्यंतचा रस्ता प्रस्तावित केला आहे. या सिडकोच्या सागरी किनारा मार्गाच्या निर्मितीमुळे २०१३ पासून बेलापूर सेक्टर ११, परिसरात १२ वर्ष लावलेल्या झाडांच्या मुळावर या कोस्टल रोडचे संकट ओढवले आहे. तत्कालिन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी याच बेलापूर सेक्टर १५ येथील परिसरातून 'वॉक विथ कमिशनर'उपक्रम सुरू करुन सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न आयुक्तांकडे थेट मांडण्याचा सुसंवाद सुरू केला होता. परंतु आता याच निसर्ग सौंदर्याने नटलेल्या सेक्टर १५ परिसरातील सौंदर्यावर गदा येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

बेलापूर सेक्टर ११ तसेच १५ परिसरात हजारो झाडे नागरिकांनी लावली,जोपासली आहेत. त्यामुळे या ३० हजार झाडांची निसर्ग संपदा व या विभागाचे सौंदर्य जपण्यासाठी रविवारी या विभागातील हजारो नागरिक रस्त्यावर उतरुन या सागरी किनारा मार्गाला विरोध केला आहे. सेक्टर १५ वॉकर्स फाऊंडेशनच्या माद्यामातून मानवी साखळी करत सिडकोच्या व शासनाचा भूमिकेचा निषेध केला. यावेळी निषेधार्थ माजी आमदार व भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक तसेच संदीप नाईक, रामचंद्र दळवी, डॉ.जयाजी नाथ यांनी आंदोलनात सहभाग घेत सिडकोच्या नियोजनाचा निषेध केला.

दुसरीकडे नागरिकांनी नवी मुंबई महापालिकेला अंधारात ठेवून सिडको या प्रकल्पाला गती देण्याचा प्रयत्न करत आहे. या प्रकल्पामुळे सीबीडी सेक्टर १५ परिसराचे सौंदर्य आणि शांतता नष्ट होण्याची भिती आहे. या परिसरातील ३० हजार झाडे मारली जाणार आहेत. त्यामुळे सिडकोच्या या कोस्टल रोडला नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागणार आहे.

# मुंबईला वीज देण्यासाठी नाशिकमध्ये भारनियमन

**नाशिक, दि. २६ : प्रतिनिधी**

मुंबईतील विजेची गरज भागवण्यासाठी ऐन पावसाळ्यात नाशिककरांना सोमवारी अकस्मात १० ते १२ तास भारनियमन सोसावे लागले. रात्रीपासून स्थानिक पातळीवरील भारनियमन अहमदनगरकडे वर्ग करण्यात आल्याचे सांगितले गेले असतानाही मंगळवारी दुपारी नाशिकच्या अनेक वीज गायब झाली होती. हा भारनियमनाचा भाग नसल्याचा दावा महावितरणकडून करण्यात आला. मुंबईला वीज पुरवठा करणाऱ्या कंपनीचा एक संच सोमवारी बंद पडल्याने संपूर्ण ग्रीड सतर्क होता. नाशिकला एकलहरे आणि बाभळेश्वर केंद्रातून वीज पुरवठा होतो. एकलहरे औष्णिक वीज केंद्रात तीनपैकी केवळ दोन संचावर सध्या वीज निर्मिती होत आहे. यातून ४२० मेगावॉट वीज निर्मिती अपेक्षित असते. मात्र, जुनाट संचांमुळे तितकी वीज निर्मिती होत नाही. अतिरिक्त वीज बाभळेश्वरहून नाशिकला पुरवली जाते. याच ठिकाणी मुंबईला वीज पुरवठा करणाऱ्या चार वाहिन्या आहेत. सोमवारी नाशिकची १४०० मेगावॉटची सर्वोच्च मागणी होती. मुंबईत विजेचा तुटवडा भासल्याने साधारणत: २०० मेगावॉट वीज तिकडे वळवली गेल्याने स्थानिक पातळीवर भारनियमन करणे भाग पडल्याचे महापारेषणचे वरिष्ठ अधिकारी सांगतात. या दिवशी शहर व ग्रामीण भागात टप्प्याटप्प्याने भारनियमन करावे लागले. साधारणत: १२ तास नागरिकांना अडचणींना तोंड द्यावे लागले. यादिवशी काही भागात वादळी पाऊस झाला. त्यामुळे अडचणीत भर पडली.

रात्री नाशिकला करावे लागणारे भारनियमन अहमदनगरकडे वर्ग करण्यात आल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले. परंतु, मंगळवारी परिस्थितीत सुधारणा झालेली नव्हती. सकाळी शहरात वीज पुरवठा सुरळीत होता. दुपारी एक वाजता गंगापूर रोडसह काही भागातील वीज पुन्हा गायब झाली. अनेकांनी त्याचा संबंध भारनियमनाशी जोडला. मात्र मंगळवारी शहरात कुठेही भारनियमन करावे लागले नसल्याचे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले. तांत्रिक दोषामुळे एखाद्या भागातील वीज पुरवठा काही काळ खंडित होऊ शकतो, असे वीज कंपनीकडून सांगण्यात आले.

# मूर्तिजापूर तालुक्यात २५% अग्रिम पीक विमा द्या!



भाजीत पाल पडली, जणांना विषबाधा

भंडारा : मुलीच्या साक्षगंधाच्या कार्यक्रमात तयार करण्यात आलेल्या भाजीत पाल पडली होती. ती भाजी ग्रामस्थांनी खाल्ल्याने तब्बल ५१ जणांना विषबाधा झाल्याची धक्कादायक घटना जांभोरा गावात घडली. या घटनेनंतर भंडा?्यात एकच खळबळ उडाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, भंडा?्याच्या जांभोरा गावातील राजकुमार गहाणे यांच्या घरी २२ सप्टेंबर रोजी मुलीच्या साक्षगंधाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या दरम्यान तयार करण्यात आलेल्या भाजीमध्ये पाल पडली. मात्र याबाबत कल्पना नसल्याने ती गावक?्यांना जेवणात वाढण्यात आली. साक्षगंध कार्यक्रम पार पडल्यानंतर आलेले सर्व पाहुणे जेवण करून गावाकडे गेले. परंतु गावातील नागरिक सायंकाळच्या दरम्यान जेवण करुन आपल्या घरी गेले असतांनासुद्धा विषबाधा झाल्याचा प्रकार दिसून आला नाही. काहींना थोडा त्रास होऊ लागल्याने खाजगी रुग्णालयात उपचार केला. दोन दिवसांनंतर बहुतेक नागकिरांना हगवण, उलटीचा त्रास होऊ लागल्याने गावात चर्चा होऊ लागली. तर २४ सप्टेंबरला बहुतेक महिला- पुरुषांना पोटदुखी, उलटीचा त्रास जाणवू लागल्याने आरोग्य अधिकारी निषा पांडे व डॉ. सोनवणे यांना माहिती दिली असता जांभोरा येथील आरोग्य उपकेंद्रामध्ये कॅम्प लावण्यात आले.

पन्नासच्या जवळपास नागरिकांचे औषधोपचार करण्यात आले. एक रुग्ण शिरीष चंद्रभान गहाणे (वय१७ ) या मुलाचा शासकीय रुग्णालय भंडारा येथे दाखल करण्यात आले असून ३६ रुग्णांची आरोग्य अधिकारी डॉ. निषा पांडे, डॉ. सोनवाने, आरोग्य सेविका स्वाती मरस्कोले यांनी औषध उपचार केले असल्याने सर्वांची प्रकृती धोक्याबाहेर आहे. मात्र विषबाधा कशामुळे झाली याचे अद्याप कारण कळू शकले नाही.

ही भाजी खाल्लयानं५१ ग्रामस्थांना विषबाधा झाल्याची घटना घडली. रात्री अनेकांची प्रकृती अत्यवस्थ असल्याने दहा ते बारा ग्रामस्थांना भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तर, उर्वरित नागरिकांवर करडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात तर काहींवर जांभोरा येथील उपकेंद्रात उपचार करण्यात येत आहे.

# उच्चशिक्षित महिलेची ७४ .५० लाखांनी फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी,

चंद्रपूर, दि. २६: चंद्रपूर फेरो अलॉय प्लांट ऑफ इंडिया लिमिटेडचे महाव्यवस्थापक अविनाश बोडेले यांच्या पत्नी जया बोडेले यांची ऑनलाईन शेअर खरेदी प्रकरणात ७४.५०. लाख रुपयांनी फसवणूक केल्याप्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे तक्रारदार जया बोडेले या स्वत: सेल कंपनीत अधिकारी पदावर कार्यरत होत्या.

उच्च शिक्षित जया बोडाले सेलच्या एका प्लांटमध्ये डेप्युटी जनरल मॅनेजर पदावर कार्यरत होत्या. त्यांनी २०२० मध्ये स्वेच्छा निवृत्ती घेतली. यानंतर त्यांना अडीच कोटी रुपये मिळाले. सध्या जया बोडेले या गृहिणी आहेत. मात्र त्यांना यूट्यूबवर छोटे-छोटे व्हिडिओ पाहण्याची आवड आहे. ऑनलाईन शेअर संदभार्तील व्हीडीओ पाहत असतानाच त्यांना ऑगस्ट रोजी एक लिंक प्राप्त झाली. या लिंकमध्ये दैनंदिन व्यापार आणि मार्केटिंग करून ८ ते १० टक्के नफा कमावण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. या आमिषाला उच्च शिक्षित जया बोडेले या बळी पडल्या. त्यांना आयआयएफएल स्टॉक चॅट नंबर१ या ग्रुपमध्ये जोडण्यात आले. या ग्रुपमध्ये २४८ लोक सहभागी होते. याच ग्रुपमधील जिया गुणवाणी नावाच्या महिलेने जया बोडेले यांच्याशी संपर्क साधून कंपनीत सहाय्यक पदावर कार्यरत असल्याची स्वत:ची ओळख करून दिली. दरम्यान संभाषणानंतर जियाने ऑनलाईन जयाला एक लिंक पाठविली.




जया हिने २३ ऑगस्ट रोजी ५० हजार रुपये ऑनलाईन पाठवून शेअर्स खरेदी केले आणि त्यानंतर शेअर विक्री केले असता तीन ते चार हजार रुपये नफा झाला. २६ ऑगस्ट रोजी पुन्हा ५० हजार रुपये ऑनलाईन पाठविले असता आर्थिक लाभ झाला.

त्यानंतर २७ ऑगस्ट रोजी पुन्हा ५० हजार रुपये पाठविले असता गुंतवणुकीवर १०-१०--हजार रुपये नफा झाला. त्यानंतर नफ्याच्या लालसेपोटी जया यांनी२८ ऑगस्ट रोजीच १०.५०. लाख रुपये ऑनलाईन पाठविले. त्यावर दिड लाख रुपये आर्थिक लाभ झाल्याचे या ग्रुपमध्ये दिसायला लागले. गुंतवणूक केल्यानंतर तत्काळ आर्थिक लाभ दिसत असल्याने जया यांनी ६२ लाख रुपये गुंतवणूक करून सर्व पैसे पाठवून दिले. त्यामुळे जया यांना शेअरच्या खात्यात लाख रुपये दिसायला लागले.

दरम्यान यानंतर जिया गुणवानी यांनी पाच लाख रुपयांचे शेअर खरेदी करण्यास सांगितले. लगेच दुस?्या दिवशी त्यांच्या खात्यात ३.७०. लाखांचे शेअर्स दिसून आले. जिया गुणवानी यांनी जया हिला १५ कोटी रुपये जमा करण्यास सांगितले. तसेच यासाठी दबाव टाकणे सुरू केले. पीडितेने एवढी रक्कम नको आणि आधीच गुंतवलेली७४.५० . लाखाची रक्कम परत करण्याची विनंती केली.

पण नवीन रक्कम गुंतवली नाही तर आधी गुंतवलेली रक्कम परत करणार नाही, अशी धमकी जियाने दिली. अशा स्थितीत पीडितेने पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्याकडे तक्रार दाखल केली.

यासंदर्भात अधिक माहितीसाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना विचारणा केली असता ऑनलाईन शेअर खरेदी प्रकरणातील हे फसवणूक प्रकरण सायबर सेलकडे चौकशीसाठी पाठविले असल्याचे सांगितले. सायबर सेलने या प्रकरणात फसवणूक झाल्याचे निदर्शनास येताच रामनगर पोलीस ठाण्यात प्रकरण पाठविले. रामनगर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असल्याची माहिती पोलीस निरीक्षक आसिफ शेख यांनी दिली.

# एसटी बसने दुचाकीला उडवले, दोघे जागीच ठार

■ महासागर प्रतिनिधी,

चिखली, दि. २६ : चिखली चिखली-जालना राष्ट्रीय महामार्गावरील चिखली तालुक्यातील मेरा खुर्द येथील पेट्रोल पंपा नजीक २३ सप्टेंबरच्या दुपारी ३ वाजे दरम्यान भरधाव एसटी बसने दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने भीषण अपघात होऊन दुचाकीस्वारातील दोघांचा जागीच मृत्यू झाला तर त्यातील एक जण गंभीर जखमी आहे. मृत व जखम तिघेही केळवद येथील राहणार असून राजू खोलगडे (४५)नंदू सगट(३७) अशी मृतांची नावे आहेत. तर ज्ञानेश्वर धोमाळकर(४०) हा व्यक्ती गंभीर जखमी झाले आहेत. प्राप्त माहितीनुसार, संभाजीनगर ते नागपूर ही एम एच १४ के क्यु४४६७ क्रमांकाच्या एसटी बस गाडी चिखली कडे येत होती. त्याचवेळी केळवद येथील उपरोक्त तिघे जण एमएच२८ एए४१६२ क्रमांकाच्या मोटरसायकलने चिखली कडे येत होते. मेरा खुर्द जवळील वळणावर एसटी बसने समोरील दुचाकीला धडक दिली. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला, घटनेची माहिती मिळताच अंढेरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी चिखली येथे पाठवण्यात आले असून जखमींना वैद्यकीय उपचारांसाठी हलवण्यात आले आहे.




**NAGPUR HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD, NAGPUR**
(REGIONAL UNIT OF MHADA)
Add. Gruha Nirman Bhawan, Temple Road, Opp. Dr. Vasantrao Deshpande Hall, Civil Lines, Nagpur-01.

**LOCAL TENDER NOTICE**

Name of Work : Repairs to Sewer Line, Construction Of Chamber & Biodigester in the Premises of MHADA Office, Civil Lines, Nagpur.
Estimate Cost : Rs. 835612/- (Excluding GST)
Cost of Documents : Rs.590/- (Including GST)
Document sale Start to End : **26/09/2024 @ 15.00 Hrs. to 03/10/2024 @ 13.30 Hrs.**

**Note: For more details & purchase tender documents, please visit our office at Nagpur.**

Executive Engineer-I,
Nagpur Housing And Area Development, Board, Nagpur.

**NAGPUR HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD, NAGPUR**
(REGIONAL UNIT OF MHADA)
Add. Gruha Nirman Bhawan, Temple Road, Opp. Dr. Vasantrao Deshpande Hall, Civil Lines, Nagpur-01.

**LOCAL TENDER NOTICE**

Name of Work : Providing Aluminium Partition & Misc. Civil Repairs at MHADA Office, Civil Lines, Nagpur.
Estimate Cost : Rs. 300272/- (Excluding GST)
Cost of Documents : Rs.590/- (Including GST)
Document sale Start to End : **26/09/2024 @ 15.00 Hrs. to 03/10/2024 @ 13.30 Hrs.**

**Note: For more details & purchase tender documents, please visit our office at Nagpur.**

Executive Engineer-I,
Nagpur Housing And Area Development, Board, Nagpur.

**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
**Tender Notice Date :- 26/09/2024**

Commissioner NMC invites Offline tenders for the following works. These tender can be submitted by the registered contractors of NMC. The Terms and conditions of tenders are available in tender form. The sale and purchase of Tender form at E.E. (DPDC) Office, 5th Floor, B-Wing NMC, Nagpur.

| Tender No. | Name of the work | BOQ Cost (Rs.) | EMD |
|---|---|---|---|
| 1 | Const. of Yoga Shed at Mangaldeep Nagar 01 in Prabhag No. 34 | 418768 | 4200 |
| 2 | Providing Water Proofing Treatment to Samaj Bhavan at Gurudev Park Azamdhaha Primary School in Prabhag No. 31 | 419246 | 4200 |
| 3 | Const. of Shed & Fixing Kota inront of Samaj Bhavan at Sarwashree Nagar Dighori in Pr. No. 28 | 419322 | 4200 |
| 4 | Const. of Otta infront of H/o Shri Madhukar Pasare at Vitthal Nagar in Prabhag No. 34 | 411709 | 4200 |
| 5 | Const. of Shed at Shiv Nagar Shiv park in Prabhag no. 31 | 838557 | 8400 |
| 6 | Providing & Laying I-Block & Const. of Shed infront of Samaj Bhavan at Geeta Nagar in Pr. No. 34 | 830685 | 8400 |
| 7 | Providing & Fixing Polished Kota at Sudampuri Samaj Bhavan (S.M.) in Prabhag No. 27 | 415853 | 4200 |
| 8 | Const. of Shed at Manewada Ghat in Prabhag No. 34 | 586838 | 5900 |
| 9 | Providing & Fixing S.S. Railing and Other civil work in Samaj Bhavan at Shirdi Nagar in Pr. No. 32 | 419832 | 4200 |
| 10 | Cnst. Of Shed at New Subhedar in Prabhag No. 30 | 417114 | 4200 |
| 11 | Const. of Shed at Maa Bhagwati Nagar in Prabhag No. 34 | 832724 | 8400 |
| 12 | Const. of Shed at Daulat Nagar in Prabhag No. 34 | 417529 | 4200 |
| 13 | Const. of Shed infront of Nehru Nagar Samaj Bhavan in Prabhag No 27 | 419349 | 4200 |
| 14 | Const. of Shed and Fixing Kota infront of Samaj Bhavan at Pragati Nagar Dighori in Prabhag No. 28 | 419321 | 4200 |
| 15 | Providing & Laying I-Block infront of House of Shri Shende at Sarwashree Nagar in Prabhag No. 28 | 830782 | 8400 |
| 16 | Const. of Yoga shed at Ekmat Nagar in Prabhag No. 34 | 417069 | 4200 |
| 17 | Providing & Fixing Polished Kota at Ayodhya Nagar Samaj Bhavan in Prabhag No. 32 | 415716 | 4200 |
| 18 | Providin water Profing Treatment Providing and Laying Kota & Block infront of Samaj Bhavan at Om Nagar in Prabhag No. 27 | 831732 | 8400 |
| 19 | Const. of Various civil work at Lokhande Nagar Premises in Prabhag No. 37 | 816192 | 8200 |

**Note :- (1)** Cost of Blank Tender form each Rs. 590/-(**2**) Tender sale & submission start date : 27/09/2024. **(3)** Tender submission and date/sales end date 04/10/2024. up to 5.00 pm. **(4)** Date of opening of Tender (if possible) 07/10/2024 up to 5.00 pm. **(5)** Eligibility criteria and mode of Submission shall be as stated in tender document.

**Advt No : 554/PR, Dt : 26/09/2024**

**Executive Engineer**
**(DPDC), N.M.C., Nagpur**

MAHAVITARAN **e-Tender Notice**

Superscribed Item rate e-tenders are invited from established, reputed, experienced contractors and who are registered for e-tendering with MSEDCL. The offers are invited for the work of **1.** Renovation of Control Room and Chainlink Fencing at 33 KV Sub-Station Hiwarkhed Tah-Telhara, Dist-Akola (Rs. 27.36 Lacs approx) **2.** Strengthening of existing transformer plinth at 33 KV substation Poharadevi & maintenance of section office building at section office premise Poharadevi Tq.Manora Dist.Washim. (Rs. 10.15 Lacs approx) **3.**Renovation work of SE O&M office Bhandara Dist-Bhandara (Rs. 18.84 Lacs approx) **4.**Various Civil maintenance work at 33/11 KV Pardi Wathoda Substation Nagpur,Dist-Nagpur(Rs. 17.33 Lacs approx) **5.**Supply, Erection,commissioning &Testing of 10 Ton capacity single girder electric operated crane along with crane structure for NABL Lab at Mankapur,Nagpur Dist-Nagpur(Rs. 17.33 Lacs approx) **6.**Extension of Control Room at 33 KV Sub-Station ,Hudkeshwar, Tah & Dist Nagpur(Rs. 10.00 Lacs approx) vide e-tender specification No SEC/NGP/e-T-49/2024-25 to SEC/NGP/e-T-54/2024-25 respectively. The e-tender with all details will be available on MSEDCL's website www.mahadiscom.in from Dated – 27.09.2024 to 03.10.2024 and submission on 04.10.2024 up to 13.00 Hrs. Corrigendum if any will NOT be published, the bidders have to check it on website itself. Contact No. 7875760519.

**PRO No. NZ/111 /2024**
**Dated-26.09.2024**

**Superintending Engineer**
**(C) CCCM Circle, Nagpur**

**नागपूर सुधार प्रन्यास**
(www.nitnagpur.org)
महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाच्या अधिपत्यातील स्थानिक नियोजन प्राधिकरण
नागपूर सुधार प्रन्यास कायदा 1936 च्या अंतर्गत स्थापना
मुख्य कार्यालय, स्टेशन रोड, सदर, नागपूर – 440 001
फोन नं. 0712–2533725, फॅक्स नं. 0712–2540167

**जाहीर सूचना**

या सूचनेव्दारे सर्व संबंधीताना सुचित करण्यात येते की, १ ) मौजा नागपूर खसरा क्र. ६०७/१ येथील भुखंड क्र. १०अ ला लागून असलेली अनियमित आकाराची जागा आराजी १७०.३६ चौ.मी. ची, सौ. माधुर ज. निलेश भांडारकर, श्री प्रेमशंकर रामदास तिवारी यानी मागणी केलेली आहे.

२ ) मौजा अंबाझरी खसरा क्र. १०६, येथील भुखंड क्र. ३११ ला लागून असलेली अनियमित आकाराची जागा आराजी २४.९६ चौ.मी. ची श्री विनोद मनोहर हरदास व श्रीमती संध्या विनोद हरदास यांनी मागणी केलेली आहे.

३ ) मौजा बिडीपेठ खसरा क्र. ९,२४ येथील भुखंड क्र. १ ला लागून असलेली अनियमित आकाराची जागा आराजी ५२.९२ चौ.मी. ची सौ. युगमाला भिमराव देशपांडे यांनी मागणी केलेली आहे.

वरिल नमुद भुखंडाचे लगतची अतिरिक्त जागेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचे आक्षेप, हक्क, बोजा, जप्ती, भार, अधिकार, बक्षिसपत्र, गहाण, विक्रीपत्र करारनामा, धारणाधिकार अथवा इतर कोणत्याही प्रकारे अधिकार किंवा हक्क असल्यास त्यांनी त्यांचा लेखी आक्षेप सचिव-२ ( संपत्ती विभाग ), नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर मुख्य कार्यालय, स्टेशन रोड, सदर नागपूर- ४४०००१ यांचेकडे ही जाहिर सूचना प्रकाशीत झाल्यापासून ७ दिवसांचे आत कार्यालयीन दिवशी, कार्यालयीन वेळेत दुपारी २.३० ते ५.३० या वेळेत प्रत्यक्ष भेटून नोंदवावा. अन्यथा कुठल्याही प्रकारचा आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

जाहीरनामा क्र. ४२/२०२४-२५
दिनांक २६/०९/२०२४

सचिव-2 ( संपत्ती विभाग )
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर

महाराष्ट्र शासन
**जलसंपदा विभाग**
कार्यकारी अभियंता,
यांत्रिकी विभाग नागपुर .

दुरध्वनी क्र. ०७१२-२५२२४२५ | Email-mechdivngp@rediffmail.com

**ई- निविदा सुचना क्रमांक २५ सन २०२४-२५**

महाराष्ट्र राज्याचा राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग नागपुर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे महाराष्ट्र खाजगी सुरक्षा अभिकरण (नियम) नियम २००७ अंतर्गत खाजगी सुरक्षा अभीकारणाचा व्यवसाय करण्यासाठी अनुज्ञाप्ती परवाना असलेले सक्षम निविदाकारांकडुन खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वार (ऑनलाईन) निविदा मागवीत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व निविदेसंबंधित सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्वाकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिका विभाग नागपूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल. महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१११७/प्र.क्र.१०४/१७ / यांत्रिकी दि. १४.०३.२०१८ अन्वये खालील कामांकरीता निविदा सादर करणारे पात्र कंत्राटदार, जलसंपदा विभागातील यांत्रिकी संघटनेकडे पंजिकृत असणे आवश्यक नाही.

| अ.क्र | कामाचे नाव | १) अंदाजपत्रकीय किंमत २) बयाना रक्कम ३) सुरक्षा ठेव रक्कम (रूपय) | ई-निविदा उपलब्ध कालावधी | ई-निविदा उघडने व काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १) | कार्यकारी अभियंता, यात्रिकी विभाग नागपूर अंतर्गत यांत्रिकी उपविभाग क्र.१ नागपूर करिता संयंत्राचे परीचलन देखभाल व सुरक्षेकरीता बाह्य करणामार्फत जड यंत्रचालक, वाहन चालक, मदतनीस, व चौकीदार यांची सेवा पुरविण्याबाबत. जि. नागपूर | १,०२,७७,६५४/- (GST as per applicable) १,०२,८००/- २,०५,६००/- कोऱ्या निविदेची किंमत- रू.२,३६०/- | निविदा ऑनलाईन विक्रीचा कालावधी - दिनाक २७/०९/२०२४ ११.०० वाजता पासून) ते दिनांक ४/१०/२०२४ ( १८.०० वाजे पर्यंत) निविदा ऑनलाईन सादर करण्याचा कालावधी- दिनांक २७/०९/२०२४ ( ११.०० वाजता पासून) ते दिनांक ०४/१०/२०२४ (१८.०० वाजे पर्यंत) | निविदा उघडणे दिनांक:- ०७/१०/२०२४ (१४.०० वाजता ) कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग सदर, नागपुर यांचे कार्यालयात कामे पुर्ण करण्याचा कालावधी १२ महिने मॉनसूनसह |

DGIPR-2024-25/No.-5/C3410

कार्यकारी अभियंता
यांत्रिकी विभाग, नागपुर

महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय,**
बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर

ई-मेल :-constdivnagpur.ee@mahapwd.gov.in (दूरध्वनी क्र. ०७१२ २५६२२७६)

**ई-निविदा सुचना क्रमांक ४८ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) बांधकाम संकुल सिव्हील लाईन्स, नागपुर (महाराष्ट्र बांधकाम खात्याकडून खालील कामांकरीता निविदेतील अटी व शर्ती पूर्ण करणार नोंदणीकृत कंत्राटदाराकडून बी-१ प्रपत्र नमुन्यातील निविदा (Percentage Rate ) ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता 'सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत (रू.लक्ष) |
|---|---|---|
| 1 | RENOVATION TO TAHASIL OFFICE AT KAMPTEE, IN TAH. KAMPTEE DISTT. NAGPUR | रु. ७८.२२ लक्ष |
| 2 | RENOVATION TO TAHASIL OFFICE AT MOUDA, IN TAH. MOUDA DISTT. NAGPUR | रु. ७४.१९ लक्ष |
| 3 | RENOVATION TO TAHASIL OFFICE AT PARSIONI IN TAHASIL PARSIONI DISTT. NAGPUR. | रु. ६८.०६ लक्ष |
| 4 | RENOVATION TO TAHASIL OFFICE AT RAMTEK, IN TAH. RAMTEK DISTT. NAGPUR | रु. ६८.२७ लक्ष |
| अ. | ई-निविदा उपलब्ध कालावधी ;As per e-tender schedule uploaded on e-portal http://mahatenders.gov.in निविदापूर्व बैठक:- As per e-tender schedule uploaded on e-portal http://mahatenders.gov.in ई-निविदा उघडणे :- (ऑनलाईन नमूद केलेले वेळापत्रक लागू व अंतिम राहील.) | |

१) https://mahatenders.gov.in सूचना फलकावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. (सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वृत्तपत्रीय शुध्दीपत्रक न देता वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
२. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प) नागपूर कार्यालयातील सूचना फलक
३ पत्रव्यवहाराकरीता संपर्क व पत्ता : उपरोक्त नमूद केलेल्या ई-मेल किंवा दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा
४ वरील निविदा डाऊनलोडच्या तारखेला ७२ तासात निविदाची तसेच लिफाफा १ मध्ये दस्ताएवजाची प्रत या विभागात सादर करण्यात यावी.

जावक क्रमांक ५५८६/निविदा लिपीक/दि.२३/९/ २०२४

DGIPR-2024-25/No-5/C3420

(एकनाथ टिकले)
कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग (विशेष प्रकल्प)
नागपूर

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **JWALA-PRASAD SHUKLA.** MY NEW NAME IS **JWALAPRASAD AVDESHPRASAD GARG.**
**ADD:** NEAR HANUMAN MANDIR, WARD NO 13 ISPAT COLONY KALMESHWAR NAG-PUR- 441501

MY OLD NAME WAS **SHILA SHUKLA.** MY NEW NAME IS **SHEELADEVI JWALAPRASAD GARG.**
**ADD:** NEAR HANUMAN MANDIR, WARD NO 13 ISPAT COLONY KALMESHWAR NAG-PUR-441501

MY OLD NAME WAS **HENNA KAUSAR SYED MANSOOR ALI.** MY NEW NAME IS **HENNA IRSHAD BAIG.**
**ADD:** FLAT NO.G/2 RING ROAD MANKAPUR NAGPUR 440030

MY OLD NAME WAS **SAMIRA TABASSUM TAFAZZUL SHAIKH.** MY NEW NAME IS **SAMIRA TABASSUM TAFAZ-ZUL AHMAD SHAIKH.**
**ADD:** KARODI ROAD ARAB COLONY UMARKHED DIS-TRICT. YAVATMAL 445206

MY OLD NAME WAS **SHIVA-JEE CHUNNILAL RAHANG-DALE.** MY NEW NAME IS **SHIVAJI CHUNNILAL RAHAN-GDALE .**
**ADD:** AT. MARARTOLA POST. KAWLEWADA TIRORA GONDIA

# संजय राऊतला शिक्षा आणि न्यायव्यवस्था?

उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या बाबतीत मोठी बातमी समोर आली आहे. मेधा किरीट सोमय्या यांनी दाखल केलेल्या अब्रूनुकसानीच्या दाव्यात माझगाव न्यायालयाने त्यांना १५ दिवसांची कैदेची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात संजय राऊत यांना १५ दिवसांच्या कैदेसह २५ हजारांचा दंडाची शिक्षा देखील सुनावण्यात आली आहे. नंतर त्यांना जामीनही मिळाला. या निकालानंतर संजय राऊत यांनी न्यायव्यवस्थेवर कोरडे ओढले आहेत. प्रधानमंत्री सरन्यायाधिशांच्या घरी गणपती पुजेला जात असतील तर न्यायाची अपेक्षा करायची कशी? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

---------------------

शौचालय प्रकरणात संजय राऊत यांनी मेधा सोमय्या यांचे नाव घेत आरोप केले होते. त्यानंतर त्यांनी राऊत यांच्यावर अब्रूनुकसानीचा दावा केला होता. संजय राऊत यांनी मेधा सोमय्या यांना मीरा-भाइंदरमध्ये मिळालेल्या शौचालयात कामात गैरव्यवहार केला असल्याचा आरोप केला होता. मागील दोन वर्षांपासून हे प्रकरण न्यायालयात सुरू होते. त्यावर आता न्यायालयाने हा निकाल दिला आहे.

संजय राऊत यांनी केलेल्या आरोपाचे पुरावे द्यावे, अशी मागणी मेधा सोमय्या यांनी आपल्या याचिकेत केली होती. या प्रकरणात न्यायालयाने आता आपला निकाल दिला असून संजय राऊत यांना १५ दिवसांच्या कैदेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तसेच त्यांना २५ हजारांचा दंड देखील करण्यात आला आहे.

आता या प्रकरणात खासदार संजय राऊत वरच्या न्यायालयात दाद मागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सध्या संजय राऊत हे दिल्लीत आहेत. त्यामुळे ते आता न्यायालयात या प्रकरणात दाद मागणार का? की काही निर्णय घेणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. मात्र, आता या प्रकरणावरुन सत्ताधारी पक्षातील नेत्यांनी संजय राऊत यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे.

मेधा सोमय्या यांनी या निकालावर समाधान व्यक्त केले आहे. या निकालामुळे न्यायव्यवस्थेवरील विश्वास वाढला आहे. संजय राऊत यांनी माझ्या कुटुंबावर आरोप करत मुलांना टार्गेट केले होते. या प्रकरणी मी एक सामान्य शिक्षिका जशी लढते तशी मी लढले. मी कोर्टाच्या निकालावर समाधानी आहे, असे मेधा सोमय्या यांनी म्हटले आहे.

**काय आहे शौचालय घोटाळा?**

वर्ष 2022 मध्ये मीरा-भाईंदर शहरात 154 सार्वजनिक शौचालये बांधण्यात आली असून त्यातील 16 शौचालये बांधण्याचे कंत्राट मेधा सोमय्या यांच्या युवक प्रतिष्ठानला मिळाले होते. या कामात बनावट कागदपत्र सादर करून मीरा-भाईंदर महापालिकेच्या अधिकाऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप मेधा सोमय्यांवर खासदार संजय राऊत यांनी केला होता. युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून मेधा सोमय्या आणि त्यांच्या कुटुंबानेच केलेला हा घोटाळा असल्याचा आरोप देखील संजय राऊत यांनी केला होता.



**न्यायालयाने नोंदवले निरीक्षक**

या संदर्भात न्यायालयाने रेकॉर्डवरील कागदपत्रे, चित्रफिती पाहता प्रदर्शनी राऊत यांनी 15 आणि 16 एप्रिल रोजी मेधा सोमय्या यांच्या विरोधात बदनामीकारक वक्तव्य केल्याचे स्पष्ट होत आहे. त्यांनी केलेले विधान मोठ्या प्रमाणात लोकांनी ऐकले आणि वर्तमानपत्रातूनही वाचले आहे.

राऊत यांच्या वक्तव्यामुळे याचिकाकर्त्यांच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचल्याचंहा त्यांनी पुराव्यातून म्हटलेले आहे. त्यामुळे याचिकेतील कलम 499 (मानहानी) 500 (गुन्ह्याची शिक्षा) शिक्षा स्पष्ट करत असल्याचेही न्यायालयाने याआधी दिलेल्या आदेशात म्हटले आहे.



**... तिथे न्याय काय मिळणार?**

खासदार संजय राऊत यांनी शिक्षेवर संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः सरन्यायाधीशांच्या घरी गणपतीचे मोदक खाण्यासाठी जातात. त्यानंतर आमच्यासारख्या भ्रष्टाचाराविरोधात लढणाऱ्या लोकांना न्याय कुठून मिळणार? आम्हाला हा निर्णय अपेक्षितच होता. आम्ही त्याला वरच्या कोर्टात आव्हान देऊ, असे ते म्हणालेत.

संजय राऊत गुरुवारी याविषयी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, सद्यस्थितीत न्यायव्यवस्थेचे खालपासून वरपर्यंत संघीकरण झाले आहे. मी न्यायालयाचा आदर करतो. पण मी काय म्हणालो होतो? मीरा भाईंदर परिसरात युवक प्रतिष्ठानकडून काही काम झाले होते. त्याविषयी अनियमितता झाल्याचा आरोप मीरा भाईंदर महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रवीण पाटील यांनी एका पत्राद्वारे तत्कालीन मुख्यमंत्र्यांकडे केला होता.

त्यावर तेथील आमदार प्रताप सरनाईक यांनीही या प्रकरणात भ्रष्टाचार झाल्याचा दावा करत चौकशीची मागणी केली होती. या मुद्यावर विधानसभेच्या पटलावरही चर्चा झाली. त्यानंतर यात भ्रष्टाचार झाल्याचे नमूद करत एक ठरावही पारित झाला होता. हे सर्वकाही ऑनरेकॉर्ड आहे. ते केवळ मी बोलून दाखवले. यामुळे माज्यावर अब्रूनुकसानीचा दावा कसा होऊ शकतो? असा सवाल राऊत यांनी यासंबंधी उपस्थित केला.

संजय राऊत पुढे म्हणाले, शाहीर अण्णाभाऊ साठे ही न्यायव्यवस्था कुणाची तरी रखेल झाले असे म्हणाले होते. हे स्पष्टपणे दिसत आहे. पण त्यानंतरही आम्ही न्यायव्यवस्थेचा आदर करतो. आम्ही या आदेशांना वरच्या कोर्टात आव्हान देऊ. पण न्यायव्यवस्था कुणाची तरी रखेल झाली हे स्पष्ट आहे.

सार्वजनिक हितासाठी जनतेच्या पैशाचा अपहार होत असल्याचे मला दिसले. त्यामुळे मी हा मुद्दा उपस्थित केला. आज मला १५ दिवसांची कैद, २५ हजारांचा दंड आदी शिक्षा ठोठावण्यात आली आहे. मला १५ दिवसच काय १५ वर्षांची शिक्षा ठोठावली तरी मी खरे बोलणे थांबवणार नाही. माझगाव कोर्टाने आमचे पुरावे फेटाळले. त्यामुळे आम्ही या शिक्षेला वरच्या कोर्टात आव्हान देणार आहोत. तिथे या प्रकरणातील सर्व पुरावे सादर केले जातील.

आमच्यासारख्यांचे दावे फेटाळले जात आहेत. कारण सद्यस्थितीत न्यायव्यवस्थेचे खालपासून वरपर्यंत संघीकरण झाले आहे. ज्या देशाचे सरन्यायाधीश गणपतीचे मोदक खायला आपल्या घरी पंतप्रधानांना बोलावतात आणि पंतप्रधान सरन्यायाधीशांच्या घरी जातात त्या देशात आम्हाला काय न्याय मिळणार? असा सवालही संजय राऊत यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.

संजय राऊत वरच्या कोर्टात जाणार हे निश्चित असले तरी ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आलेला न्यायालयाचा निकाल आणि त्यांना झालेली शिक्षा यातून विरोधकांना नामोहरम करण्याचा एक संदेश लोकांमध्ये जातो आहे . सरकारच्या इशाऱ्यावर हे सगळे होत असल्याचीही भावना बळावत चालली आहे . विरोधकांच्या तोफेचे तोंड बंद करण्याचा हा प्रकार असल्याचे काहींचे मत आहे. सत्ताधाऱ्यांना हे सहज वाटत असले तरी याचे काही दुष्परिणाम त्यांना निवडणुकीत पाहावे लागू शकतात.

●●●●●●●●●

# पर्यटनात रोजगाराच्या संधी

**आंतरराष्ट्रीय पर्यटन दिवस सप्ताह विशेष.**

आपल्यातील अनेक जण फिरण्याचे प्लॅनिंग करण्यास सुरुवात करतात. हिरवा निसर्ग, गर्द झाडी, निळाशार समुद्र आणि मस्त भटकंती..! काय झाडी? काय डोंगर? काय निळा निळा सागर? पर्यटनातून आपण सगळं काही न्याहाळू शकतो, इट्स ओके..!! हे शब्द हटकून कानावर पडतात. वर्षभरातून एकदा तरी माथेरान, महाबळेश्वर, गोवा ते थेट लडाखपर्यंतचा एखादा प्लॅन हा ठरलेला असतो. आज २७ सप्टेंबर म्हणजेच जागतिक पर्यटन दिन. पर्यटनातून काहीतरी मानव विकास साध्य करता यावा, अशी दरवर्षीची संकल्पना आहे. ही संकल्पना घेऊनच पर्यटन दिन साजरा केला जातो. कोरोनाच्या जीवघेण्या काळात पर्यटन क्षेत्रावर फार मोठा परिणाम झाला आहे. ही परिस्थिती यंदा लवकरात लवकर सुधारू लागली आहे. सर्वच पर्यटन क्षेत्रे सुरू व्हावीत, असे अनेक पर्यटकांचे म्हणणे आहे.

-------------

आज २७ सप्टेंबर हा दिवस जागतिक पर्यटन दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. सन १९८०पासून जागतिक पर्यटन दिन अर्थात वर्ल्ड टुरिझम डे याच दिवशी साजरा करण्यास सुरवात झाली. कारण संयुक्त राष्ट्राच्या जागतिक पर्यटन संस्थेची स्थापना सन १९७०मध्ये याच दिवशी झाली होती. गत सन २०१८मध्ये पर्यटन आणि डिजिटल परिवर्तन हे मुख्य उद्दिष्ट ठेवून हा दिवस साजरा केला गेला.

पूर्ण वर्षभर जगभरातील सर्व देशांनी त्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम, योजना, सुविधा यांचे नियोजन केले. तर वर्षभर पर्यटनदिनासाठीचा विषय होता तो म्हणजे पर्यटन आणि नोकऱ्याः सर्वांसाठी चांगले भविष्य!

ज्यांना मुक्त भटकायची, मनमुराद फिरायची आवड आहे. अशांना पर्यटन क्षेत्रात कारकीर्द करणे सहज शक्य झाले आहे. आवडीची कारकीर्द पूर्ण झाल्यास मिळणारा आनंद मोठा असतो. दळवळणाच्या सुविधा वाढल्याने मुक्तसंचार करणे आता सोपे झाले आहे. देशाच्या कुठल्याही प्रदेशात किंवा परदेश गमन करण्याकडे अलीकडे लोकांचा कल वाढू लागला आहे.

वर्षभरात पर्यटन या क्षेत्रात २५ टक्क्याने वाढ होते. पर्यटन व्यवस्थापन आणि नियोजन या अभ्यास शाखाही आता महाविद्यालयीन शिक्षणात आल्या आहेत. अनेक परदेशी पर्यटन कंपन्या या क्षेत्रात गुंतवणूक करत आहेत. देशातही मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहे. सार्वजनिक आणि खाजगी स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्याने कारकीर्दच्या या क्षेत्राचा घेतलेला आढावा....

ट्रॅव्हल आणि टुरिझम या विषयात पदवीसाठी बारावी पास आणि पदव्युत्तर पदवीसाठी कोणत्याही विषयातील पदवी आवश्यक आहे. या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी फिरण्याची आवड असायला हवी, तसेच संवाद कौशल्य उत्तम असणे आणि दोनपेक्षा अधिक भाषेवर प्रभुत्व असायला हवे. काही परदेशी भाषा आत्मसात असल्यास खूप फायद्याचे ठरते.

भौगोलिक प्रदेशांची उत्तम जाण असायला हवी. सहकार्यवृत्ती आणि प्रतिकूल परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य असेल तर लोकांमध्ये पटकन एकरूप होणे सोपे होते. सामाजिक नितीनियमांचा आणि परंपरांचा आदर करणेही गरजेचे असते. त्याचबरोबर त्या देशाचा इतिहास, कला आदीची प्राथमिक माहिती हवी. निवास, वाहतूक, अन्न, समारंभ, साहसी पर्यटन आदी सेवा देणारे हे क्षेत्र आहे. आपल्या आवडीनिवडीनुसार यातील अनेक विभागात काम करता येईल.

स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून पर्यटन विभागात नोकरीच्या संधी मिळतात. पर्यटन संचालनालय याच्या माध्यमातूनही अनेक पदे भरली जातात. सरकारी नोकरीत येण्यासाठी मात्र या विषयातील पदवीप्राप्त असणे गरजेचे आहे. तसेच अनेक परदेशी कंपन्यात संधीही आहेत. अनेक विमानसेवा प्रदान करणाऱ्या कंपन्यांना या क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. खाजगी समूहात व्यवस्थापन आणि आदी बाबींसाठी उत्तम वेतनही मिळते. आरक्षण, विपणन, विक्री, नियोजन व मार्गदर्शन यासाठी अनेक जागा भरल्या जातात. मार्गदर्शक हा उपलब्ध पर्यटनसंबंधी जागा आणि तिथे मिळणाऱ्या सेवांची तपशीलवार माहिती देण्याचे काम करतो. त्याच्या सहकार्यामुळे प्रवाशांना योग्य नियोजन करण्यास मदत होते.

पर्यटन मंत्रालय गाईडला मान्यता देते. प्रादेशिक, राज्य आणि स्थानिक असे तीन प्रकार त्यात पडतात. हा परवान्याचे दर दोन वर्षांनी नुतनीकरण करता येते. स्थळांची सविस्तर आणि इत्थंभूत माहिती देणे आणि सांस्कृतिक परंपरा आदीची माहिती देण्याचे काम गाईड करत असतो. त्याच्याकडे उत्तम संवाद कौशल्य असायला हवे. कारण तो प्रत्यक्ष स्थळांवर जाऊन मार्गदर्शन करत असतो. एकंदरीत गाईड हा महत्त्वाचा दुवा असतो. टूर ऑपरेटर्स हे प्रवासाचे संपूर्ण नियोजन करतात. टूर गाईड म्हणून अनुभव आल्यानंतर या पदावर काम करता येते.

ट्रॅव्हल एजन्सी यांचे अनेक लोक ग्राहकांना एजन्सीशी जोडतात. आता ऑनलाइनही ग्राहक जोडता येतात. ग्राहकांशी संवाद साधून अनेक प्लॅन ते देत असतात आणि ग्राहकांना कंपनीशी संपर्क करून देतात. पर्यटन आणि हॉटेल क्षेत्र या दोन्हींचा संबंध अनन्यसाधारण आहे. प्रवासात मुक्कामाची सोय करण्याचे काम एकमेकांच्या सहाय्याने केले जाते. यावर आकर्षक सवलती देऊन ग्राहक मिळवण्याकडे कल असतो.

सद्या जवळजवळ एक लाख कुशल मनुष्यबळाची गरज या व्यवसायाला आहे. विमान कंपन्यासाठी काम करणे, ही वेगळा आनंद देणारी संधी असते. इतर व्यवस्थापन अभ्यासक्रम पूर्ण असल्यास प्राधान्याने संधी मिळते. त्याचबरोबर आकर्षक वेतनही दिले जाते.

पर्यटन क्षेत्रात रोजगार निर्मितीची मोठी क्षमता आहे. जागतिक पर्यटन दिनानिमित्ताने पर्यटन क्षेत्रात जागरुकता व्हावी, पर्यटनाचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी हा दिवस साजरा केला जातो. पर्यटन क्षेत्राच्या जोरावर कोणत्याही देशातील आर्थिक स्थिती सुधारू शकते. नैसर्गिक सौंदर्य, संस्कृती पाहण्यासाठी देशाच्या विविध भागांत लोकांनी जावं म्हणून पर्यटन विकास प्रकल्प महत्वाचे ठरतात. सिंगापूर सारख्या काही देशांची आर्थिक स्थिती ही फक्त पर्यटन क्षेत्रावर अवलंबून असते.

कारण पर्यटनामुळे कित्येक लोकांना रोजगार उपलब्ध होतो. म्हणून पर्यटनाचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी आजच्या दिवशी जगभर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. नवनवीन ठिकाणी भेटी देणे व स्थानिक गोष्टींची माहिती जाणून घेणे, याची उत्सुकता पर्यटन क्षेत्राला प्रोत्साहन देते. विश्व पर्यटन दिनाच्या सप्ताहभर समस्त भावाबहिणींना खुप समृद्धीमय हार्दिक शुभेच्छा !!

●●●●●●●●●



**कृ. गो. निकोडे गुरूजी**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

# 'गुगल' गुरू चा वाढदिवस!

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट म्हणजे माहितीचा खजिना. इंटरनेटवर कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध असते. कोणतीही माहिती शोधायची असेल तर गुगलवर सर्च केले जाते.

अभ्यासाच्या काही नोट्स काढायच्या असतील किंवा काही संदर्भ शोधायचे असेल तर गुगलला सर्च केले जाते. गुगलही क्षणात हवी ती माहिती पुरवते म्हणूनच गुगलला गुरु असे म्हटले जाते. गुगल गुरूमुळे माहितीचा महास्फोट झाला आहे. गुगल म्हणजे इंटरनेट वरील एक विश्वच आहे. आज त्याच गुगल गुरूचा वाढदिवस आहे.

अमेरिकेतील मेनलो पार्कमधील सुसान वेजोसिकी गॅरेजमध्ये लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी ७ सप्टेंबर १९९८ साली गुगल कंपनीची स्थापना केली. लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी सुरवातीला या कंपनीचे नाव 'बॅकरब' असे ठेवले होते. मात्र नंतर ते बदलून गुगल असे ठेवण्यात आले. त्याचे कारणही रंजक आहे.

गुगल ही एक गणिती संज्ञा आहे. एकावर १०० शुन्ये दिल्यावर जो आकडा येतो त्याला गुगल म्हटले जाते. मिल्टन सिरोट्टा या गणित तज्ज्ञाने ही संज्ञा शोधून काढली व वापरली. जगातील प्रचंड माहितीच्या साठ्याचे व्यवस्थापन करणे व जगातील कोणालाही ही माहिती सहजगत्या उपलब्ध करून देणे हा हेतू असल्याने कंपनीचे नाव गुगल असे ठेवण्यात आले.




गुगल कंपनीची स्थापना ७ सप्टेंबरला झाली असली तरी २००५ पासून कंपनीने २७ सप्टेंबर हा दिवस वाढदिवसासाठी जाहीर केला. या पाठीमागचे कारण म्हणजे २७ सप्टेंबर रोजी गुगलला सर्वात अधिक पेज व्ह्यू मिळाले. २७ सप्टेंबर या दिवशी सर्वात जास्त पेज व्ह्यू मिळाल्याने हाच दिवस गुगलचा वाढदिवस म्हणून साजरा करण्यात यावा असा अट्टाहास गुगलमधील कर्मचाऱ्यांनी धरला. कंपनीने तो मान्य केला तेंव्हापासून म्हणजे २००५ पासून २७ सप्टेंबर याच दिवशी गुगलचा वाढदिवस साजरा केला जातो.

७ सप्टेंबर १९९५ रोजी स्थापन झालेल्या गुगल कंपनीच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गुगल ही आज जगातील सर्वात मोठ्या कंपनीपैकी एक कंपनी आहे. गुगल कंपनी केवळ भूतकाळात रमत नाही तर भविष्याचा वेध घेऊन नवीन नवीन फीचर्स आपल्या ग्राहकांना देते. गुगलने त्यांच्या मुख्य शोध यंत्रात अनेकदा सुधारणा केली असून, इतर अनेक उपकरणांवर त्याचा वापर कसा वाढवता येईल याचा विचार केला आहे.

१९९८ साली गुगलने तंत्रज्ञानाचे जग नाट्यमयरित्या बदलून टाकले व सर्च इंजिन कायमचे सुधारून टाकले. गुगलने जग बदलून टाकले. गुगलने इंटरनेट विश्वात क्रांती केली. आज गुगल हे नाव माहीत नसणारा व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. गुगलमुळे इंटरनेटची विक्रमी वाढ झाली. जगातील अब्जावधी लोक गुगलचा वापर करतात.

गुगल हे जगातील सर्वाधिक वापरले जाणारे सर्च इंजिन आहे. गुगलवर आपण आपल्याला पडलेल्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर शोधू शकतो म्हणूनच आज ज्याच्या त्याच्या तोंडी गुगल गुरू हा शब्द रूढ झाला आहे. जगातील कोणतीही माहिती अथवा प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास गुगल गुरूला विचारा तो क्षणात ती माहिती किंवा प्रश्नाचे उत्तर तुम्हाला देईल. गुगल गुरूला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

------------

**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे. ९९२२५४६२९५**

●●●●●●●●●

## नवरात्री महोत्सवाचे महत्त्व

सनातन धर्म हा नेहमीच शक्तीचा उपासक राहिला आहे. वेदांमध्ये ही देवीची उपासना करतांना तिला आदिमाया, आदिशक्ती, करुणेचा सागर असलेली वात्सल्यमयी, जगन्माता, चैतन्य शक्ती आनंदमयी, जगदंबा अशा कित्येक नावांनी संबोधले आहे.

देवीची मूळतत्व तम, रज, सत्व याप्रमाणे नवरात्रातील पहिले तीन दिवस तमोगुणानुसार महाकाली, मधले तीन दिवस रजोगुणानुसार महालक्ष्मी आणि शेवटचे तीन दिवस सत्वगुणानुसार महासरस्वती रुपात उपासना केली जाते. नवरात्रात घट बसवल्यावर रोज नवीन माळ बांधून , अखंड दिवा लावून पंचपक्वांनाचा नैवेद्य करुन, पूजा आरतीच्या माध्यमातून देवीची आराधना केली जाते.

सार्वजनिक नवरात्र उत्सवाच्या वेळी २७ छिद्रांच्या मडक्यात दिवा लावून भोवती फेर धरून टिपऱ्यांच्या नादात गरबा नृत्य करुन देवीचे सहस्त्रपटीने कार्यरत तत्व ग्रहण करण्याचा प्रयत्न केला जातो.

आध्यात्मिकदृष्ट्या भगवंताने आमच्या देहरुपी मडक्याला देखील ९ छिद्रे ( ९३=२७) देऊन मन रुपी दिवा लावून या जगात पाठवले आहे. नवविधा भक्तीच्या माध्यमातून अष्टांग साधना करुन या जन्माचे कल्याण करणे हाच उद्देश आहे. पण आज समाज या सर्व उद्देशापासून भरकटत चालला आहे. गरबाच्या नावाने तरुण तरुणी एकत्र येऊन अंगप्रदर्शन करणारे वस्त्र परिधान करुन अश्लिल नृत्य करतात आणि चुकीच्या गोष्टींना, धर्मांतराला बळी पडतात.

त्याच बरोबर काही वर्षांपासून नऊ दिवसांच्या नऊ रंगांचे कपडे, साड्या आणि त्याला मॅच होणारे दागिने यांची जीवघेणी चढाओढ लागलेली दिसते. अशा प्रकारच्या भक्तीचे प्रदर्शन कुठेतरी थांबायला हवे. यासाठी धर्मशिक्षण अत्यंत आवश्यक आहे. खर म्हणजे शृंगार करुन देवीची उपासना करणं चुकीचे नाही. पण शास्त्राधार नसलेल्या गोष्टींच्या मागे धावून स्वतःचे नुकसान करणे चुकीचे आहे. नटून शृंगार करुन ९ दिवसांच्या ९ रंगांचे अंगप्रदर्शन करणारे कपडे घालण्यापेक्षा आज आवश्यकता आहे ती देवीच्या १६ हातांमध्ये जे शस्त्र आहेत ते चालवायला शिकून आत्मरक्षण करणे.

अशा वेळी स्वसंरक्षणासाठी ज्युडो कराटे, लाठी काठी तसेच अन्य शस्त्र चालवायला शिकले पाहिजे. स्त्रियांची आताची स्थिती पाहिली तर लव्ह जिहाद, सामुहिक बलात्कार, हत्या, छेड काढणे, फसवणूक, अपहरण अशा अनेक घटनांमध्ये सर्वच वयोगटातील महिला, मुलींना त्रास सहन करावा लागत आहे.

त्यामुळे काळाची आवश्यकता ओळखून तळागाळातील शहर, खेड्यापाड्यातील सर्वच महिलांना आपात्कालीन आणि आव्हानात्मक परिस्थितीला सामोरे जाऊन लढण्यासाठी सक्षम होणे अत्यंत आवश्यक आहे. या लढ्यात शारीरिक मानसिक क्षमतेसोबत साधना करुन आध्यात्माचे सामर्थ्य अंगी येणे महत्वाचे आहे. निडरता, निर्भयता हे दैवी गुण जेव्हा स्त्रियां मध्ये येतील तेव्हाच तिचे देवी संबोधन सार्थ ठरणार आहे.

■ **सौ. अंजली पाध्ये, नागपूर.**

**वाचक लिहितात**

**युवा मतदार निर्णायक?**

पुढच्या महिना दोन महिन्यात राज्यात विधानसभेच्या निवडणुका होवू घातल्या आहेत . लाडकी बहीण योजना सुरू करून महायुती सरकारने मतांचे राजकारण सुरू केले आहे.

तथापि, राज्यात बेरोजगारांची संख्या वाढत असताना त्यांना नोकऱ्या देण्यासंदर्भात सरकारचे कोणतेच धोरण दिसत नाही . परिणामी, सुशिक्षीत बेरोजगार कमालीचे निराश आणि तितकेच संतप्त आहेत . एखाद्या विशिष्ट वर्गासाठी खिरापत आणि दुसऱ्या वर्गाला वाळीत टाकण्याचा प्रकार सरकारच्या अंगलट येईल.

■ **रमेश शेंडे, नागपूर.**

# रंगांधळेपणा म्हणजे नेमकं काय? कोणते रंग दिसायचे बंद होतात?

आपल्या शरीरात डोळे हे अतिशय महत्त्वाचं आणि संवेदनशील असं ज्ञानेंद्रिय आहे. डोळ्यांशिवाय आपण जगू पाहू शकत नाहीत. त्यामुळे डोळ्यांची काळजी घेणं, डोळ्यांची निगा राखणं हे आपलं प्राथमिक कर्तव्य आहे.

सध्याच्या धकाधकीच्या आयुष्यात आपण बऱ्याचदा आपल्या प्रकृतीकडे कानाडोळा करतो आणि आयुष्य जगत असतो. आपल्या शरीरावर खरंच जेव्हा मोठा काहीतरी परिणाम बघायला मिळतो तेव्हा आपले डोळे उघडतात. त्यामुळे त्याआधीच आपण आपले डोळे उघाडून पाहिलं आणि माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला तर आपण खूप मोठ्या संकटातून वाचू शकतो.

याशिवाय कोणतीही परिस्थिती आली तरी घाबरुन जाण्याची गरज नाही. कारण त्यावर उपाय हा असूच शकतो. या सर्वच गोष्टींचा विचार करता आम्ही आज आपल्याला रंगांधळेपणा या आजाराशी संबंधित माहिती देणार आहोत. सप्टेंबर महिना हा रंगांधळेपणा आजाराच्या जागृतीचा महिना ओळखला जातो.

याशिवाय जगभरात अनेकांना या आजाराला सामोरे जावं लागत आहे. त्यामुळे हा आजार नेमका काय आहे, तो कसा ओळखावा, त्याच्यावर निदान कसं करावं? याबाबत तज्ज्ञ डॉक्टर जयंत सरवटे (अपवर्तक लेसर सर्जन, डॉ अग्रवालस् डोळ्यांचे हॉस्पिटल, सातारा) यांनी अतिशय मौल्यवान आणि महत्त्वाची माहिती दिली.

रंगांधळेपणा किंवा रंगदृष्टीची कमतरता ही एक अशी स्थिती आहे, जिथे व्यक्तींना विशिष्ट रंगांमध्ये फरक ओळखण्यात अडचण येते. ही स्थिती प्रामुख्याने रेटिनाच्या कोन सेलमधील फोटोपिगमेंट्सवर परिणाम करणाऱ्या अनुवांशिक घटकांमुळे उद्भवते. जे रंगाचा शोध घेणे; तसेच त्यांचा अर्थ लावण्यासाठी जबाबदार असतात. जरी रंगांधळेपणा सामान्यतः अपरिवर्तनीय असला, तरी त्याचे परिणाम, सुरुवातीची लक्षणे समजून घ्या.



**रंगांधळेपणाची कारणे**

**अनुवांशिक घटक :-** रंगांधळेपणाचे सर्वात सामान्य कारण अनुवांशिकता आहे. विशेषतः एक्स गुणसूत्रावरील उत्परिवर्तन. या अनुवांशिक संक्रमणाच्या पद्धतीचा अर्थ असा आहे की दोन गुणसूत्र असलेल्या महिलांच्या तुलनेत केवळ एक एक्स गुणसूत्र असलेल्या पुरुषांमध्ये रंगांधळेपणा अधिक सामान्य आहे. अनुवांशिक रंगांधळेपणाच्या प्राथमिक प्रकारांमध्ये हे समाविष्ट आहे.

**प्रोटॅनोमली आणि प्रोटॅनोपिया:** लाल प्रकाशाच्या आकलनावर परिणाम करतात. प्रोटॅनोपिया म्हणजे लाल प्रकाश पाहण्याची पूर्ण असमर्थता, तर प्रोटॅनोमॅली म्हणजे लाल प्रकाशाप्रती कमी असणारी संवेदनशीलता.

**ड्युटेरानोमली आणि ड्युटेरानोपिया:** हिरव्या प्रकाशाच्या आकलनावर परिणाम करतात. ड्युटेरानोपिया म्हणजे हिरवा प्रकाश जाणण्यातील संपूर्ण असमर्थता, तर ड्युटेरानोमली म्हणजे हिरव्या प्रकाशाप्रती कमी होणारी संवेदनशीलता.

--------------------

**(क्रमशः)**

●●●●●●●●●

## अशोकायन

### लाडू प्रसादम्

प्रसिद्ध देवस्थान तिरुपती
हिंदु धर्मियांचे श्रध्दास्थान
स्वार्थांधांनी तुपात चरबीची
भेसळ करून रचले
धर्मभ्रष्ट करण्याचे कारस्थान ..

हिंदुधर्मियांना बाटविण्याचे
बेमालुम रचले कारस्थान
दोषींचा शोध घेऊनी
घालाच त्यांना कंठस्नान.. !

स्वार्थासाठी भेसळ करणारे
मानव जातीचे हत्यारे
विषारी भेसळीमुळे जनतेला
बहुविध रोगांनी ग्रासलेय बरे !



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

# Sony India ने-510 WF-C510 Truly Wireless Earbuds लाँच केले




**नवी दिल्ली, २६ सप्टेंबर २०२४:** नेआज -५१० या वायरलेस इयरबड्सची घोषणा केली आहे, ज्यात ची ओळख असलेला दमदार आवाज कॉम्पॅक्ट डिझाइन मध्ये उपलब्ध आहे. शक्तिशाली बॅटरी, आरामदायी रचना यासह परवडणाऱ्या किमतीत वाढीव वैशिष्ट्यांसह हे इयरबड्स उपलब्ध होतील. यामुळे दिवसभर तुम्हाला काही ही ऐकायचे असेल, तर हा अत्यंत योग्य पर्याय आहे. निळा, पिवळा, काळा किंवा पांढऱ्या रंगांच्या पर्याया सोबतच आपण आपल्याला हवा असलेला रंग घेऊ शकतो. या पूर्वीच्या उत्पादनांच्या तुलनेत लहान आणि अधिक कॉम्पॅक्ट डिझाइनसह, -५१० हे ग्राहकासाठी अत्यंत सोयीचे आहे. ५१० हे चे आतापर्यंतचे सर्वात लहान इयरबड्स आहेत, त्यामुळे लहान कान असलेल्यां नाही ते सोयीचे ठरू शकतात.

-५१० इअर बड्स कानात अधिक व्यवस्थित बसण्यासाठी त्यात एक अनोखी व्यवस्था करण्यात आली आहे. अर्गोनॉमिक पृष्ठ भाग डिझाइन सह मानवी कानाशी पूर्णपणे जुळणारा आकारयासाठी तयार करण्यात आला आहे. इयर बड्स मध्ये गोलाकार डिझाइन आणि अतिरिक्त आरामासाठी मॅट फिनिश ही आहे, तसेच त्याचा वापर सहज, सोप्या पद्धतीने करता यावा, यासाठी एक सपाटआणि विस्तीर्ण पृष्ठ भाग बटणही आहे, ज्या योगे तुम्ही तुमच्या आवडीचे संगीत विना अडथळा ऐकू शकाल. लहान इअर बड्ससह एक लहान चार्जिंग के सही येते. कॉम्पॅक्ट दंड गोलाकार चार्जिंगकेस मध्ये आधीच्या मॉडेलच्या तुलनेत बारीक डिझाइन आहे, बॅग मध्ये घेऊन जाणे अधिक सोईस्कर ठरते, ज्यामुळे तुम्ही कुठेही जाल, इअरबड्स घेऊन जाऊ शकता. इअरबड्सचे ११ तास आणि आणखी ११ तासांपर्यंत दीर्घकाळ टिकणाऱ्या बॅटरी लाइफसह, तुम्ही तुम्हाला पाहिजे तेवढा वेळ गाण्यांचा आनंद घेऊ शकता, तसेच ५ मिनिटांच्या फास्ट चार्जिंगमुळे तुम्हाला आणखी तासभराचा वेळ मिळेल, याची खात्री करून तुम्ही दिवसभर संगीताचा आनंद घेऊ शकता.

# प्रजनन क्षमता वाढवण्यात पोषणाची भूमिका

प्रजनन क्षमता वाढवण्यात पोषण ही महत्त्वाची भूमिका बजावते, ज्यामुळे स्त्री आणि पुरुष दोघांच्या प्रजनन आरोग्यावर परिणाम होतो. सु-संतुलित आहार ही केवळ सामान्य आरोग्याची बाब नाही तर प्रजनन क्षमता वाढवणारा एक महत्त्वाचा घटक आहे. नागपुरातील बिर्ला फर्टिलिटी आणि मधील विशेषज्ञ डॉ. प्रियंका शहाणे यांच्या मते, पोषण हा प्रजनन क्षमतेचा एक महत्त्वाचा घटक आहे. एक सुनियोजित आहार आवश्यक पोषक प्रदान करतो, पुनरुत्पादक आरोग्यास समर्थन देतो. अँटिऑक्सिडंट्स, ओमेगा-फॅटी सिड आणि फॉलिक सिड समृध्द अन्न अंडी आणि शुक्राणूंच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देतात. संशोधन या दृष्टिकोनाचे समर्थन करते. बेरी, नट आणि हिरव्या पालेभाज्यांमध्ये आढळणारे अँटिऑक्सिडंट्स ऑक्सिडेटिव्ह तणावाचा सामना करण्यास मदत करतात ज्यामुळे पुनरुत्पादक पेशींना नुकसान होऊ शकते. अभ्यासातून असे दिसून आले आहे की उच्च अँटिऑक्सिडेंट सेवन सुधारित अंडी आणि शुक्राणूंच्या गुणवत्तेशी संबंधित आहे. ओमेगा -३फॅटी ॲसिड, सॅल्मन सारख्या माशांमध्ये आणि फ्लेक्ससीड्स आणि अक्रोड्समध्ये आढळतात, हार्मोन नियमन आणि पुनरुत्पादक कार्य सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. पालक, मसूर आणि फोर्टिफाइड तृणधान्ये यासारख्या पदार्थांमध्ये आढळणारे फॉलिक सिड, डीएनए संश्लेषण आणि दुरुस्तीसाठी आवश्यक आहे.

# बीएसएच होम अप्लायन्सेस तर्फे सर्व्हिस कँपचे आयोजन




**मुंबई, २६ सप्टेंबर:** ‐या चीउपकंपनी असलेल्या आणि जगभरांतील आघाडीच्या घरगुती उपकरणांच्या क्षेत्रातील कंपनी तर्फे दिनांक २३-२८ सप्टेंबर २०२४ दरम्यान संपूर्ण भारतात सर्व्हिस कँप चे आयोजन केल्याची घोषणा केली. या मध्ये सणासूदीच्या दिवसांआधी ग्राहक आणि च्या उत्पादनांची तपासणी करता येईल. या उपक्रमाच्या माध्यमातून या शहरांतील लोकांना आता उपकरणांची सर्व्हिस करुन आपली उपकरणे सणासूदीसाठी सज्ज करुन त्या उपकरणाची कार्यक्षमता आणि टिकाऊपणा वाढवणे शक्य होणार आहे. या कँप दरम्यान ग्राहकांना विविध प्रकारचे लाभ होणार असून त्यांत एक्स्टेंडेड वॉरंटीवर विशेष सूट आणि सूटे भाग, क्सेसरीज आणि कन्झ्युमेबल्सवर ही सूट मिळणार आहे. त्याच बरोबर आणि उपकरणांच्या व्हिजिट फी पूर्ण रद्द करण्यात आली आहे. च्या कस्टमर सर्व्हिस ऑफर मध्ये विविध कन्झ्युमेबल्स आणि क्सेसरीज जसेच डीस्केलर्स, लाँड्री आणि डिशवॉशर डिटर्जंट्स, डिशवॉशर टॅब्लेट्स, डस्ट कव्हर्स, पेडेस्टल्स, क्लिनिंग आणि अन्य उत्पादने ही उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. कँपच्या माध्यमातून ग्राहकांना आता त्यांची बॉश आणि सिमेन्सची उत्पादने व्यावसायिकांकडून तपासून, सर्व्हिस करुन आणि दुरुस्त करुन मिळणार आहेत, ज्यामुळे उत्पादनांची कार्यक्षमता आणि टिकाऊपणा वाढीस लागू शकेल. सर्व्हिस कँप विषयी आपले विचार व्यक्त करतांना चीफ फायनान्शियल ऑफिसर आणि बिझनेस डमिनिस्ट्रेशनचे प्रमुख सत्यनारायणन विश्वनाथन यांनी सांगितले ‐मध्ये आम्ही केवळ ग्राहकांच्या समाधानालाच प्राधान्य देत नाही तर त्याच बरोबर सुरक्षा आणि मन:शांतीवर ही लक्ष देत असतो. हा सर्व्हिस कँम मुळे आमच्या प्रिमियम उपकरणांच्या योग्य कार्यक्षमतेबरोबरच टिकाऊपणा साठी सुध्दा आम्ही वचनबध्द आहोत उत्पादनां विषयी ग्राहकांच्या मनात आत्मविश्वासही निर्माण होतो की ही उत्पादने सुरक्षित आणि विश्वसनीय उत्पादने आहेत.

# महाराष्ट्रातील स्थानिक दुकान चालकांच्या वाढीला चालना देण्यासाठी ॲमेझॉन वचनबद्ध आहे

**नागपूर, २६ सप्टेंबर, :** महाराष्ट्रातील स्थानिक विक्रेते आणि किराणा दुकानांसाठी २०२४ चा सणासुदीचा हंगाम यशस्वी करण्यासाठी ॲमेझॉन ने विविध उपक्रम आणि नवकल्पना आणल्या आहेत. विक्रेत्यांना त्यांची कमाई वाढवण्यासाठी आणि ग्राहकांना चांगल्या किमतीत ऑफर करण्यात मदत करण्यासाठी, किराणामाल, फॅशन आणि इलेक्ट्रॉनिक्स यासारख्या श्रेणींमध्ये ३% ते १२% -विक्री शुल्कात लक्षणीय कपात करण्याची घोषणा केली आहे. यामुळे विक्रेत्यांना दिवाळीच्या खरेदीच्या गर्दीचे नियोजन करणे तसेच सणानंतरही व्यवसाय वाढीस चालना देण्याची संधी मिळेल. विक्रेते आणि ग्राहकांचा अनुभव वाढविण्यासाठी तसेच स्थानिक शॉप्स प्रोग्रामद्वारे विक्रेत्यांना अनेक ठिकाणी संधी देण्यासाठी नवीन वैशिष्ट्यांचा एक संच सादर केला आहे. ग्राहकांना आता ॲमेझॉन मोबाइल ॲप वर स्टोअरफ्रंट-लेड व्ह्यूसह खरेदीचा उत्तम अनुभव मिळेल. आगामी सणासुदीचा हंगाम ही महाराष्ट्रातील एसएमबी आणि स्थानिक दुकानांसाठी ग्राहकांच्या खर्चात संभाव्य वाढीसह ई-कॉमर्सद्वारे त्यांच्या ऑनलाइन व्यवसायाला चालना देण्याची मोठी संधी आहे. या वर्षी, राज्यातील ४५,०००+ स्थानिक दुकान विक्रेत्यांसह १.८ लाखांहून अधिक विक्रेते, ॲमेझॉन डॉट इन वर त्यांची उत्पादने सूचीबद्ध आणि प्रदर्शित करतील. तसेच त्यांच्या ग्राहकांपर्यंत भारतातील १००% सेवायोग्य पिन कोडवर पोहोचतील. कमी झालेल्या विक्री शुल्काचा आणि स्थानिक शॉप्स प्रोग्रामच्या नवीन वैशिष्ट्यांचा फायदा घेऊन, विक्रेते त्यांच्या विक्रीला चालना देण्यासाठी आणि नवीन ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी वाढलेली मागणी तसेच विशेष ऑफरचा लाभ घेऊ शकतात. ॲमेझॉन डॉट इन सेलर मोबाइल ॲप वर (विक्रेत्यांसाठी) '१-क्लिक लोकल शॉप्स ऑनबोर्डिंग' हे लोकल शॉप्स प्रोग्रामच्या नवीन वैशिष्ट्यांपैकी एक आहे. विक्रेते आता विक्रेते मोबाईल ॲप द्वारे एका क्लिकद्वारे त्यांचे खाते प्रोग्रामवर नोंदणी करू शकतात ज्यामुळे त्यांच्या शहरात जलद वितरण सक्षम होईल. ही कार्यक्षमता विक्रेत्यांसाठी देखील उपलब्ध आहे. ज्यांनी भूतकाळात या कार्यक्रमात सहभाग घेतला होता आणि त्यांना यात पुन्हा सहभागी व्हायचे असेल, त्यांना आता एका क्लिकवर ॲप वरील हेल्प अंतर्गत स्थानिक दुकाने उपलब्ध आहेत. ज्यामुळे आपल्याला हवे ते दुकान शोधणे सोपे होते. या

## सोनी सबच्या बदल पे पाँव है लावण्यशी संबंध तोडताना बानीला रजतच्या खऱ्या भावना कळतात



**मुंबई, २६ सप्टेंबर :** -सोनी सब वाहिनीवरील 'बदल पे पाँव है' बानी (अमनदीप सिद्धू) च्या अथक प्रवासाचे वर्णन करणारी मालिका आहे. आर्थिक मर्यादा असूनही आपल्या कुटुंबाचे जीवनमान उंचावण्यासाठी झटणारी एक जिद्दी आणि महत्वाकांक्षी मुलगी म्हणून बानीकडे पाहिल्या जाते. अलीकडील काही भागांमध्ये बानीचा नवरा रजत (आकाश आहुजा) ची पूर्वीची जोडीदार लावण्या (भाविका चौधरी) हिच्याशी वाद घातल्याने तणाव वाढत आहे आणि लावण्या कोणत्याही किंमतीत त्याला परत मिळवण्याची शपथ घेते. मालिकेच्या आगामी भागात रजत आणि लावण्याबद्दल बानीचा गोंधळ शेवटी दूर होतो कारण तिने त्याला लावण्याला नाकारल्याचे ऐकले आहे.

# डिजिटल विक्री मंच "greenkraft.co.in" द्वारे
# महिला उत्पादकांचे सक्षमीकरण

**नवी दिल्ली, २६ सप्टेंबर :**

अतिरिक्त सचिव श्री चरणजीत सिंग यांनी १३ सप्टेंबर २०२४ रोजी वाराणसी येथील राष्ट्रीय उपजीविका परिषदेदरम्यान, ग्रामीण समुदायातील महिला उत्पादकांच्या मालकीचे असलेले .. ह्या अभूतपूर्व ऑनलाइन विक्री मंचाचे उद्घाटन केले. ग्रीनक्राफ्ट, हि इंडस्ट्री फाऊंडेशन शी सलंग्न आहे आणि ह्या द्वारे भारतात बनलेल्या विविध वस्तू विक्री साठी उपलब्ध होत आहेत. सदर वस्तू ह्या तामिळनाडू, कर्नाटक आणि ओडिशा मधील विविध स्वयं सहायता गटांच्या सदस्यांनी महिलांच्याच मालकीच्या असलेल्या उत्पादक गटाच्या सहकार्याने बनवल्या आहेत. इंडस्ट्री फाऊंडेशन हि संस्था केळीचे खोड, बांबू, सालच्या झाडाची पाने यांसारख्या नैसर्गिक गोष्टींपासून बनवलेल्या उच्च दर्जाच्या, सुबक वस्तू तयार करण्यात प्रवीण आहे. ग्रीन क्राफ्टद्वारे वस्तू विक्रीमध्ये येणाऱ्या दलालांना वगळून ग्रामीण महिलांच्या उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न केले जातात. या नाविन्यपूर्ण बिझनेस मॉडेलमध्ये % कमाई महिला उत्पादकांना जाते, ज्यामुळे त्यांना त्यांच्या श्रमाचा आणि सर्जनशीलतेचा पूर्ण फायदा होतो. हा उपक्रम महिला उद्योजकांचे सक्षमीकरण करून सर्वसमावेशक ग्रामीण विकासाला चालना देण्याच्या सरकारच्या उद्दिष्टाशी आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या संभाव्यतेचा उपयोग करून ग्रामीण भारतातील उपजीविका बळकट करण्याच्या वचनबद्धतेशी सरेखित आहे. हे व्यासपीठ ग्रामीण भारतातील प्रतिभावान महिला निर्मात्यांना पाठिंबा देण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल दर्शवते. उद्घाटना-दरम्यान श्री चरणजीत सिंग म्हणाले, हा दृष्टिकोन गुणवत्ता, स्पर्धात्मकता आणि -उत्पादकता सुनिश्चित करतो, तसेच भारत आणि परदेशात दर्जेदार उत्पादनांच्या थेट विक्रीद्वारे महिलांसाठी पारदर्शकता, वाजवी वेतन आणि स्थिर उत्पन्न सुनिश्चित करतो. ही संकल्पना सर्वसमावेशक वाढीसाठी दोलायमान, उद्योजकीय, मागणी-चालित वातावरण तयार करण्यास उपयुक्त आहे ज्याचा विविध क्षेत्रांवर परिणाम होऊ शकतो. हा उपक्रम ग्रामीण भारतातील कौशल्य आणि कारागिरीला अधोरेखित करताना शाश्वत उपजीविकेला चालना देतो. इंडस्ट्री फाउंडेशनचे सीईओ श्री नेजू जॉर्ज अब्राहम म्हणाले बांबू महिलांसाठी आर्थिक बदल घडवून आणू शकतो, त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठेशी जोडून लाखो उपजीविका निर्माण करण्याच्या संधी निर्माण करू शकतो. भारत सरकारचे राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान शाश्वत उपजीविकेसाठी मुख्य उपक्षेत्र म्हणून बांबूला बळकट करण्यासाठी वचनबद्ध आहे. ग्रीनक्राफ्टच्या या शाश्वत सजावटीच्या वस्तूंमुळे निसर्गावर परिणाम न करता सण साजरे

# आजचे राशिभविष्य

**मेष :** कामाच्या ठिकाणी किंवा कामाच्या ठिकाणी मोठी समस्या उद्भवू शकते. राजकारणात अपेक्षित जनसमर्थन न मिळाल्याने तुम्ही दु:खी राहाल. सत्तेतील लोकांशी जवळीक वाढेल.

**वृषभ :** जवळच्या मित्रांसोबत भागीदारी करून कोणतेही काम करू नका. तुमच्या कार्यक्षेत्रात स्वत:च्या बळावरच निर्णय घ्या. व्यवसायात तुमच्या जोडीदाराच्या सहकार्याचा आणि सहवासाचा तुम्हाला फायदा होईल.

**मिथुन :** अनावश्यक धावपळ होईल. सरकारी कामात व्यत्यय आल्याने मन भयभीत राहील. देवाचे दर्शन घडण्याची शक्यता आहे. महत्त्वाच्या व्यक्तीशी भेट होईल. व्यवसायात खूप मेहनत करावी लागेल.

**कर्क :** नवीन व्यवसाय किंवा उद्योग सुरू करू शकता. शेतीच्या कामात मेहनत घ्यावी लागेल. बहुराष्ट्रीय कंपन्यांशी संबंधित लोकांना अधीनस्थांचा आनंद मिळेल.

**सिंह :** आजचा दिवस लाभदायक ठरेल पण लहानसहान समस्या उद्भवत राहतील. तुमच्या समस्या आणखी वाढू देऊ नका. त्या त्वरित सोडवण्याचा प्रयत्न करा. लांबचा किंवा परदेश प्रवासाची शक्यता आहे.

**कन्या :** बोलण्यावर नियंत्रण ठेवा. कोणाशी तरी भांडण होऊ शकते. कुटुंबातील एखाद्या व्यक्तीमुळे तुम्हाला दु:ख होईल. नोकर व्यवसायात फसवणूक करू शकतात. सावध रहा.

**तुळ :** व्यवसायाची स्थिती सुधारेल. राजकारणात पद आणि प्रतिष्ठा वाढेल. सहकुटुंब सहलीचा आणि देशाबाहेर फिरण्याचा आनंद घ्याल. व्यवसायात प्रगतीसह नोकरीचा विस्तार होईल.

**वृश्चिक :** प्रिय व्यक्तीशी विनाकारण वाद होऊ शकतो. कोणत्याही प्रलंबित कामात विनाकारण विलंब होऊ शकतो. नको असलेल्या प्रवासाला जावे लागेल.

**धनु :** कोर्टाच्या कामात यश मिळेल. मुलांच्या आनंदात वाढ होईल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस राहील. जवळच्या मित्राची भेट होईल. कामाच्या ठिकाणी एखादा विरोधक तुमच्या वरिष्ठांना चिडवू शकतो.

**मकर :** शुभ कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळेल. उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. नोकरीत पदोन्नतीसह संपूर्ण जबाबदारी तुम्हाला मिळेल. नवीन जोडीदाराकडून विशेष सहकार्य मिळेल.

**कुंभ :** कठोर परिश्रमानंतरच तुम्हाला व्यवसायात यश मिळेल. आध्यात्मिक क्षेत्राशी संबंधित लोकांना त्यांच्या अनुयायांकडून पाठिंबा आणि आदर मिळेल. कुटुंबात सुखद घटना घडेल.

**मीन :** शत्रू पक्षावर विजय मिळेल. नोकरीत पदोन्नतीसह इच्छित पद मिळेल. कर्ज घेण्याचे प्रयत्न यशस्वी होतील. तुम्हाला तुमच्या सासरच्या मंडळींकडून काही शुभ कार्यक्रमाचे आमंत्रण मिळेल.


**शुक्रवार २७ सप्टेंबर २०२४**

**खुल जा सीम सीम**
**जबरदस्त पास होणारे चांसेस**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ८ | ४ | ५ | ६ | ९ |
| २३६ | ६६० | १४० | १३४ | १४९ | ६९० | १६९ | १३५ |
| ५७९ | ३४५ | २५८ | २६० | २४८ | ५०० | ३४९ | ३६० |
| ६७८ | ५८९ | ७८० | ३५० | ३४७ | ४४७ | ४५७ | ५६८ |
| १० | २० | ५४ | ८४ | ४० | ५० | ६८ | ९८ |
| ११ | २१ | ५६ | ८६ | ४१ | ५१ | ६७ | ९७ |
| १७ | २७ | ५३ | ८३ | ४२ | ५२ | ६३ | ९३ |

**२७ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | ६२ | ७१ | ०१ |
| ३५ | ६५ | ७४ | ०४ |
| ३८ | ६८ | ७९ | ०९ |

**प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४**


# मॅकडॉवेल्स कंपनी तर्फे एक्स या प्रिमियम व्होडका, रम आणि जीनच्या श्रृंखलेचे बाजारपेठेत आगमन



## आयकॉनिक आणि पुरातन अशा ब्रॅन्ड तर्फे जेनझी आणि नवीन भारतासाठीच्या आवडीच्या अल्कोहोल श्रेणीत वाढ

**नागपूर, २६ सप्टेंबर : :** कोविड नंतरच्या काळात जागतिक स्तरावर मोठे सामाजिक बदल घडतांना दिसत आहेत आणि ज्यावेळी सोशलायझिंग, कनेक्शन्स आणि सेलिब्रेशन्सचा विषय निघतो त्यावेळी आपले जीवन आनंदाने आणि आवडीने जगणे समोर येते. भारतात हे काही वेगळे नाही आणि या बदलांना मध्य भारतातून चालन मिळाली असून त्यांच्याबरोबर जेन झी सुध्दा आता मोठी होऊ लागली आहे तर मिलेनियल्स सुध्दा अनुभव घेण्यास सक्षम असल्यामुळे आता नवीन स्टेटस सिम्बॉल्स तयार होऊ लागली आहेत. म्हणूनच परंपरागत व्हिस्की च्या पुढे जाऊन पिण्याचा अनोखा अनुभव प्राप्त करतांनाच दुसरीकडे कॉकटेल संस्कृती सुध्दा वाढीस लागून ग्राहक मग ते तरुण असोत किंवा वयस्क दोघेही अधिकाधिक प्रयोगशील बनत आहेत. कलाकृती ही सध्याच्या काळाची गरज आहे. म्हणूनच भारतातील सर्वाधिक आयकॉनिक आणि लिजेंडरी ब्रॅन्ड असलेल्या तसेच १२५ वर्षांची परंपरा असलेल्या मॅकडॉवेल्स आणि कंपनी ने पुर्नशोध लावून आणि ग्राहकांना केंद्रस्थानी ठेऊन आपल्या पोर्टफोलिओत मोठा बदल केला आहे. संपूर्ण देशभरात पसरलेल्या सात डिस्टिलरीज, कच्चा माल मिळवणे आणि घटक हे देशासह जगभरातून मिळवले गेल्यानंतर आता मॅकडॉवेल्स न्ड कंपनीचे एक्स हे उत्पादन ग्राहकांसह सुंदर द्रवांचा समावेश आपल्या पोर्टफोलिओ मध्ये केला आहे, यामध्ये व्होडका पासून ते जिन पर्यंत नवीन सिट्रॉन रम पासून ते चविष्ट डार्क रम पर्यंत उत्पादने आहेत. भारतातील सर्वोत्कृष्ट घटकांसह जगभरांतील आकर्षक स्वादांना एकत्र करत मॅकडॉवेल्स न्ड कंपनीची एक्स सिरीज हा नवीन पोर्टफोलिओ तयार केला आहे. मॅकडॉवेल्स न्ड कंपनीच्या एक्स सिरीजची सुरुवात करतांना डियाजिओच्या मार्केटिंग विभागाचे व्हाईस प्रेसिडेंट आणि पोर्टफोलिओ हेड वरुण कुरीच्च यांनी सांगितले मॅकडॉवेल्स मध्ये आम्ही सातत्याने जगभरांतील स्पिरिट्स मध्ये आमच्या अनोख्या चवीच्या आणि गुणवत्तेच्या दीर्घकालीन परंपरेच्या माध्यमातून नवीन स्तर निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असतो. हीच परंपरा पुढे नेत आम्ही आता मॅकडॉवेल्स न्ड कंपनीची नवीन एक्स सिरीज सुरु करत असून यामुळे सुंदरता आणि आवडीची नवी परंपरा सुरु करत आहोत. प्लॅटिनम व्होडका, जिन आणि सिट्रॉन रम आणि डार्क रमची नवीन श्रेणी ही ग्राहकांच्या आवडी आणि मोठ्या प्रमाणावरील प्रतिसादातून प्रोत्साहन घेऊन तयार केली असून यामुळे अधिक चांगल्या गुणवत्तेचा पिण्याच्या अनुभवाला प्राधान्य मिळणार आहे जे सगळ्यांच्या अगदी हृदयाजवळ आहे.

# मॉर्टीन भारतातील पहिल्या २-इन स्प्रेच्या माध्यमातून माशी आणि झुरळांपासून संरक्षण देतो




**मुंबई, २६ सप्टेंबर :** कीटक नियंत्रणातील जगातील आघाडीच्या ब्रँड्सपैकी एक असलेल्या मॉर्टीनने 'बच्चे बच्चे को पता है' या नवीन मोहिमेची घोषणा केली आहे, ज्यामध्ये त्यांच्या नवकल्पनात्मक उत्पादनावर लक्ष केंद्रित केले आहे मॉर्टीन २-इन १, भारतातील पहिला २-इन-१ स्प्रे, जो माशी आणि झुरळांवर १००% परिणामकारकतेने कार्य करतो. ही नवीन मोहीम भारतीय घरांमध्ये मॉर्टीन २-इन-१च्या सोयी आणि कार्यक्षमतांवर भर देऊन, माशी आणि झुरळ दोन्हींना मारण्यासाठी एक सोपे आणि प्रभावी उपाय प्रदान करते. भारतीय पालकांमध्ये कीटकांमुळे होणाऱ्या आरोग्य समस्यांबद्दल वेगाने चिंता वाढत आहे, विशेषत: पावसाळ्यात डेंग्यू, मलेरिया (माशांमुळे होणारे) आणि टायफॉइड (झुरळांमुळे होणारे) या आजारांचा प्रादुर्भाव वाढतो. ही नवीन मोहीम मॉर्टीन च्या २-इन-१ स्प्रेचा कसा वापर करून माशी आणि झुरळ दोन्हींवर प्रभावीपणे नियंत्रण मिळवून कुटुंबांना मानसिक शांतता मिळू शकते, यावर भर देते. सौरभ जैन, रीजनल मार्केटिंग डायरेक्टर, साउथ एशिया ‐हायजीन, रेकिट म्हणाले, मॉर्टीन नेहमीच आपल्या ग्राहकांच्या गरजांनुसार विकसित होत आले आहे. आज भारतातील बहुतेक घरगुती कीटक स्प्रे वापरकर्ते माश्या किंवा झुरळांसाठी विशिष्टरित्या तयार केलेले स्प्रे वापरतात. कारण बहुतेक घरांमध्ये वर्षभर माश्या आणि झुरळ दोन्ही समस्या असतात, ज्यामुळे ग्राहक असुरक्षित राहू शकतात. आमची नवीन मोहीम भारतातील पहिल्या २-इन स्प्रे ची ताकद दाखवते, जो नेहमी सर्वांगीण संरक्षण प्रदान करतो. मॉर्टीन २-इन-स्प्रे फक्त एका स्प्रेने झुरळ आणि माश्या दोन्हींवर १००% परिणामकारकता दाखवतो, ज्यामुळे भारतीय घरांना संपूर्ण संरक्षण मिळते. हवसने विकसित केलेल्या या नवीन मोहिमेने भारतीय कुटुंबांना या मल्टी-सोल्यूशन उत्पादनाकडे वळण्यासाठी प्रोत्साहित केले आहे, ज्यामुळे त्यांना एकाच उपायाने दोन सामान्य घरगुती कीटकांना तोंड देता येईल, आणि सोय व मानसिक शांती मिळेल.भारतीय घरांमध्ये माश्या आणि झुरळ दोन्हींना लक्ष्य करणारा भारतातील पहिला २-इन-स्प्रे - मॉर्टीन २-इन-१ असल्यास, कुटुंबासोबत वेळ घालवताना ते तणावमुक्त कसे राहू शकतात. अनुपमा रामास्वामी, जॉइंट एमडी आणि चीफ क्रिएटिव ऑफिसर, हवस क्रिएटिव इंडिया म्हणतात,



## सोनी सबच्या वागळे की दुनिया मालिकेत अथर्वच्या नवीन फोनमुळे कुटुंबीयांना जावे लागले

**मुंबई, २६ सप्टेंबर :** सोनी सब या वाहिनीवरील 'वागले की दुनिया, नई पीढी नये किससे'ही मालिका मध्यमवर्गीय वागळे कुटुंबाचा दैनंदिन संघर्ष आणि विजयांचा प्रयत्न दाखवते. अलीकडे झालेल्या भागांमध्ये, अथर्व (शीहान कपाही) नवीन फोन घेण्याच्या कल्पनेने मोहित झाला आहे, त्याला आवडत असलेल्या मुलीला प्रभावित करण्यासाठी अथर्व नवीन फोन घ्यायचा, असे सांगतो. मात्र, अथर्वने नवीन फोन घेतल्यानंतर वागळे कुटुंबीयांना पुन्हा एका नव्या संकटाला तोंड द्यावे लागते. नवीन फोन विकत घेण्याच्या उत्साहात, अथर्वने फसवणूक करणाऱ्या संकेतस्थळावर त्याचे आधार कार्डचे सर्व तपशील प्रविष्ट केले. असे करतना त्याला संकेतस्थळावर सांगण्यात आले की, तुम्ही फोनसोबत हेडफोनची जोडीही जिंकली आहे.

# सोनी सबवरील वंशज मालिकेची सांगता
## अंजली तत्रारी, माहिर पांधी व प्रमुख कलाकारांनी केली कृतज्ञता व्यक्त



**मुंबई, २६ सप्टेंबर :** सोनी सबवरील वंशज सप्टेंबर रोजी प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. महाजन साम्राज्याच्या दोन लढाऊ वंशजांच्या भूमिकेत अंजली तत्रारी आणि माहिर पांधी यांनीमालिकेत वारसा विरुद्ध लिंग-आधारितवारसा या मूल्यावर प्रकाश टाकून प्रेक्षकांना आपलेसे केले. उत्कंठावर्धक वळण, बदल आणि आणखी एका व्यावसायिक प्रतिस्पर्ध्याच्या प्रवेशासह मालिकेने प्रेक्षकांची मने जिंकली. यामुळे ही मालिका चाहत्यांच्या पसंतीस उतरली. शेवटपर्यंत मालिकेचा प्रेक्षक वर्ग तसाच टिकून राहिला. या आठवड्यात ही मालिका संपणार आहे. योग्य वारस शोधण्यासाठी युविका (अंजली तत्रारी) आणि डीजे (माहिर पंधी) यांनी जोरदार लढत दिली.ही मालिका संपत असल्याने मालिकेतील कलाकारांनी त्यांच्या आठवणींना उजाळा करून देत कृतज्ञता व्यक्त केली. असे करताना सर्वच कलाकारहे भावनिक झाल्याचे पहायला मिळाले. युविकाची महाजची भूमिका साकारणारी अंजली तत्रारी म्हणाली,वंशज मालिका संपत असताना खूप भावनिक वाटत आहे. मालिकेतील सहकालाकारासोबत चांगले संबंध निर्माण झाले. सेटवरचा प्रत्येक क्षण हा एक धडा आणि आठवणींचा असतो. मालिका सोडल्यानंतर मला सहकलाकारासोबत घालवलेल्या क्षणांची खूप आठवण येईल. तसेच आम्ही कुटुंबाप्रमाणे वागलो. आम्ही एक टीम म्हणून काम केले. कलाकार आणि क्रू नेहमीच माझी काळजी घेत असायचे.

# जागतिक संगीत दिनानिमित्त कलाकार सांगत आहेत त्यांचे आवडते गायक आणि गाण्यांसबाबत



**मुंबई, २६ सप्टेंबर :** मनोरंजन क्षेत्रात संगीत कलाकारांना शिथिल करण्योसोबत उत्सोहित करण्या मध्यो महत्त्वाची भूमिका बजावते. मधुमरमय गाण्यांमपासून उत्सानहवर्धक तालासह प्रतिष्ठित गायक मन प्रसन्नय करणारे अनुभव आणि प्रेरणा देतात. जागतिक संगीत दिनानिमितृत एण्ड टीव्हीरवरील कलाकार त्यांतचे आवडते बॉलिवुड गायक आणि मूड उत्सोहित करणाऱ्या गाण्यां बाबत सांगत आहेत. हे कलाकार आहेत आशुतोष कुलकर्णी (मालिका 'अटल'मधील क्रिष्णरन बिहारी वाजपेयी), अमित भारद्वाज (मालिका 'भीमा'मधील मेवा), गीतांजली मिश्रा (मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील राजेश) आणि विदिशा श्रीवास्तकव (मालिका 'भाबीजी घर पर है'मधील अनिता भाबी). मेवाची भूमिका साकारणारे अमित भारद्वाज म्हाणाले, ''अरिजित सिंगच्याध आवाजामध्येध मनाला प्रसन्न करण्यालची अद्वितीय क्षमता आहे. त्याजचा सच्चे पणा व प्रामाणिकपणा प्रत्ये क गाण्याला मधुरमय करतात. हार्टब्रेकिंग गाणे 'अगर तुम साथ हो' असो किंवा मधुरमय रोमँटिक गाणे 'केसरिया' असो अरिजित प्रत्ये क गाण्यामध्यु जादूची भर करतो. 'हमारी अधूरी कहानी' गाणे ऐकल्यामनंतर सतत ऐकावेसे वाटते, तर 'जो भेजी थी दुआ' गाणे विचार करण्यादस भाग पाडते.0

# आयआयएफएल फायनान्सने एक टक्का व्याजदराने गोल्ड लोन लॉन्च करण्याची केली घोषणा



**नागपूर, २४ सप्टेंबर २०२४ :** आयआयएफएल फायनान्स, भारतातील प्रमुख नॉन-बँकिंग वित्तीय कंपन्यांपैकी एक, २५ सप्टेंबर ते २८ शनिवार सप्टेंबर २०२४ या कालावधीत महाराष्ट्र आणि गोव्यात गोल्ड लोन मेळा आयोजित करत आहे. या मेळ्यात, ग्राहकांना शून्य प्रक्रिया शुल्कासह दरमहा एक टक्के सपाट व्याजदराने सोने कर्ज दिले जाईल. आयआयएफएल फायनान्सने या गोल्ड लोन मेळाव्याचे आयोजन केले आहे, ज्यांना त्यांच्या क्रेडिट गरजा पूर्ण करण्यासाठी त्वरीत पैशांची गरज आहे त्यांना कमी व्याजदरात सोने कर्ज उपलब्ध करून दिले आहे. भारतभरातील शाखा आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मसह, आयआयएफएल फायनान्सचे उद्दिष्ट आहे की ग्राहकांना या मर्यादित कालावधीच्या ऑफरचा लाभ घेता यावा यासाठी कर्ज विनंत्यांची जलद प्रक्रिया सुनिश्चित करणे. आयआयएफएल फायनान्सचे गोल्ड लोन्सचे प्रमुख श्री. सौरभ कुमार म्हणाले, पैशाची गरज अचानक उद्भवते आणि आम्ही आमच्या गरजू ग्राहकांना वेळेवर आर्थिक मदत देण्यासाठी वचनबद्ध आहोत. हा गोल्ड लोन मेळावा आमची बांधिलकी दाखवतो. आमचे कार्यसंघ ग्राहकांच्या आर्थिक गरजा आत्मविश्वासाने आणि सहजतेने पूर्ण करण्यासाठी तयार आहेत. आयआयएफएल फायनान्सने खूप चांगले कर्ज-टू-व्हॅल्यूगुणोत्तर, जलद कर्ज प्रक्रिया आणि सुलभ डिजिटल पेमेंट पर्याय ऑफर केले आहेत. ग्राहकांना तत्पर सहाय्य प्रदान करून सेवा मानके राखण्यासाठी कंपनी वचनबद्ध आहे. दरमहा एक टक्का दराने गोल्ड लोन मिळवण्यासाठी, ग्राहकांनी भारतातील आयआयएफएल फायनान्सच्या कोणत्याही शाखेला भेट द्यावी किंवा कंपनीच्या वेबसाइटवर ऑनलाइन अर्ज करावा. अटी व शर्ती आणि पात्रता यांचे तपशील वेबसाइटवर उपलब्ध आहेत




## गुणकारी 'मेडिटेरेनियन' आहारपद्धती

लाईफस्टाईल

मेडिटेरेनियन आहारपद्धती सध्या बरीच लोकप्रिय होते आहे. आरोग्यदायी वनस्पतीजन्य पदार्थांचं सेवन हा या आहारपद्धतीचा पाया. हृदयाला बळकटी देणाऱ्या या आहारपद्धतीचा अवलंब करण्याबाबतचं हे मार्गदर्शन.

* भाज्या, फळांसह बार्ली, हातसडीचा तांदूळ, ओटमील, पॉपकॉर्न, राजगिरा तसंच गव्हाचा ब्रेड, पास्ता अशा वनस्पतीजन्य पदार्थांचा प्रामुख्याने आहारात समावेश करायला हवा.



* उच्च स्निग्धांश असलेल्या दुग्धजन्य पदार्थांऐवजी लो फॅट दूध,चीज,आईसक्रीम खावं. चरबीमुक्त दही खाता येईल.

*आठवड्यातून एक किंवा दोन वेळा मासे खा. 'सुरमई', 'ट्युना' हे मासे 'ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स'चा स्रोत असल्याने हृदयाचं आरोग्य चांगलं राहतं. मात्र तळलेले मासे टाळा. कॅनोला किंवा ऑलिव्ह तेलात परतलेले मासे खाता येतील.

* बटरऐवजी ऑलिव्ह किंवा कॅनोला तेलाचा वापर करण्यावर भर द्या. ब्रेडला लावण्यासाठीही हीच तेलं वापरा. तसंच काजू, बदाम, अक्रोड, पिस्ता यांचाही आहारात समावेश करा.

## पाणीपुरीमुळे कर्करोग?

काळजी घ्या

कर्करोग म्हटला तर अनेकांच्या अंगावर काटा येतो. कर्करोगामुळे दरवर्षी अनेकांना जीव गमवावा लागतो. पाणीपुरी म्हटले, की अनेकांच्या तोंडाला पाणी सुटते; परंतु काळजी न घेता पाणीपुरी खाल्ली, तर कर्करोग होण्याची शक्यता आहे.

कर्करोगाची अनेक कारणे असू शकतात. त्यात खराब जीवनशैली, जंक आणि प्रक्रिया केलेले अन्न, प्लास्टिकचा वापर, कमी शारीरिक हालचाल, ताणतणाव, कॉस्मेटिकचा वापर, कीटकनाशक, अनुवांशिक, धूम्रपान, मद्यपान इत्यादींचा समावेश होतो. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच पाणीपुरी आवडते. अनेक जण पाणी पुरी आवडीने खातात; मात्र आता अलीकडेच या स्ट्रीट फूडबाबत एक अतिशय धक्कादायक माहिती समोर आली आहे. पाणीपुरीमध्ये कर्करोगास कारणीभूत ठरणारे घटक आढळल्याची चिंताजनक बातमी आहे. काही दिवसांपूर्वी भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणने कर्नाटकातील मोठ्या रेस्टॉरंटमधून तसेच रस्त्याच्या कडेला असलेल्या विक्रेत्यांकडून पाणीपुरीचे २६० नमुने गोळा केले होते. या नमुन्यांचा तपासणीनंतर अतिशय अतिशय धक्कादायक अहवाल समोर आला आहे.

कृत्रिम रंगांच्या वापरामुळे त्यामध्ये कर्करोगास कारणीभूत ठरणाऱ्या पदार्थांचे प्रमाण वाढल्याचे या अहवालात आढळले. याचा अर्थ असा की, या पाणीपुरीमुळे कर्करोग होण्याचा धोका वाढला आहे. इतर १८ नमुने निकृष्ट दर्जाचे आणि आरोग्यासाठी पूर्णपणे असुरक्षित असल्याचे अहवालात म्हटले आहे. याशिवाय इतरही अनेक नमुने शिळे होते. हे सेवन केल्यामुळे अन्नातून विषबाधासह अनेक गंभीर आजारांचा धोका वाढू शकतो. अशाप्रकारे, एकूण २२ टक्के पाणीपुरीचे नमुने गुणवत्ता मानकांपेक्षाशी जुळत नव्हते. यामध्ये ब्रिलियंट ब्लू, सनसेट यलो आणि टारट्राझिनसारखी रसायने आढळली. त्यामुळे आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात.

पाणीपुरीच्या पाण्यात कृत्रिम रंग आहे की नाही, हे ओळखण्यासाठी काही खास गोष्टींकडे लक्ष देऊ शकता. पाणीपुरीचे पाणी चिंच, कोथिंबीर आणि पुदिन्यापासून बनवले जाते. चिंचेपासून तयार केलेल्या पाण्याचा रंग हलका तपकिरी असतो, तर कोथिंबीर आणि पुदिन्यापासून तयार केलेल्या पाण्याचा रंग गडद हिरवा दिसतो. चिंचेचे पाणी जास्त लाल किंवा तपकिरी दिसत असेल आणि तिखट पाणी जास्त हिरवे दिसत असेल, तर ते बनवण्यासाठी कृत्रिम रंगांचा वापर करण्यात आला असून अशी पाणीपुरी खाणे टाळा. कृत्रिम रंगांचा वापर केलेल्या



पाण्याची चव थोडी कडू असू शकते आणि ते खाल्ल्यानंतर लगेचच घशात आणि पोटात जळजळ होऊ शकते. चांगल्या आरोग्यासाठी, तुम्ही घरी बनवलेल्या पाणीपुरीचे सेवन करू शकता.

## बॅक्टेरियांमुळे होणार निदान!

नवसंशोधन

जिभेवरच्या बॅक्टेरियांमुळे स्वादुपिंडाच्या कर्करोगाचं निदान करता येणं शक्य असल्याचं संशोधनातून समोर आलं आहे. 'जर्नल ऑफ ओरल मायक्रोबायोलॉजी'मध्ये हा शोध प्रसिध्द करण्यात आला असून प्राथमिक टप्प्यात रोगनिदान झाल्याने रुग्ण वाचण्याची शक्यता वाढणार असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. सध्या हा शोध सुरूवातीच्या टप्प्यात असून पुढच्या चाचण्यांमधून यावर शिक्कामोर्तब झालं तर वेगाने पसरणाऱ्या स्वादुपिंडाच्या कॅन्सरला आळा घालणं तसंच प्रतिबंधात्मक उपाय करणं शक्य होणार आहे.



## दात किडल्यास...

दंतारोग्य

दात किडणं ही सर्वसामान्य समस्या आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत अनेकांना हा प्रश्न भेडसावतो. वर वर सामान्य वाटणारी ही समस्या दातांचं बरंच नुकसान करू शकते. वेगाने पसरणाऱ्या जंतूसंसर्गामुळे दातांमध्ये वेदना जाणवतात. किडक्या दातांमुळे खूप अस्वस्थ वाटतं. पण दात किडल्याचं आपल्या पटकन लक्षात येत नाही. त्यात पडलेले खड्डे दिसत नाहीत. किंवा बरेचदा दातांवर एखादा काळपट डाग दिसतो. अशा वेळी नियमित दंत तपासणीद्वारे याचं निदान होतं. तज्ज्ञ दातांमध्ये खड्डे पडण्याआधी होणारे बदल टिपतात आणि वेळेत उपचार सुरू होतात. दात किडल्याचं निदान झालं की विविध प्रकारचे उपचार घ्यावे लागतात. त्याची तयारी ठेवायला हवी.



## रेड मीटमुळे स्मृतीभंशाचा धोका

आरोग्यविश्व

प्रक्रिया केलेल्या लाल मांसापासून बनवलेले बर्गर, पिझ्झा किंवा सँडविच खाणे धोकादायक आहे. नुकताच एका संशोधनात धक्कादायक गौप्यस्फोट झाला आहे. 'रेड मीट' खाल्ल्याने स्मृतीभ्रंश होऊ शकतो. सॉसेज आणि खारवून वाळवलेले डुकराचे मांस यासारख्या गोष्टींमध्ये चरबी आणि कोलेस्टेरॉलचे प्रमाण जास्त असते. ते जास्त प्रमाणात खाल्ले तर रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल प्लेक जमा होण्याचा धोका असतो. यामुळे रक्तवाहिन्या अरुंद होऊ शकतात. यामुळे मेंदूच्या पेशींना ऑक्सिजन आणि पुरेसे पोषण मिळत नाही.



या संशोधनात एक लाख तीस हजारांहून अधिक लोकांचा समावेश करण्यात आला होता. त्यात असे आढळून आले, की रोज प्रक्रिया केलेले मांस खाल्ले त्यांच्यामध्ये स्मृतीभ्रंशाचा धोका १४ टक्के जास्त आढळला. त्याच वेळी, दररोज नट खाणाऱ्यांमध्ये या आजाराचा धोका २० टक्क्यांनी कमी झाल्याचे दिसून आले. लाल मांस खाल्ल्याने हृदयविकार, उच्च रक्तदाब, कोरोनरी आर्टरी डिसीज आणि स्ट्रोक सारखे धोकादायक आजारदेखील होऊ शकतात. रक्तवाहिन्यांची तीव्र जळजळ आणि बिघडलेले कार्य यामुळे स्मृतिभ्रंश होऊ शकतो. तज्ज्ञांच्या मते ग्रिलिंग, तळणे यांसारख्या पद्धती वापरून मांस शिजवले जाते, तेव्हा हेटरोसायक्लिक अमाइन आणि पॉलीसायक्लिक सुगंधी हायड्रोकार्बन्स सारखी धोकादायक रसायने तयार होतात. त्यामुळे मेंदूमध्ये ऑक्सिडेटिव्ह तणाव आणि जळजळ होऊ शकते. त्यामुळे पेशी खराब होतात आणि मेंदू झपाट्याने वृद्ध होऊ लागतो. अल्झायमर आणि स्मृतिभ्रंश यांसारख्या न्यूरोडीजनरेटिव्ह आजारांचा धोका वाढू शकतो.

या संशोधनात असे म्हटले आहे, की प्रक्रिया केलेल्या लाल मांसाऐवजी जर शेंगदाणे रोज खाल्ले तर स्मृतिभ्रंशाचा धोका कमी होऊ शकतो. या दोन्हीमध्ये महत्त्वाचे पोषक आणि अँटीऑक्सिडंट आढळतात. ते मेंदूचे आरोग्य सुधारण्यास मदत करतात.

## कामामुळे एकाकीपणात वाढ

आरोग्यविश्व

बदलती जीवनशैली, कामाचा ताण, खाण्याच्या अयोग्य वेळा, वैयक्तिक आयुष्यासाठी वेळ न मिळणे या सर्व गोष्टींमुळे बहुतांश कर्मचारी तसेच नोकरदार, व्यावसायिक अडचणीत आहेत. वैयक्तिक आयुष्यासाठी वेळ मिळत नसल्याने बहुतांश नोकरदार व्यावसायिक आजकाल अडचणीत आहेत. अशा कामाच्या पद्धतीमुळे व्यावसायिक जीवनात प्रगती होते; परंतु वैयक्तिक जीवनात असे लोक एकाकीपणाचे बळी ठरत आहेत.



ऑफिसमधील कामाची अपूर्ण उद्दिष्टे आणि अकाली बदल यामुळे व्यावसायिकांचे तसेच कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक जीवन धुळीस मिळत आहे. टार्गेट पूर्ण करण्यासाठी एखाद्याला शिफ्टच्या आधी अनेक तास ऑफिसमध्ये राहावे लागते. नाईट शिफ्ट असेल तर दिवसाचा वेळ झोपण्यातच जातो. वेळेवर खाणे-पिणे शक्य नाही, ना कोणतेच कार्य आणि ना सामाजिक जीवन. त्यामुळे लोकांमध्ये एकटेपणा वाढत आहे. दिवसा काही वेळ एकांत आवश्यक असतो. तो वेळ शरीर आणि मन रिचार्ज करण्याचे काम करतो. परंतु सततचा एकटेपणा माणसाला तणाव आणि नैराश्याकडे ढकलतो. वैयक्तिक आयुष्य जवळजवळ संपुष्टात येते. हळूहळू व्यावसायिक जीवनावरही त्याचा परिणाम होऊ लागतो. कामाचा कंटाळा येऊ लागतो आणि शंभर टक्के योगदान देऊनही प्रमोशन मिळत नाही, तेव्हा चिडचिड वाढू लागते.

जमेल तेवढे काम करा. ऑफिसमध्ये स्वतःला सिद्ध करण्यासाठी प्रत्येक कामाला हो म्हणू नका. शिफ्ट पूर्ण केल्यानंतर स्वतःला वेळ द्या. वीकेंडचे दिवस घरी झोपण्यात किंवा टीव्ही पाहण्यात घालवण्याऐवजी, लोकांना भेटा, त्यांच्याशी बोला. यामुळे एकटेपणाला सामोरे जाणे सोपे होते.

## वाढत्या वयात घ्या काळजी

डोळ्यांचं आरोग्य

वाढत्या वयात डोळ्यांशी संबंधित समस्या भेडसावतात. बरीच ज्येष्ठ मंडळी डोळ्यांची वारंवार उघडझाप, अंधूक तसंच धुरकट दिसणं, मोतीबिंदू, एकाच आकृतीच्या दोन प्रतिमा दिसणं अशा तक्रारी करतात. डोळ्यांचं आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी नियमित तपासणी करायला हवी. आहारात बदल केल्यानेही दृष्टी सुधारते. उन्हापासून डोळ्यांचा बचाव करायला हवा.



## हृदय जपा

व्याधी विचार

हृदय निकामी होणं(हार्ट फेल्युअर) या विकारात हृदयाकडून शरीराला आवश्यक तेवढा रक्तपुरवठा होत नाही. रक्तपुरवठा कमी झाल्यामुळे विविध अवयवांच्या कार्यात अडथळे येतात. हृदयाचे स्नायू कमकुवत झाल्याने रक्तशुद्धीकरणाची प्रक्रिया मंदावते. यामुळे भविष्यात बरीच गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता असल्याने याच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. धाप लागणं, थकवा, अशक्तपणा, हृदयाचे अनियमित किंवा जलद ठोके, अचानक वजन वाढणं, भूक मंदावणं, ओटीपोटातली सूज, एकाग्रता कमी होणं, छातीत दुखणं, पायांवर आणि पोटरीलगत सूज जाणवणं ही या विकाराची सर्वसाधारण लक्षणं आहेत.

हृदय निकामी होण्याचा धोका टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांवर भर द्यायला हवा. बैठ्या जीवनशैलीमुळे हृदयाचं आरोग्य धोक्यात येतं. या अवयवाचं कार्य सुरळीत सुरू राहण्यासाठी चांगल्या सवयी अंगिकारायला हव्यात. हृदयाशी संबंधित काही तक्रारी किंवा विकार असल्यस त्यावर तातडीने उपचार करून घ्यावेत. यामुळे हृदय निकामी होण्याचा धोका बऱ्याच प्रमाणात कमी होऊ शकतो. रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासोबतच कोलेस्टेरॉलचं प्रमाणही कमी करायला हवं. औषधांवर फार अवलंबून राहू नये. हृदयविकाराच्या झटक्याची लक्षणं जाणवली तर तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा. योग्य ती खबरदारी घेणंही गरजेचं आहे. अशा वेळी हृदयाला बळकटी देणाऱ्या पदार्थांचं सेवन करावं. चरबीयुक्त, खारवलेले, गोड पदार्थ टाळावेत.



हृदयविकाराला कारणीभूत ठरणाऱ्या धूम्रपानासारख्या सवयी सोडाव्यात. सतत बराच वेळ बसून राहू नये. बैठं काम असेल तर अधूनमधून उभं रहावं. जेवणाच्या वेळेत छोटी चक्कर मारावी. नियमित व्यायामही गरजेचा आहे. एकाच ठिकाणी बराच काळ बसून राहिल्याने हृदयविकाराचा धोका वाढतो. स्थूलपणाही हृदयविकाराला कारणीभूत ठरतो. त्यामुळे वजन कमी करण्याकडे लक्ष ठेवायला हवं. साध्या सोप्या बदलांनी हृदयविकाराला आळा घालता येतो.

## आरोग्यदायी बदाम

आजीबाईचा बटवा

दुपारच्या जेवणानंतर मधल्या वेळेत काही तरी खावं लागतं. अशा वेळी वेफर्स, बिस्किटांऐवजी मूठभर बदाम खाणं आरोग्यदायी ठरतं. बदामात चांगले फॅट्स, अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वं आणि खनिजं मुबलक प्रमाणात असतात. त्यातल्या प्रथिनांमुळे पोट बराच काळ भरलेलं राहतं. बदामांमुळे शरीराला ई जीवनसत्त्व, कॅल्शियम, वनस्पतीजन्य प्रथिनं, फायबर असं बरंच काही मिळतं. यातल्या मॅग्नेशियममुळे रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रणात राहतं. कोलेस्टेरॉल कमी करण्याची क्षमताही बदामांमध्ये आहे. बदाम नियमित खाल्ल्याने हृदयविकाराला लांब ठेवता येतं.



## पोटदुखी असेल तर...

आयुर्वेद आणि विकार

पोटदुखी ही सर्वसाधारण समस्या आहे. मसालेदार खाणं, जेवणाच्या अनियमित वेळा, अपचन, आम्लपित्त, बद्धकोष्ठता आदी कारणांमुळे पोटदुखी उद्भवते. आयुर्वेदात पोटदुखीवर अगदी साधे उपाय आहेत. तसंच काही पदार्थ वर्ज्य करण्यास सांगण्यात आलं आहे. त्याविषयी...

* अपचन, आम्लपित्त, बद्धकोष्ठतेमुळे पोट दुखत असेल तर फळं, हिरव्या पालेभाज्या, सूप, पेज, खिचडी असा पचायला हलका आहार घ्यायला हवा.

* सतत पोटदुखी उद्भवत असेल तर घरच्या घरी आयुर्वेदिक चूर्ण तयार करून ठेवता येईल. यासाठी भाजलेलं जीरं, काळी मिरी, सुंठ, लसूण, धने, हिंग आणि पुदीन्याची वाळलेली पानं सम प्रमाणात घ्या आणि बारीक वाटा. यात थोडं काळं मीठ घाला. दिवसातून दोन वेळा जेवणानंतर गरम पाण्यासोबत हे चूर्ण घ्या. यामुळे पोटदुखीसोबतच बद्धकोष्ठतेची समस्याही दूर होईल.



* अपचनामुळे पोट साफ होत नसेल तर कपभर कोमट दुधात दोन चमचे एरंडेल तेल घालून रात्री झोपण्याआधी प्यावं.

* पुदीना आणि लिंबाचा प्रत्येकी एक चमचा रस घ्या. त्यात अर्धा चमचा आल्याचा रस तसंच चिमूटभर काळं मीठ घाला. दिवसातून तीन वेळा प्या. पोटदुखी बरी होईल. पोटदुखी असेल तर दूध तसंच दुग्धजन्य पदार्थांचं सेवन करू नये. चहा, कॉफी टाळावी. बीन्स आणि मसालेदार पदार्थ खावू नये.

## हीटर वापरताय?

आपण कुठे चुकतो?

थंडीत इलेक्ट्रिक हीटरचा वापर केला जातो. पारा खाली घसरला की आपण हीटर सुरू करतो. यामुळे छान उबदार वाटत असलं तरी या उपकरणाचा वापर आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक ठरतो. सतत हीटरजवळ बसून राहण्याची चूक घातक ठरू शकते. यामागच्या कारणांचा हा मागोवा.

* इलेक्ट्रिक हीटरमधून बाहेर पडणारी गरम हवा वातावरणातली आर्द्रता शोषून घेते. यामुळे आसपासची हवा कोरडी झाल्याने त्वचेला खाज येते. लहान मुलांच्या अत्यंत संवेदनशील अशा त्वचेला याचा जास्त त्रास होतो.

* हवेतला ओलावा घटल्याने आधीच श्वसन विकार असलेल्यांना हीटर सुरू केल्यानंतर घुसमटल्यासारखं वाटतं. श्वास घेताना अस्वस्थता जाणवते. हे टाळण्यासाठी खोलीत पाण्याने भरलेली बादली ठेवा. तसंच हवा खेळती राहण्यासाठी उपाय करा.

* हीटरमुळे बंद खोलीत तयार झालेल्या वातावरणाला शरीर सरावतं. अशा परिस्थितीत वारंवार आत-बाहेर केल्याने शरीराच्या तापमानात चढउतार होतात आणि तुम्ही आजारी पडू शकता.



* सातत्याने, बराच काळपर्यंत हीटर वापरल्याने दुखापत होण्याची शक्यता असते. गरम झालेल्या हीटरला स्पर्श झाला तर भाजतं. त्यातही लहान मुलं आणि ज्येष्ठ नागरिकांना हा धोका जरा जास्तच असतो.

* गरज नसताना हीटर बंद करावा. त्यावर कोणतीही वस्तू ठेऊ नये. या उपकरणाला खेटून बसू नये. हीटर लावण्याशिवाय पर्याय नसेल तर आर्द्रता टिकवून ठेवण्यासाठी खोलीत पाण्याने भरलेली बादली ठेवावी. महत्त्वाचं म्हणजे हीटर चालवण्यासाठी पॉवर कॉर्ड एक्स्टेंशनचा वापर करू नये.

## सर्दी की सायनस संसर्ग?

आरोग्यवेध



घसा बसणं, नाक गळणं, छातीत कफ साठणं ही सर्दी-खोकला, तसंच फ्लूची लक्षणं आहेत. थंडीत हा त्रास जास्त प्रमाणात जाणवतो. यावर घरगुती उपाय केले जातात. सूप,पेजेसारख्या गरम पेयांवर भर दिला जातो. थोडी विश्रांती घेतली की सर्दी, फ्लू बरे होतात. पण यातले कोणतेही उपाय लागू पडत नसतील तर हे नक्कीच काळजीचं कारण आहे. साधी वाटणारी सर्दी किंवा फ्लूचं रुपांतर सायनसच्या जंतूसंसर्गात झालेलं असू शकतं. याची लक्षणं सर्दीसारखीच असल्याने पटकन निदान होत नाही.

सायनस म्हणजे चेहरा आणि कवटीच्या हाडात असलेल्या हवेच्या पोकळ्या. सायनस दोन डोळ्यांच्या खालच्या बाजूला, तसंच मध्यभागी व मागच्या बाजूला, भुवयांच्या वर कपाळात आणि नाकाच्या मागे असतात. यातल्या पोकळ्यांमध्ये हवा रहात असल्याने चेहऱ्याला हलकेपणा देणं हे त्यांचं मुख्य काम. सायनसच्या पोकळीत विषाणू किंवा बॅक्टेरियांमुळे झालेल्या संसर्गाला सायनसचा संसर्ग असं म्हणतात. यात सायनस पोकळ्यांच्या अस्तराचा दाह तसंच सूज येण्यासारख्या समस्या निर्माण होतात. हे सायनस सतत एक प्रकारचा पातळ स्राव तयार करतात. त्याला 'म्युकस' असं म्हणतात. जंतूसंसर्गामुळे स्रावाचं प्रमाण बरंच वाढतं. चेहऱ्याच्या दोन्ही बाजूंना प्रत्येकी चार सायनस असतात. यापैकी कोणत्या सायनसला संसर्ग झाला आहे हे लक्षणांवरून ठरतं. गालातल्या सायनसला त्रास असेल तर त्या भागात वेदना जाणवतात. सायनसचा संसर्ग जीवाणू तसंच विषाणूजन्य असू शकतो. विषाणूंमुळे झालेला संसर्ग संसर्गजन्य असला तरी रुग्णाच्या माध्यमातून पसरणाऱ्या विषाणूंमुळे सायनसचा संसर्ग होतोच असं नाही. सर्दीमुळे निर्माण झालेल्या दाहाचा परिणाम म्हणजे सायनसचा संसर्ग. त्यामुळे हा संसर्ग झालेल्या रुग्णामुळे इतरांना सर्दी होऊ शकते. पण याची परिणती सायनस संसर्गात होईलच असं नाही.

सर्दी व फ्लूची लक्षणं आठवड्यापेक्षा जास्त काळ राहिली तर तो सायनसचा संसर्ग असू शकतो. बराच काळ राहणाऱ्या सर्दीमुळे डोळ्यांमध्ये वेदना जाणवणं हे सुद्धा एक लक्षण असू शकतं. बिछान्यावर आडवं पडल्यानंतर म्युकस घश्याच्या मागच्या बाजूला ओघळतो. यामुळे अस्वस्थता जाणवते आणि रात्रभर खोकला येत राहतो. त्यामुळे रात्री येणाऱ्या खोकल्याकडे दुर्लक्ष नको. काही प्रसंगी सायनस संसर्गामुळे दातदुखी होऊ शकते. भुवयांच्या वरच्या भागातल्या वेदना सायनस संसर्गाच्या असू शकतात. या संसर्गामुळे घशात तसंच नाकात पिवळट-हिरव्या रंगाचा घट्ट स्राव साचतो. हा स्राव घश्याच्या खाली गेल्यावर तोंडाला वेगळीच दुर्गंधी येते. सर्वसाधारण सर्दी पाच ते सात दिवसांमध्ये बरी होते. पण सायनस संसर्गात त्रास बराच वाढत असल्याने डॉक्टरांकडे जाऊन तपासणी करावी. दिवसातून दोनदा वाफ घेतल्याने सायनसच्या वेदना कमी होतात. त्यामुळे हा उपाय करता येईल.

## थोडक्यात

### राष्ट्रवादी खुर्द आणि बुद्रुक कोण?

■ **मुंबई:** महाराष्ट्राला एक वेगळा पर्याय निर्माण व्हावा म्हणून आम्ही सगळे एकत्र आलो आहोत. स्वच्छ आणि पारदर्शक मनाने आम्ही एकत्र आलो आहेत असं संभाजीराजे छत्रपतींनी म्हटलं आहे.



महाराष्ट्रात जी काही पक्षांची फाटाफूट झाली त्यावरही त्यांनी शेलक्या भाषेत टीका केली आहे. दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी पक्ष यामुळे मी गोंधळून गेलो आहे. गावं नाही का दोन नावांची असतात तसे कोण आहेत? राष्ट्रवादी खुर्द कोण आहे ? राष्ट्रवादी बुद्रुक कोण आहे? शिवसेना खुर्द आणि शिवसेना बुद्रुक कोण? हे जे काही झालं ते काही जनतेच्या हितासाठी झाले का? तुम्ही आमच्या आयुष्याचा खेळ केला, अशी टीका संभाजीराजे छत्रपती यांनी केली. आपल्याला परिवर्तन घडवायचं आहे म्हणून मी, राजू शेट्टी, बच्चू कडू एकत्र आलो आहोत असंही यावेळी संभाजीराजे छत्रपती म्हणाले.

### युतीमध्ये तर टोळी युद्धच

■ **छत्रपती संभाजीनगर :** राज्यामध्ये महाविकास आघाडीचे सरकार असताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे त्यांच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांना देखील चार-चार महिने भेटत नव्हते तर सर्वसामान्य जनतेचा प्रश्नच येत नाही. अशा शब्दात शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे.

दुसरीकडे महायुतीच्या काळात एकमेकांवर कुरघोडी दिसून येत आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात टोळी युद्ध चालू असल्याचे वाटते. अशी टीका राजू शेट्टी यांनी केली आहे. छत्रपती संभाजीनगर मध्ये परिवर्तन महाशक्ती या तिसऱ्या आघाडीत सहभागी सर्व पक्ष पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त मेळाव्यात ते बोलत होते.

परिवर्तन महाशक्तीचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण? असा प्रश्न आता आम्हाला विचारला जात आहे. मात्र हाच प्रश्न महाविकास आघाडीच्या नेत्यांना विचारला असता त्यांनी उत्तर दिले का? किंवा महायुतीतील नेत्यांनी तरी या प्रश्नाचे उत्तर दिले का? असा प्रति प्रश्न राजू शेट्टी यांनी उपस्थित केला. आम्ही सर्वच शोषित, वंचितांचे प्रश्न मांडणारे सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न मांडणारे कार्यकर्ते आहोत, असेही राजू शेट्टी यावेळी म्हणाले.

# काँग्रेसच्या नेत्यांना सबुरीचा सल्ला

## दिल्लीतील पक्षश्रेष्ठींनी टोचले राज्यातील नेत्यांचे कान

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २६:**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपाची चर्चा सुरू आहे. यातच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिल्लीमध्ये काँग्रेस पक्षातील वरिष्ठ नेत्यांची भेट घेतली.

जागा वाटपात जास्तीत जास्त जागा पदरात पाडून घेण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे. मात्र, दिल्लीतील पक्षश्रेष्ठींनी काँग्रेस नेत्यांचे कान टोचले असल्याचे समोर आले आहे. मुख्यमंत्री पदाचा चेहऱ्याबाबत राज्यातील नेत्यांनी सबुरीने घ्यावे, असा सल्ला दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांनी दिला आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला राज्यामध्ये चांगले यश मिळाले आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षातील राज्यातील नेत्यांचे मनोबल उंचावले आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीत देखील असेच यश पक्षाला मिळेल, अशी आशा राज्यातील काँग्रेसच्या नेत्यांना आहे. त्यामुळे महाविकास आघाडी मधील जागा वाटपात जास्तीत जास्त जागा मागण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे. मात्र नेत्यांमधील अति आत्मविश्वास काँग्रेसचा घात करू शकतो.



त्यामुळे सध्या सबुरीने घेण्याचा सल्ला काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने राज्यातील नेत्यांना दिला आहे.

मुख्यमंत्री पदाबाबत महाविकास आघाडीमध्ये रस्सीखेच सुरू आहे. मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करण्याची मागणी उद्धव ठाकरे यांच्या वतीने करण्यात आली आहे. मात्र काँग्रेसच्या राज्यातील नेत्यांचा विरोध आहे.

दुसरीकडे नागपूर काँग्रेस मधील पदाधिकाऱ्यांनी नाना पटोले यांचे नाव मुख्यमंत्री पदासाठी पुढे केले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांनी काँग्रेसच्या नेत्यांची कान टोचले असल्याची माहिती समोर आली आहे.

# केंव्हाही दांडकं समोर करायचं का?

## माध्यम प्रतिनिधींवर दादांचा संताप

■ **महासागर प्रतिनिधी अमरावती, दि. २६:**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा स्पष्टवक्तेपणा अनेक ठिकाणी दिसून येतो. गुरुवारी अमरावती दौऱ्यात प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना त्याचा अनुभव आला.



येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नियोजन भवनात विविध विकासकामांचे उद्घाटन केल्यानंतर ते सभागृहातून बाहेर पडत असताना प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी त्यांना गाठले. अजित पवार म्हणाले, मी कार्यक्रमात एवढा वेळ बोललो, तरीही तुम्हाला कळले नाही का, माझे काय विचार आहेत. काय नाहीत. केव्हाही आपलं दांडकं समोर करायचं?

प्रसार माध्यमाच्या प्रतिनिधीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पुणे दौरा रद्द झाल्याविषयी विचारणा केल्यावर अजित पवार म्हणाले, अरे वेड्या, ते सकाळीच ठरलेले आहे. मी इथे यायच्या आधीच आम्हाला पंतप्रधान कार्यालयातून फोन आला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा देखील फोन आला होता. पुणे येथे दुपारी ३ वाजेपासून आणखी पाऊस वाढणार, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पाऊस जास्त पडला, तर जलमय स्थिती होते आणि ये-जा करणे अडचणीचे होते. पुणेकरांची गैरसोय होईल. ज्या भागात दौरा असेल, तेथील नागरिकांना कुठलाही त्रास होता कामा नये, असा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा कटाक्षाने प्रयत्न असतो. त्यामुळे पंतप्रधानाचा दौरा रद्द नव्हे, तर स्थगित करण्यात आला आहे. परिस्थिती सामान्य झाल्यानंतर पंतप्रधान पुणे येथे येतील.

संजय राऊत यांनी महायुतीवर केलेल्या टीकेसंदर्भात विचारले असता, अजित पवार चिडले. म्हणाले, मी तुम्हाला एक सांगू का, मला माझ्यापुरते विचारा. रोज कोण सकाळी उठतो आणि बोलतो, त्यावर दररोज काय प्रतिक्रिया देणार. महायुतीच्या जागावाटपाची चर्चा सध्या सुरू आहे. पत्रकारांनी थोडा संयम बाळगावा. महायुतीचे जागा वाटपाचे ठरले, की मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मी स्वतः पत्रकार परिषदेत घोषणा करणार आहोत, असे अजित पवार म्हणाले.

अमरावतीच्या काँग्रेसच्या आमदार सुलभा खोडके या महायुतीच्या उमेदवार असतील का, या प्रश्नावर अजित पवार म्हणाले, महाराष्ट्रातील २८८ जागांपैकी महायुतीच्या घटक पक्षांपैकी कोणत्या पक्षाला कोणत्या जागा मिळतील, तेच आता ठरलेले नाही. एकदा जागा तर ठरू द्या. अजित पवार यांचे गुरुवारी सकाळी शहरात आगमन झाले. त्यांच्या हस्ते नियोजन भवन येथे अमरावती विधानसभा मतदारसंघातील विविध

# माजी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे निधन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६:**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचे गुरुवारी उपचारादरम्यान निधन झाले. ते ५९ वर्षांचे होते. कुलगुरू निवासाहून अंत्ययात्रा निघून अंबाझरी घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शैक्षणिक वर्तुळातील अनेक मान्यवर उपस्थित होते.



सुभाष चौधरी (जन्म १८ मे १९६५) यांनी स्थापत्य अभियांत्रिकी विषयात पदव्युत्तर पदवी तसेच पीएच. डी. प्राप्त केली होता. त्यांना अध्यापन, संशोधन तसेच प्रशासन क्षेत्रात व्यापक अनुभव होता. ८ ऑगस्ट २०२० मध्ये त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू पदाची धुरा सांभाळली होती.

नागपूर विद्यापीठाच्या शतकोत्तर महोत्सवी सोहळा हा कुलगुरू चौधरींच्या काळात झाला. या सोहळ्याच्या निमित्त वर्षभर विविध उपक्रम विद्यापीठामध्ये राबवण्यात आले. यासाठी राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांच्यासह अनेक मान्यवरांनी विद्यापीठाच्या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली. यासोबतच जानेवारी २०२३ मध्ये नागपूर विद्यापीठात सुभाष चौधरी यांच्या नेतृत्वात इंडियन सायन्स काँग्रेसचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

**निलंबनाची कारवाई सुरू होती**

डॉ. सुभाष चौधरी यांना २१ फेब्रुवारी २०२४ रोजी कुलपतींनी निलंबित केले होते. मात्र, निलंबन करताना अपेक्षित कायदेशीर प्रक्रियेचे पालन न झाल्याचा ठपका ठेवत न्यायालयाने डॉ. चौधरींचे निलंबन रद्द करण्याचा आदेश दिला होता.

त्यानंतर डॉ. चौधरी यांनी ११ एप्रिलला पुन्हा पदभार स्वीकारला. परंतु, यानंतर लगेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे यांच्या समितीकडून चौकशी सुरू करण्यात आली. ही चौकशी पूर्ण झाल्यानंतर कुलपतींनी चौधरी यांना ४ जुलै ला कुलपतींनी दुसऱ्यांदा निलंबित केले होते. यासंदर्भात कारवाई सुरू होती.

डॉ. चौधरी यकृताशी संबंधित आजारावर मागील काही महिन्यांपासून एका खासगी दवाखान्यात उपचार घेत होते. त्यांना उपचारांसाठी मुंबई येथे नेण्याचा निर्णय निकटवर्तीयांनी घेतला. त्यानुसार, एअर ॲम्ब्युलन्स इंडिया' या कंपनीशी संपर्क साधून एअर ॲम्ब्युलन्सची नोंदणी करण्यात आली. त्यासाठी ७ लाख रुपयांचा भरणाही कंपनीकडे करण्यात आला. कंपनीने शनिवार २१ रोजी सकाळी ८.३० वाजता एअर ॲम्ब्युलन्स उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर, एअर ॲम्ब्युलन्सच्या वेळेमध्ये कंपनीने वारंवार बदल केले.

# जलाशयात आढळले तीन मृतदेह

■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २६:**

समुद्रपूर तालुक्यातील मंगरूळ येथील पुलावरून प्रवास करीत असताना पाण्याच्या प्रवाहाने दुचाकी वाहनावरून प्रवास करणारे दोघे नाल्याच्या पुरात वाहून गेले. त्यांचा शोध सुरू असताना लालनाला प्रकल्पात आज त्या दोघांसोबत आणखी एकाचा मृतदेह आढळून आला. तीनही मृतदेह बाहेर काढण्यात आले आहे. दोघांची ओळख पटली असून तिसऱ्याची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

सुलतानपूर येथील सूरज बंडू भगत व रोशन गजानन भगत हे दुचाकीने २३ सप्टेंबर रोजी कोरा परिसरातील मंगरूळ येथील पुलावरून प्रवास करीत असताना पाण्याच्या प्रवाहाने वाहत गेले होते. या घटनेची तक्रार गिरड व हिंगणघाट पोलीस स्टेशनला देण्यात आली होती. तक्रार प्राप्त झाल्यापासून या दोघांचा शोध सुरू करण्यात आला होता. त्याकरिता गृहरक्षक दलाच्या जवानांवर जबाबदारी देण्यात आली होती. लालनाला प्रकल्पात पाहणी केली असता पुरुषांचे मृतदेह अथांग पाण्यात आढळून आले. स्थानिक मच्छीमारांची दोन नावे मृतदेह काढण्यासाठी पाठविण्यात आली. पण त्यांना ते शक्य झाले नाही. घटनेची माहिती आपत्ती व्यवस्थापनाला देण्यात आली व त्यांच्या चमूची मदत मागविल्या गेली. ती चमू घटनास्थळावर आल्यानंतर मृतदेह बाहेर काढण्याच्या कार्याला गती आली.

सुरुवातीला पाण्यात दोन मृतदेह असल्याचे सांगण्यात येत होते. नंतर तीन मृतदेह असल्याची माहिती आली. घटनास्थळावर हिंगणघाट उपविभागीय पोलीस अधिकारी रोशन पंडित, स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक विनोद चौधरी हे त्यांच्या कर्मचारी चमूसह उपस्थित होते.

## सिनेरंग

# सामान्य तरुणाची असामान्य कहाणी येक नंबर



ज्या चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहात आहेत, त्या झी स्टुडिओज आणि नाडियाडवाला ग्रँडसन एंटरटेनमेंट प्रस्तुत सह्याद्री फिल्म्स निर्मित 'येक नंबर' या चित्रपटाचा भव्य ट्रेलर लाँच सोहळा नुकताच दिमाखात पार पडला. या सोहळ्याला राज ठाकरे, बॉलिवूड अभिनेता आमिर खान, दिग्दर्शक राजकुमार हिरानी, आशुतोष गोवारीकर, अविनाश गोवारीकर, साजिद नाडियाडवाला, साजिद खान, अभिजात जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

पोस्टर प्रदर्शित झाल्यापासून या चित्रपटाची अनेकांना उत्सुकता लागलेली असतानाच आता ही उत्सुकता आणखी वाढवण्यासाठी या चित्रपटाचा जबरदस्त प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. अंगावर शहारा आणणाऱ्या या ट्रेलरने प्रेक्षकांच्या मनात असंख्य प्रश्न उपस्थित केले आहेत. राजेश मापुस्कर दिग्दर्शित या चित्रपटात धैर्य घोलप, सायली पाटील यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

खरंतर या चित्रपटाच्या पोस्टरपासूनच हा चित्रपट म्हणजे माननीय राज ठाकरे यांचा बायोपिक असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. अखेर ट्रेलर पाहून या चर्चेला पूर्णविराम लागला असून आपली प्रेमकहाणी पूर्ण करण्यासाठी गावात राज ठाकरे यांना घेऊन येण्यासाठी मुंबईत निघालेल्या एका सामान्य तरुणाची असामान्य कहाणी यात पाहायला मिळणार असल्याचे दिसत आहे. ट्रेलरमध्ये प्रतापचा राज ठाकरे यांच्यापर्यंत पोहोचण्याचा संघर्षमयी प्रवास दिसत आहे. प्रताप त्याचे ध्येय साध्य करू शकेल का? या प्रश्नाची उकल १० ऑक्टोबरला होणार आहे.

ट्रेलर पाहून प्रेक्षकांना प्रचंड उत्सुकता आहे ती, या चित्रपटात राज ठाकरे स्वतः अभिनय करणार आहेत का? याचे उत्तरही प्रेक्षकांना चित्रपट पाहूनच मिळणार आहे. 'येक नंबर'मध्ये मलायका अरोरा हिची झलकही दिसत आहे. त्यामुळे 'येक नंबर'मधून मलायकाने मराठी सिनेसृष्टीत पदार्पण केले आहे. यापूर्वी चित्रपटातील 'जाहीर झालं जगाला' या प्रेमगीताने प्रेक्षकांना भुरळ घातली असून सध्या हे गाणे प्रचंड गाजत आहे. ■ ■

## लोकरंजन

# पुन्हा एकदा साडे माडे तीनच्या चित्रीकरणाचा शुभारंभ

काही दिवसांपूर्वी अंकुश चौधरी दिग्दर्शित पुन्हा एकदा साडे माडे तीन या चित्रपटाची सोशल मीडियावर घोषणा करण्यात आली होती. सतरा वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटातील कुरळे ब्रदर्सने अवघ्या महाराष्ट्राला आपलेसे केले. आता पुन्हा एकदा हे कुरळे ब्रदर्स धमाका करायला येणार असून नुकताच पुन्हा एकदा साडे माडे तीनच्या चित्रीकरणाचा शुभारंभ झाला आहे.


या चित्रपटात अशोक सराफ, भरत जाधव आणि मकरंद अनासपुरे यांच्यासह कोण झळकणार याची सगळ्यांनाच उत्सुकता लागून राहिली होती. हे सरप्राईजही आता समोर आले असून यात सिद्धार्थ जाधव, रिंकू राजगुरू आणि संकेत पाठकही प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. पुन्हा एकदा साडे माडे तीनमधील ही तगडी स्टारकास्ट पाहता हा सिनेमा पुन्हा एकदा बॉक्स ऑफिस गाजवणार, हे नक्की !



संजय जाधव या चित्रपटाचे छायाचित्रण करणार आहेत. अमेय विनोद खोपकर पिक्चर्स, उदाहरणार्थ निर्मित, न्युक्लिअर पिक्चर्स प्रस्तुत या चित्रपटाचे सुधीर कोलते, ओंकार सुषमा माने, स्वाती खोपकर निर्माते असून निनाद नंदकुमार बत्तीन, वर्डविझर्ड एंटरटेंनमेट सहनिर्माते आहेत. या चित्रपटाच्या निमित्ताने एव्हीके पिक्चर्स आणि उदाहरणार्थने वर्डविझर्डसोबत हातमिळवणी केली असून हे आणखी दोन चित्रपट घेऊन लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. ■ ■

## : टेलीनामा :

# महाराष्ट्राच्या महानायकाचं छोट्या पडद्यावर दमदार कमबॅक



हिंदी-मराठी कलाविश्वातील हरहुन्नरी अभिनेते म्हणून अशोक सराफ यांना ओळखलं जातं. अशोक मामांनी आजवर अनेक सुपरहिट चित्रपट, मालिका आणि नाटकांमध्ये काम केलंय. मध्यंतरी काही दिवस ते छोट्या पडद्यापासून दूर होते. पण आता पुन्हा एकदा छोटा पडदा गाजवायला ते सज्ज आहेत.

येतोय 'महाराष्ट्राचा महानायक' लवकरच, असं म्हणत 'कलर्स मराठी'ने मालिकेची पहिली झलक आऊट केली होती. त्यामुळे या मालिकेबद्दल प्रेक्षकांमध्ये कुतूहल निर्माण झालं होतं. आता मालिकेचा पहिला प्रोमो आऊट करत प्रेक्षकांना एक खास सरप्राईज देण्यात आलं आहे. 'कलर्स मराठी'च्या 'अशोक मा.मा.' या मालिकेच्या माध्यमातून ते छोट्या पडद्यावर दमदार कमबॅक करत आहेत.

टेलिव्हिजनचा पडदा व्यापून टाकायला महाराष्ट्राचा महानायक परत येतोय. नुकताच 'अशोक मा.मा.' या मालिकेचा उत्कंठा वाढवणारा प्रोमो आऊट झाला आहे. प्रोमो पाहताक्षणी काहीतर गूढ, थरारक असल्याचं जाणवतंय. प्रत्येक गोष्टीची खबरदारी घेणारे, अत्यंत शिस्तप्रिय, काटेकोरपणे वागणारे अशोक मामा दिसत आहेत. तसेच 'शिस्त म्हणजे शिस्त' हा त्यांच्या आयुष्याचा फंडा असल्याचं प्रोमोमध्ये स्पष्ट होत आहे.

पण त्यांच्या मिश्कील अंदाजाने सर्वांच्या चेहऱ्यावर ते हसू आणणार आहेत. प्रोमोतील शेवटच्या फ्रेममध्ये दारावर लावलेल्या नेम प्लेटमध्ये 'अशोक मा.मा.' असं दिसत आहे. एकंदरीतच अशोक मामा आणि मालिकेतील त्यांच्या पात्राचं नाव सारखंच आहे.या मालिकेत अशोक मामांसह आणखी कोणते कलाकार झळकणार? मालिका कधीपासून सुरू होणार? या सर्व प्रश्नांची उत्तरे प्रेक्षकांना लवकरच मिळणार आहेत. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# मालवणमध्ये महिलेला पेट्रोल ओतून जाळले

■ **वृत्तसंस्था, सावंतवाडी, दि. २६:**

मालवण येथे भाग्यश्वरी गोवेकर (पूर्वाश्रमीची प्रीती केळुस्कर) या महिलेवर तिच्या पहिल्या पतीने पेट्रोल ओतून जाळल्याने ती काल रात्री मृत्यू पावली.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर संतप्त बनलेल्या मालवणातील सर्वपक्षीय महिलांनी आक्रमक पवित्रा घेत आज मोर्चा काढत मालवण पोलीस स्थानक व तहसील कार्यालयावर जमाव करत पोलिसांना निवेदन सादर करून या प्रकरणतील आरोपी असणारा त्या मृत महिलेचा पहिला पती सुशांत गोवेकर याच्यावर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी केली.

या प्रकरणी मयत महिलेचा पती सुशांत गोवेकर याला जामीन मिळू नये, कोणत्याही वकिलाने त्याचे वकीलपत्र घेऊ नये, फाशीची शिक्षा व्हावी, अशी आग्रही मागणी महिलांनी केली. तसेच हा आरोपी जामीनावर सुटल्यास आम्ही महिला मिळून त्याला जाळून टाकू, असा संतप्त इशारा महिलांनी दिला.

# अक्षय शिंदेच्या आई वडिलांना संरक्षण द्या

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २६:**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे याचा २३ सप्टेंबरला एन्काऊंटर करण्यात आला. यानंतर अक्षयच्या आई वडिलांनी पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत. आज अक्षयच्या वडिलांच्या वकिलांनी एक नवी मागणी केली आहे.

आम्ही माननीय न्यायालयाला विनंती केली आहे की बदलापूरमध्ये अक्षय शिंदेचा मृतदेह पुरण्यासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी. कारण मृतदेह दफन करण्यासाठी जागा मिळत नाही. त्या विषयावर सरकारच्या वतीने सांगितलं की आम्ही त्याबाबत योग्य ती काळजी घेऊ. पण संध्याकाळपर्यंत जागा मिळालेली नाही.

आज सकाळी पुन्हा एकदा अक्षय शिंदेच्या आई वडिलांना बोलवण्यात आलं होतं. दोन ते तीन ठिकाणी त्यांना जागा दाखवण्यात येईल. तसंच अक्षय शिंदेच्या आई वडिलांना संरक्षण दिलं जावं अशी मागणी आम्ही न्यायालयात केली आहे. किरीट सोमय्यांना जसं संरक्षण दिलं तसंच अक्षय शिंदेच्या आई वडिलांना सुरक्षा द्यावी. कारण त्यांच्यावर आधीही हल्ला झाला आहे. जी काही टीका माझ्यावर केली जाते आहे ती सरकार स्पॉन्सर्ड आहे. अक्षय शिंदेने नेमकं काय केलं? चार्जशीटच समोर आलेली नाही. शाळेचे मुख्य आरोपी पोलिसांच्या हाती लागत नाही हे सरकारचं अपयश आहे. अक्षय शिंदेच्या आई वडिलांच्या जिवाला धोका आहे त्यामुळे त्यांनी संरक्षण मागितलं आहे. अशी माहिती अमित कटारनवरे यांनी दिली आहे.

दरम्यान, अक्षय शिंदे याच्या एन्काऊंटरवर न्यायालयात प्रकरण सुरू असून, न्यायालयाने या प्रकरणात सरकार आणि पोलीस खात्यावर कठोर शब्दात ताशेरे ओढले आहेत. याप्रकरणावरून विरोधकांनीही सरकारला घेरण्याचे प्रयत्न चालविले आहेत.

# शहांना काँग्रेसचे भय?

**विदर्भ डायरी**
**मनोज बागडे**



भाजपाचे वजनदार आणि क्रमांक २ चे नेते तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा परवा नागपुरात येवून गेलेत. येथील सुरेश भट सभागृहात आयोजित आढावा बैठकीत त्यांनी भाजपाचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना कानमंत्र देण्याबरोबरच विजयाचा फॉर्म्युलाही सांगितला.

अमित शहा यांनी निवडणूक जिंकण्याचे फंडे सांगत असताना काँग्रेसवर विशेष फोकस केल्याचे दिसून आले. शहा म्हणाले, काँग्रेस विरोधात भाजप ज्या जागा हरेल, त्या जागांच्या जोरावर काँग्रेस सत्तेच्या जवळ जाईल. म्हणून काँग्रेसला विदर्भात पराभूत करणे आवश्यक आहे. त्यांच्या या वक्तव्यावरून या वजनदार नेत्यासह भाजपाने काँग्रेसचा धसका घेतला आहे, असे म्हणणे अतिशयोक्तीपूर्ण ठरणार नाही.

चार महिन्यांपूर्वी देशात लोकसभेच्या निवडणुका झाल्यात. निवडणुकांपूर्वी भाजपाने खंडीभर दावे केले होते. महाराष्ट्रातील भाजपा नेत्यांनी तर काँग्रेस आणि महाविकास आघाडी पार भूईसपाट होणार असल्याचे छातीठोकपणे सांगितले होते. भाजपाचा नारा होता... अबकी बार ४०० पार. त्यावेळी भलत्याच फॉर्मात असलेले भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे जिथे गेलेत तिथे त्यांनी एकच टेप वाजविली, महाराष्ट्रात भाजपा आणि महायुती ४५ पार. या फाजिल आत्मविश्वासाचे पुढे काय झाले, निकाल सांगतोच.

विदर्भातील लोकसभेच्या १० जागांपैकी भाजपाला केवळ २ जागा जिंकत्या आल्या. नितीन गडकरी यांचे विकासाभिमूख काम त्यांच्या कामी आले. अकोल्यातून भाजपा उमेदवार तरले. बुलढाण्यातून प्रताप पवार यांनी महायुतीची लाज राखली. उर्वरीत जागांवर भाजपा आणि महायुती तोंडघशी पडली. भंडारा आणि रामटेक या दोन मतदारसंघात अगदीच नवख्या उमेदवारांनी भाजपा, शिंदेसेनेला चारीमुंड्या चीत केले. दुसरीकडे, भाजपाकडून पदोपदी हिणविल्या जाणाऱ्या काँग्रेसने लोकसभा निवडणुकीत किमान महाराष्ट्रात तरी त्यांना जमिन दाखवली.

लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची तर पार धुळधाण झाली. शिंदे गटाला काही सन्मानजनक जागा मिळाल्या खऱ्या. परंतु, महाराष्ट्रातील बहुतेक मतदारसंघात भाजपाचे पानिपत झाले. अर्थात, या पराभवापासून भाजपाने निश्चितच धडा घेतला असला पाहिजे आणि त्यादृष्टीने त्यांनी विधानसभेसाठी तयारीही सुरू केली असावी. म्हणूनच, प्रधानमंत्री नरेंद्र मोदींपासून अमित शहा आणि अन्य ज्येष्ठ नेते महाराष्ट्रावर अधिक फोकस करीत आहेत.

तेल लावून दंड थोपटणारे अनेक पहेलवान लोकसभेत कामी लावले असतानाही लाजिरवाणा पराभव नशिबी आला म्हणून भाजपाचे बडे नेते महाराष्ट्रावर लक्ष केंद्रित करू लागले आहेत.

राज्यात काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी आघाडीत आहे. मतभेद असले तरी ते ताकदीने विधानसभेला सामोरे जाणार असल्याचे सांगताहेत. आघाडीची ही एकजूट महायुतीला नको आहे. विशेषतः राज्यात काँग्रेसची वाढलेली ताकद त्यांना कमी करावयाची आहे. म्हणूनच की काय, अमित शहा यांनी विदर्भात काँग्रेसला पराभूत करण्याचे स्पष्ट निर्देश दिले असावेत.

बंडखोरी किंवा मतभेदातून होणारी फूट खपवून घेतली जाणार नाही, असे सांगताना महाराष्ट्रात शासकीय योजनांच्या २ कोटी ४७ लाख लाभार्थ्यांपर्यंत केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती पोहचवा, त्यांना वारंवार भेटा, सरकारचे काम सांगा, हे सांगायला शहा विसरले नाहीत. आगामी निवडणुकांमध्ये बूथवर दहा टक्के मत वाढवा, विजयादशमी ते धनत्रयोदशी या ११ दिवसांत बुथ क्षेत्रात बाईक रॅली काढा, प्रचार करा, सरपंच पदाची निवडणूक पराभूत झालेल्या लोकांना भेटून त्यांना पक्षाशी जोडा, बुथवर विरोधी पक्षांचे जे कार्यकर्ते आहेत, त्यांना आपल्या पक्षाशी जोडा, विरोधी पक्षाचे बुथ रिकामे करा, त्यांचे कार्यकर्ते आपल्यासोबत जोडा, असे निर्देश शाह यांनी दिलेत.

जंग और मोहब्बत मे सबकुछ जायज होता है, या म्हणीमध्ये आता राजनिती हा शब्दही जोडला गेला आहे. राजकारणातही सबकुछ जायज होता है, यानुसार भाजपा कामाला लागली आहे. परंतु, किमान महाराष्ट्रात जे होते आहे, ते भाजपा आणि महायुतीच्या फायद्याचे होते आहे का? याचाही विचार या बड्या नेत्यांनी करायला हवा.

नियोजनशुन्य कारभार आणि कदाचित भ्रष्टाचार यामुळे छत्रपतींचा सागर किनारी असलेला पुतळा कोसळला, त्याचे सरकारला गांभिर्य नाही. चिमुकल्या मुलींवर बलात्कार करणाऱ्या आरोपीचा थेट एन्काऊंटर केला जातो आहे. अशा एकना अनेक घटना आहेत. मात्र, सरकार चलता है... म्हणत अद्यापही फाजिल आत्मविश्वास बाळगून आहे. विधानसभेची निवडणूक तोंडावर आली आहे, पुढच्या महिना दोन महिन्यात महाराष्ट्राला आणखी काय काय पाहावे लागणार आहे? कुणास ठाऊक. परंतु, भाजपा आणि महायुतीला येथे सर्वस्व पणाला लावावे लागणार आहे, हे मात्र त्यांनी ध्यानात ठेवायला हवे.

# महासागर नागपूर वृत्तसागर

▪ शुक्रवार, दि. २७, सप्टेंबर २०२४ ▪


# ८ महिन्यांत नागपुरातून १३०० हून अधिक महिला बेपत्ता

## प्रेमप्रकरण, अनैतिक संबंधांतून पलायन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर दि. २६ :**

गेल्या काही महिन्यांपासून नागपुरातील महिला-तरुणींचे पलायन किंवा बेपत्ता होण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे. गेल्या आठ महिन्यांत शहरातून १ हजार ३०० पेक्षा जास्त महिला बेपत्ता झाल्या. तब्बल १४८ महिलांचा अद्यापही थांगपत्ताही लागला नाही, हे विशेष. घरातून बेपत्ता झालेल्या महिलांमध्ये प्रियकरासोबत पळून जाणे किंवा अनैतिक संबंधातून घर सोडणाऱ्या महिलांचा सर्वाधिक टक्का असल्याची धक्कादायक माहिती पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे.

नागपूर पोलिसांच्या निष्क्रिय धोरणामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असतानाच आता महिला सुरक्षेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरात गुन्हेगारांची हिम्मत वाढत असून अवैध धंद्यांना ऊत आला आहे. पोलीस आयुक्तांनी वारंवार सूचना दिल्यानंतरही ठाणेदार अवैध धद्याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष करीत आहेत. गेल्या काही महिन्यांपासून शहरातून महिला बेपत्ता आणि पलायन केल्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते अभय कोलारकर यांना मिळालेल्या माहितीनुसार, जानेवारी ते ऑगस्ट २०२४ पर्यंत १ हजार ३१० महिला बेपत्ता झाल्याची नोंद पोलिसांनी केली आहे. बेपत्ता झालेल्या महिलांमध्ये अनैतिक संबंध किंवा प्रेमप्रकरणाचा सर्वाधिक समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. तर काही महिला कुटुंबियांच्या रागावर किंवा कुटुंबियांचा त्रास सहन न झाल्याने घर सोडण्याचा निर्णय घेतात.

> शहरातून बेपत्ता झालेल्या महिलांच्या तक्रारींकडे गांभीयार्ने बघितल्या जाते. पथके तयार करुन तांत्रिक पद्धतीने तपास करीत त्या महिलांचा शोध घेण्यात येतो. त्यामुळे बेपत्ता महिलांना शोधण्यात मोठ्या प्रमाणात यश येते.
>
> **ललिता तोडासे**
> **वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
> **अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक पथक**

तरुणींच्या बेपत्ता होण्यामागे प्रेमविवाह करण्यासाठी प्रियकरासोबत पलायन करणे किंवा नोकरीच्या शोधात घर सोडल्याचे कारण समोर आले आहे. महिला बेपत्ता झाल्याची तक्रार घेण्यास पोलीस टाळाटाळ करतात. तक्रार घेतल्यानंतर प्रकरण प्रलंबित ठेवतात. महिलांच्या शोधासाठी पुरेपूर प्रयत्न पोलीस करीत नसल्याच्या तक्रारी कुटुंबिय करीत असतात. त्यामुळे पोलिसांनीही अशा तक्रारींचे गांभीर्य लक्षात घेऊन बेपत्ता महिलांचा शोध घेण्यात प्राधान्य द्यायला हवे, अशी मागणी होत आहे.

प्रेमाचे आमिष दाखवून प्रियकरासोबत पलायन करुन गेलेल्या अनेक तरुणी-महिलांची फसगत होते. महिन्याभरात प्रेमाचा रंग उडतो. आर्थिक चणचण भासल्यानंतर दोघांचेही जगणे खडतर होते. पळून गेलेल्या तरुणींना बदनामीच्या भीतीपोटी कुटुंबीय पुन्हा घरात घेत नाहीत. त्यामुळे अनेकदा पळून गेलेल्या तरुणींना नाईलाजाने देहव्यवसायाचा मार्ग निवडावा लागतो, अशी माहिती समोर आली आहे.

# रितू मालूची तुरुंगात रवानगी

## * न्यायालयाने सीआयडीची पीसीआरची मागणी फेटाळली

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर दि. २६ :**



बहुचर्चित रामझुला हिट अँन्ड रन प्रकरणात आरोपी रितिका उर्फ रितू दिनेश मालू (39) हिला अखेर पोलिसांनी अटक केली. राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी)च्या पथकाने न्यायालयातून विशेष परवानगी घेत रात्री 1.45 वाजताच्या सुमारास तिला तिच्या घरून ताब्यात घेतले. सकाळी 5.30 वाजता तिला अधिकृतरित्या अटक करण्यात आली. रितूचा जामीन अर्ज बुधवारी सत्र न्यायालयाने फेटाळल्यानंतर तिचा अटकेचा मार्ग मोकळा झाला होता. गुरुवारी दुपारी रितूला प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी ए. व्ही. खेडकर यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. सीआयडीचे अधिकारी आणि सरकारी वकिलाने 10 दिवसांची पोलिस कोठडी मागितली. मात्र न्यायालयाने अभियोजन पक्षाची मागणी फेटाळली आणि रितूला न्यायालयीन कोठडीत नागपूर मध्यवर्ती कारागृहात रवाना केले. त्यामुळे या प्रकरणात दोन्ही पक्षांना झटका लागला आहे. एकिकडे सीआयडीची कोठडीची मागणी फेटाळण्यात आली, तर दुसरीकडे मालूला तुरुंगात जावे लागले. त्यामुळे आता हे प्रकरण विधि क्षेत्रात चर्चेचा विषय ठरत आहे.

बुधवारी रितूचा जामीन अर्ज रद्द झाल्यानंतर सीआयडीने महिला आरोपी असल्यामुळे रात्री उशिरा जेएमएफसी न्यायालयाकडे तिला अटक करण्याची परवानगी मागितली. न्यायालयाने अटक करण्याची परवानगीही दिली. त्या आधारावर सीआयडीचे अधिकारी फौजफाट्यासह रात्री 1.30 वाजता रितूच्या घरी पोहोचले आणि तिला ताब्यात घेण्यात आले.

सकाळी 5.30 वाजता तिला अटक करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली. दुपारच्या सुमारास तपास अधिकारी क्षीरसागर यांनी रितूला जेएमएफसी न्यायालयात हजर केले. आरोपीने तपासात कोणतेही सहकार्य केले नसल्याचे न्यायालयाला सांगण्यात आले. अपघाताच्या वेळी ती मद्यधुंद अवस्थेत होती. तिने 2 तरुणांना कारखाली चिरडले आणि जखमी अवस्थेत रस्त्यावर सोडून फरार झाली.

घटनेच्या 5-6 तासानंतर तिला खासगी रुग्णालयातून ताब्यात घेण्यात आले. या दरम्यान तिने रक्तातून अल्कोहलची मात्र कमी करण्यासाठी औषधही घेतले. आतापर्यंत तिचे कपडेही जप्त होऊ शकले नाही. कारमधून ज्या वस्तू गायब झाल्या होत्या त्याही मिळाल्या नाही. तिने तिचा बयानही वेळोवेळी बदलला आहे. आधी ती मैत्रीण माधुरी सारडा गाडी चालवत असल्याचे सांगत होती आणि नंतर ड्रायव्हर वाहन चालवत असल्याचे सांगू लागली. यावरून स्पष्ट आहे की, ती तपास भरकटवण्याचा प्रयत्न करीत होती. तिने पोलिस ठाण्यात वेळोवेळी हजेरी लावली असली तरी याचा अर्थ ती तपासात सहकार्य करीत होती, असा होत नाही. त्यामुळे तिची 10 दिवसांची पोलिस कोठडी मंजूर करण्यात यावी.

बचाव पक्षाचे वकील चंद्रशेखर जलतारे यांनी पोलिस कोठडीला विरोध केला. ते म्हणाले की, तपास यंत्रणेने आधी सर्व मुद्यांवर तपास पूर्ण केला आहे. जे मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत ते सुनावणीदरम्यान उपस्थित झाले पाहिजे. मृतकांच्या कुटुंबाचे वकील अमोल हुंगे यांनी उच्च न्यायालयाने केलेले टिपणींचा उल्लेख करीत रितूला पोलिस कोठडीत पाठविण्याची मागणी केली. न्यायाधीश खेडकर यांनी दोन्ही पक्षांचा युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर रितूची पोलिस कोठडीची मागणी फेटाळत न्यायालयीन कोठडीत तुरुंगात पाठविण्याचे आदेश दिले.

न्यायालयाने सीबीआय बनाम अनुपम कुळकर्णी प्रकरणात सुप्रीम कोटार्ने दिलेल्या ऐतिहासिक निर्णयाच्या आधारावर निर्णय दिला की, पहिल्यांदा आरोपीला ताब्यात घेतल्याच्या 15 दिवसांच्या आत अटक करून पोलिस कोठडीची मागणी करायला पाहिजे होती. या प्रकरणात असे झाले नाही. त्यामुळे सीआयडीची मागणी फेटाळण्यात येते. न्यायालयाने रितूला 10 ऑक्टोबर 2024पर्यंत न्यायलयिन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

# स्व. अरुण मोरधडे स्मृती सन्मान वितरण समारंभ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर दि. २६ :**

नागपुर शहरातील ज्येष्ठ चित्रकार स्व. अरुणजी मोरघडे यचि चित्रकलेल्या क्षेत्रासाठी मोठे योगदान आहे. चित्रकलेचा त्यांचा अभ्यास अतिशय दांडगा होता. त्यांची सामाजिक बांधिलकी असल्यामुळे त्यांनी चित्रांचे विषय देखील त्या दृष्टीनेच रेखाटले आहे. निसर्ग, आदिवासी, ग्रामीण जीवन इत्यादी विषयांनी त्यांच्या चित्रकलेला आयुष्यभर साद घातली. दुर्दैवाने त्यांचे वयाच्या १६ व्या वर्षी निधन झाले.

त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विदर्भ गौरव प्रतिष्ठान व चित्रकर्मी गौरव प्रतिष्ठानच्या संयुक्त वतीने अकरा हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे स्वरुप असलेला "स्व. अरुण मोरघडे स्मृती चित्रकारिता सन्मान" देण्यावे योजिले आहे

२०२४ चा पुरस्कार प्रसिद्ध चित्रकार मा. श्री. अब्दुल मपफार अब्दुल सत्तार यांना देण्यात येणार आहे.

हा पुरस्कार चित्रमहर्षी स्व. अरुण मोरघडे यांच्या स्मृतिदिनी शुक्रवार दि.२७ सप्टेंबर, २०२४ रोजी सायं. ५.०० वाजता महाराष्ट्र राष्ट्रभाषा संकुलातील श्रीमंत बाबुराव वनवटे सभागृह नागपुर येथे दै. सकाळचे निवासी संपादक मा.श्री. प्रमोद काळबांडे यांच्या शुभहस्ते व पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे मागी कुलगुरू, कृषि संशोधक डॉ. शरदराव निंबाळकर व विदर्भ साहित्य संघ, नागपुरचे अध्यक्ष मा.श्री. प्रदीप दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्षा डॉ. गिरीश गांधी राहतील. या प्रसंगी जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन विदर्भ गौरव प्रतिष्ठान आणि चित्रकर्मी गौरव प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.







नागपुरात आज धुंवाधार पाऊस झाला, अनेक रस्ते जलमय झाले होते

## शस्त्रासह गुंडास अटक

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर दि. २६ :**

तहसील पोलिसांनी गुरुवारी पहाटे गस्तीदरम्यान एका गुंडाला शस्त्रासह अटक केली. अब्दुल आरिस अब्दुल रशीद (38) रा. गांधीबाग खदान असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पहाटे 5 वाजताच्या सुमारास तहसील पोलिसांचे डीबी पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते.

या दरम्यान एक रेकॉर्डवरील गुंड अग्रसेन चौकाजवळ शस्त्र घेऊन फिरत असल्याची माहिती मिळाली. पोलिस तत्काळ परिसरात पोहोचले. पोलिसांना पाहताच आरिसने पळ काढला. पाठलाग करून त्याला पकडण्यात आले. झडतीमध्ये त्याच्याजवळ चाकू मिळाला.

तो एखादा गुन्हा करण्याच्या उद्देशाने परिसरात फिरत होता, असा संशय पोलिसांना आहे. आरिसवर यापूवीर्ही गुन्हे नोंद झाले आहेत. त्यामुळे पोलिस त्याची कसून चौकशी करीत आहेत. पुढील तपास पोलीस करीत आहे.

## ट्रांसपोर्टरवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

### निष्काळजीपणामुळे मजुराचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर दि. २६ :**

लकडगंज ठाण्यांतर्गत ट्रांसपोर्ट कंपनीत काम करताना एका मजुराचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात पोलिसांनी तपासाअंती ट्रांसपोर्टरवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदविला आहे. राहुल ओझा असे आरोपी ट्रांसपोर्टरचे नाव आहे. गयाप्रसाद मेहतर शाहू (60) रा. पारडी असे मृताचे नाव आहे. राहुलची शिवशक्ती ट्रांसपोर्ट नावाने कंपनी आहे. मृतक शाहू हे हमालीचे काम करीत होते.

गत 5 सप्टेंबरच्या सायंकाळी गयाप्रसाद हे शिवशक्ती ट्रांसपोर्ट कंपनीच्या कार्यालयात ट्रकमधून माल उतरवत होते. या दरम्यान ट्रकमधून एक बॉक्स गयाप्रसाद यांच्या अंगावर पडला. वजनदार बॉक्स अंगावर पडल्याने गयाप्रसाद गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारार्थ मेयो रुग्णालयात भरती करण्यात आले होते.

बुधवारी उपचारादरम्यान गयाप्रसाद यांचा मृत्यू झाला. लकडगंज पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला. तपासात ट्रांसपोट मालक राहुल ओझा याने मजुरांच्या सुरक्षेसाठी कोणतीही व्यवस्था केली नव्हती. त्याच्या निष्काळजीपणामुळेच गयाप्रसाद यांचा मृत्यू झाल्याचे पुढे आले. त्यामुळे पोलिसांनी ओझाविरुद्ध कलम 106 (1) अन्वये गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## लुटपाट करणारी आंतरराज्यीय टोळी गजाआड

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर दि. २६ :**

गुन्हे शाखा युनिट 4 च्या पथकाने मोठ्या शिताफिने जबरी चोरी व वाहन चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीच्या मुसक्या आवळल्या. गोपनिय माहितीच्या आधारे नंदनवन परिसरातून ताब्यात घेतले. सखोल चौकशीत त्यांच्यावर अजनी ठाण्यासह झारखंड, छत्तीसगढ राज्यात वाहन चोरी व लुटपाटचे गुन्हे नोंद असल्याची माहिती मिळाली. सोनूकुमार नट (32), आकाशकुमार नट (30) आणि वासुदेव नट (47) तिन्ही राहणार पत्थलगांव, छत्तीसगड अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. फियार्दी प्रल्हाद पाटील (82) हे मेडिकल चौक येथील स्टेट बँक येथून पेंशनची 40 हजार रुपयांची रक्कम घेवून ई रिक्षाने शताब्दी चौकात आले. तेथून पायदळ घरी जात असताना काळ्या रंगाच्या दुचाकीवर असलेले दोन तरुण समोरून त्यांच्याजवळ आले. मागे बसलेल्या तरुणाने त्यांच्या हातातील पिशवी हिसकावली आणि दोघेही पळून गेले. पाटील यांच्या तक्रारीवरून अजनी पोलिसांनी गुन्हा नोंदविला. गुन्हे शाखा युनिट 4चे पथकही गुन्ह्याचा समारंतर तपास करीत होते. दरम्यान आरोपी नंदनवन परिसरात असल्याची गोपनिय माहिती पथकाला मिळाली. पथकाने मोठ्या शिताफिने तिघांच्याही मुसक्या आवळल्या. सखोल चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. सखोल चौकशीत प्रतापनगर ठाण्यांतर्गत जबरी चोरी, झारखंड आणि छत्तीसगढमध्ये वाहन चोरीसह एकूण 6 गुन्हे केल्याची कबुली दिली.

आरोपींचा गुन्हे अभिलेख तपासला असता पोलिस ठाणे सरखंडा, तोरवा येथील जबरी चोरी व वाहन चोरीच्या गुन्ह्यात पाहिजे असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी आरोपीं जवळून रोख 66 हजार, दुचाकी वाहन, तीन जोड नवीन कपडे, दोन बॅग असा एकूण 2 लाख 12 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. पुढील कारवाईसाठी अजनी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# कवितांच्या क्षेत्रात वैदर्भीय कवींचे वर्चस्व : डॉ. अक्षयकुमार काळे

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर दि. २६ :**

विदर्भाला कवींची मोठी परंपरा लाभली आहे. गेल्या 125 वर्षांच्या कालखंडात विदभार्तील कवींनी मोठी कामगिरी केली आहे. गुणगुंजन काव्य, भावगीत परंपरा, राष्ट्रवादी कविता, सामाजिक कविता, साम्यवादी कविता, अस्तित्ववादी कविता, आंबेडकरवादी कविता, आदिवासी कविता अशा विविध प्रकारांत विदभार्तील कवींनी आपला ठसा उमटवला आहे, असे प्रतिपादन डॉ. अक्षयकुमार काळे यांनी केले.

विदर्भ साहित्य संघातर्फे कविता डॉट कॉम- विदर्भ कवितेचे नवे युग या ज्येष्ठ कवयित्री मनीषा अतुल यांनी संपादित केलेल्या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा गुरुवारी आयोजित करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.




विदर्भ साहित्य संघाच्या अमेय दालनात झालेल्या व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, अप्पर आयुक्त (आदिवासी विभाग) (भा.प्र.से) रवींद्र ठाकरे, प्रमुख अतिथी 91 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. अक्षयकुमार काळे, रा.तु.म. विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख, तसेच भाष्यकार डॉ. शैलेंद्र लेंडे, कविता संग्रहाच्या संपादिका मनीषा अतुल उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली.

डॉ. अक्षयकुमार काळे पुढे म्हणाले, कुठल्याही संपादित ग्रंथामध्ये कालक्रमाला खूप म हत्त्व आहे. ते पाळलं जायला हवं. क्रोनोलॉजीमध्ये कालगणना शास्त्राला महत्त्व आहे. संपादक हा शास्त्राशी बांधलेला असतो. त्याला शास्त्राप्रमाणे काम करायला हवं. या संग्रहाचं नाव कविता डॉट कॉम असं आहे. ते आधुनिक वाटतं. पण त्यामुळे वैदर्भीय कवितेला महत्त्व कमी मिळालं असं मला वाटतं. विदभार्ला मोठ्या कवींची परंपरा लाभली आहे. कवीजवळ प्रतिभा नसेल तर त्या कविता सुचू शकत नाही. काव्यामध्ये शब्दांना अतिशय महत्त्व आहे. ज्या वैभवशाली काव्य परंपरेचे आपण वारसदार आहोत ही गोष्ट नवकवींनी लक्षात ठेवावी, असे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रास्ताविकात मनीषा अतुल म्हणाल्या, विदभार्तील गेल्या 40 वर्षांतील कविता आपल्याला या ग्रंथातून मिळेल. कविता विदभार्ची हा आशा सावदेकरांचा एकमेव ग्रंथ आमच्यापुढे होता. माझ्यासमोर तीन पिढ्या होत्या. तीन पिढ्यांचे कवी कसे यात घ्यायचे हा प्रश्न होता. पण तो सुवर्णमध्य साधण्याचा मी प्रयत्न केलाय. वेगवेगळ्या काव्यप्रवाहातील कवी, विदभार्तील सर्व प्रांतांच्या कवींचा यात समावेश व्हावा, याचा मी प्रयत्न केला आहे. 2000 ते 2015 या काळातील कवींचा यात समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर कविता डॉट कॉम-वैदर्भीय कवितेचे नवे युग या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

यावेळी रवींद्र ठाकरे म्हणाले, कवितासंग्रहात सर्वांना स्थान देणे हे एक जिकरीचं काम आहे ते मनीषाताईंनी केलं आहे. कवी असणं वेगळं आणि कवितांचं संपादन करून योग्य कवितांना स्थान देणं याकरिता वेगळं सामर्थ्य लागतं. एक चांगली साहित्यकृती जन्माला आली आहे. कवीमध्ये संवेदनशीलता असते, तसेच प्रशासकीय काम करणारे देखील संवेदनशील असायला हवे. नाहीतर ते यंत्रवत ठरतील, असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात प्रदीप दाते म्हणाले, कविता डॉट कॉम- विदर्भ कवितेचे नवे युग या संग्रहामध्ये ज्यांचा समावेश झाला अशा सर्व कवींचे मी आभार मानतो. मान्यवरांनी जी अभ्यासक मतं मांडली ती पुढील पिढीला मार्गदर्शक ठरतील, असे ते म्हणाले. भाष्यकार डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी, या संपादित ग्रंथांतून अनेक कवींना स्थान मिळाले आहे. संपूर्ण काव्य दृष्टी आणि काव्य सृष्टी या संपादित ग्रंथामधून बघायला मिळते. 1990 नंतर च्या कवितांना संपादित करण्याचे काम मनीषा अतुल यांनी या ग्रंथाद्वारे केले आहे. या ग्रंथाला अतिशय साक्षेपित प्रस्तावना लाभली आहे.

यातून वैदर्भीय नव्वदोत्तरी कविता आपल्यापुढे आली आहे आणि त्या कवितांची उकल प्रस्तावनेतून त्यांनी केली. या ग्रंथाच्या प्रस्तावनेचा स्वतंत्र विचार करावा लागेल. नव्या साहित्याचा अदमास या ग्रंथातून पाहायला मिळतो. या ग्रंथामध्ये अनेक प्रवाहांना संपादित केले असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन आणि आभारप्रदर्शन प्रकाश एदलाबादकर यांनी केले. कार्यक्रमाला सरचिटणीस विलास मानेकर, उपाध्यक्ष राजेंद्र डोळके, सना पंडित, नितीन सहस्त्रबुद्धे आदी उपस्थित होते.

# बेसा पिपळा परिसर होणार कचरामुक्त

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २६ :

नगर पंचायत बेसा पिपळा येथील कचऱ्याची समस्या आता संपण्याच्या मार्गावर असल्याचे दिसत आहे. ग्रामपंचायतीच्या काळात केवळ ५ कचरा उचलणारी वाहने होती. नगर पंचायत स्थापन होताच प्रशासक तथा मुख्याधिकारी भरत नंदनवार यांनी 10 कचरा वाहनांची व्यवस्था केली. मात्र अल्पावधीतच ती वाहनेही कचरा उचलण्यात कमी पडल्याने आणखी 5 नवीन कचरा उचलणाऱ्या वाहनांची व्यवस्था करण्यात आली.

शहरात दररोज 20 कचरा वेचक वाहने धावत आहेत. संपूर्ण नगर पंचायत संकुलातील प्रत्येक घराघरात पोहचून ओला व सुका कचरा गोळा करताना लोकांची होणारी अडचण दूर व्हावी व आरोग्याच्या दृष्टीने संकुल स्वच्छ व सुंदर व्हावे यासाठी मुख्याधिकाऱ्यांनी शासनाकडे पुन्हा एकदा 5 कचरा संकलन वाहनांची मागणी केली. प्रशासक भरत नंदनवार म्हणाले की, या वाहनाद्वारे संकुलातील 30 हजार घरांपर्यंत दररोज कचरा उचलण्याची सेवा पोहोचवली जाईल.



नगर पंचायत अंतर्गत बेसा, पिपळा,घोगली आणि बेलतरोडी हे चार गावांचे संकुल आहे. या गावांमध्ये शेकडो लेआउट आहेत. हे संकुल कचरामुक्त करून संकुलातील नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहावे व हे संकुल कचरामुक्त करून राज्यात प्रथम क्रमांकावर आणण्याच्या उद्देशाने प्रशासक नंदनवार यांनी येथील कचरा संकलनाचे आयोजन केले आहे.

संकलनासाठी कर्मचारीही वाढवण्यात आले आहेत. जेणेकरून लोकांना सुका व ओला कचरा वाहनांमध्ये टाकणे सोपे होईल. नियमितपणे कचरा उचलण्यासाठी नंदनवार यांनी स्वच्छता विभागाचे अभियंता यांना दररोज घरोघरी जाऊन कचरा संकलनाची वाहने घेऊन जाण्याबाबत माहिती दिली.

आरोग्य अभियंता पूजा जाधव यांनी सांगितले की, न.प. कॅम्पसमध्ये दररोज सुमारे 30 हजार घरांचा कचरा उचलण्यासाठी सध्या 20 कचरागाड्या आहेत. हा परिसर बराच मोठा असल्याने शासनाकडे आणखी ५० कचरा संकलन वाहनांची मागणी करण्यात आली आहे.

रस्त्यावर कुठेही कचरा किंवा घाण राहू नये आणि परिसर स्वच्छ व सुंदर राहावा यासाठी ओला व सुका कचरा गोळा करणे, तो वेगळा करणे, बेअरिंग मशिनमध्ये टाकणे व त्याची भंगार विक्री करणे ही प्रक्रिया नियमितपणे केली जाते. यासाठी न.प.चे सचिन संधेकर, सुभाष बनाईत यांच्यासह कर्मचारी कार्यरत आहेत.

नगर पंचायत संकुल मध्ये सुमारे 1.25 लाख लोक 30,000 घरांमध्ये राहतात. ओला आणि सुका कचरा मिसळून दररोज 14 ते 15 टन कचरा जमा होतो. त्या कचऱ्याचे 30 प्रकारात विभाजन करून, ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून कंपोस्ट आणि सुका कचरा बनवून तो विक्रेत्यांना विकून नगर पंचायतीने उत्पन्न मिळवण्यास सुरुवात केली आहे. प्लॅस्टिक चप्पल, शूज, काचेच्या बाटल्यांचे वर्गीकरण करून व्यवस्था केली आहे.

बेसा कॅम्पस राज्यात प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी प्रशासक तथा मुख्याधिकारी भरत नंदनवार यांनी सर्व विभाग प्रमुखांना कळविले आहे. यासाठी प्रशासकीय व कर निरीक्षक अजय वाघमारे, मोहित राजनकर, आरोग्य अभियंता पूजा जाधव, नगररचना अभियंता अभिजीत हांडे, सार्वजनिक बांधकाम अभियंता विजय सुरवसे, तुषार सेलवट आदी अधिकारी-कर्मचारी विकासकामे व परिसर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

बेसा नगरपंचायत दाखल महाराष्ट्र अग्निशमन दल नागपूर तर्फे बेसा नगरपंचायत सुसज्जीत अशी बुलेट मोटरसायकल भेट देण्यात आली मुख्य अधिकारी भरत नंदनवार यांच्या हस्ते अग्निशमन दलाला सुसज्ज मोटर सायकलचे लोकार्पण करण्यात आले.

# ज्योती पटले हिला रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार प्राप्त

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २६ :

येथील जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थिनी ज्योती पटले हिला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे दिला जाणारा रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. प्रशांत बोखारे यांच्या अध्यक्षतेत आयोजित विद्यापीठ पुरस्कार वितरण सोहळ्यात दीक्षांत सभागृहामध्ये प्रदान करण्यात आला. ज्योती पटले ही बी.ए. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी असून तीने मागील दोन वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजना विभागात कार्यक्रम अधिकारी डॉ. काशिनाथ मानमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत सर्व उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.




राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ज्योती पटले हिने जल व्यवस्थापन, ग्राम स्वच्छता, आरोग्य शिबीर, अंधश्रद्धा निर्मूलन, प्रौढ शिक्षण, मतदार जाणीव जागृती करण्यासाठी पटनाट्य, सांस्कृतिक कार्यक्रम व नेचर ग्रीन क्लबच्याद्वारे घेण्यात आलेले वृक्षारोपणाचे कार्यक्रम या माध्यमातून भरीव असे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य केले. खडगाव येथे घेण्यात आलेल्या दोन महाविद्यालयीन व एक विद्यापीठ स्तरीय शिबिरात सुद्धा तिने सक्रिय सहभाग नोंदविला. या तिच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रणजीतबाबू देशमुख, संस्थेचे संस्थापक डॉ. भाऊसाहेब भोगे, कार्यवाह युवराज चालखोर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे यांनी अभिनंदन केले व तिला भावी जीवनाकरिता शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाधिकारी डॉ. काशिनाथ मानमोडे, डॉ. नितीन कोंगरे, डॉ. नरेंद्र घारड, डॉ. लीना फाटे, डॉ. अर्चना देशमुख, डॉ. कल्पना बोरकर, ग्रीन क्लब समन्वयक डॉ. अविनाश इंगोले व डॉ. मनीषा भातकुलकर, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सुद्धा विद्यार्थिनी ज्योती पटले हिचे कौतुक व अभिनंदन केले.

# मौदा शहरात किरायदार साठी नियम गेले कुठे..?

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. २६ :

मौदा शहर हे ओधोगिग शहर म्हणून जिल्ह्यात ओळख अलीकडे मौदा येथील नागरिकांनी एक मजली चे तीन मजली केले आहे. उत्पनाचे साधन म्हणून घरावर वीणा परवानगी मजले चढविले आहे. मौदा शहरा अंतर्गत 56 कंपन्या येतात त्यामध्ये बरेच परराज्यातिल लोक इथे वास्तव करत आहे. घर मालक ला फक्त किराया मिळाला की तो त्या मध्ये खुश आहे.




वास्तविक किरायचे नियम कोणी पाळत नाही. कियारदार ठेवतानी त्यांचे पोलिस वेरिफिकेशन आवशयक आहे. त्यांचे फोटो आधार कॉर्ड रेंट अग्रीमेंट आवशयक पण याचे पालन शहरात होताना दिसत नाही. त्यांच्या गाड्या भर रोडवर उभ्या असतात. त्यामुळे शहरातील लोकांना त्रास होतो याच्या कड़े स्थानिक नगरपंचायत व पोलिस विभाग यांचे दुर्लक्ष आहे. नागपुर मुंबई या शहरा मध्ये संपूर्ण माहिती देने अनिवार्य आहे, पण मौदा शहरात अस दिसत नाही. एखादी मोठी घटना घड़ली तर प्रसासन जागे होते. पण नियमावलीच काय का एकादी घटना होण्याची वाट नगरपंचायत व पोलिस विभाग बघत आहे काय?

# "स्वच्छता ही सेवा" अंतर्गत सफाई कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :

"स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता' या संकल्पनेस अनुसरून केंद्र सरकारच्या स्वच्छता पंधरवड्यातील स्वच्छता ही सेवा अभियांतर्गत नागपूर महानगरपालिकेद्वारा सफाई मित्र आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

नागपूर महानगरपलिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात व अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांच्या नेतृत्वात मनपाच्या दहाही झोन निहाय स्वच्छता ही सेवा अभियान राबविण्यात येत आहे. याद्वारे मनपाच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रावर शहराच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र कार्यरत सफाई कर्मचाऱ्यांकरिता आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात येत आहे.

आरोग्य शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूद्वारे स्वच्छता कर्मचाऱ्यांना आरोग्य विषयी मार्गदर्शन केले जात आहे. याशिवाय शुगर, रक्तदाब, व्हायरल इन्फेक्शन व रक्त तपासणी करण्यात येत आहे.

तसेच त्यांना आवश्यतेनुसार औषधांचे वाटप करण्यात येत आहे. तरी अधिकाधिक संख्येत सफाई कर्मचार्यांनी आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात मनपाद्वारे करण्यात येत आहे.

# रासेयोच्या सहकार्याने ज्येष्ठांसाठी विशेष सेवा प्रकल्प राबवणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :

ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त वतीने ज्येष्ठांना आवश्यक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी ह्यविशेष सेवा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. त्यासंदर्भात नुकतीच एक बैठक पार पडली. या बैठकीला ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भचे सचिव ॲड. अविनाश तेलंग, डॉ. अरविंद शेंडे, प्रा. प्रभुजी देशपांडे, आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. सोपानदेव पिसे यांची उपस्थिती होती. या बैठकीत अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने ज्येष्ठांना विविध प्रकारच्या सोई-सुविधा व सवलती उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. त्या अनुषंगाने ज्येष्ठ नागरिकांनी, त्यांना कोणत्या प्रकारची सेवा हवी आहे हे आपले नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक आदी माहिती ॲड. अविनाश तेलंग (94200 74125) व डॉ. अरविंद शेंडे (98222 00163) यांना पाठवावी, असे आवाहन केले.

# दिवाकर पाटणे ओशोधारा संघ विदर्भ संयोजकपदी

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २६ :

फेटरी येथील आचार्य दिवाकर पाटणे यांची ओशोधारा संघ विदर्भ राज्य संयोजकपदी नियुक्ती करण्यात आली. आचार्य पाटणे यांना संपूर्ण विदर्भातील कार्यकर्ता, पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या आहे. संघाच्या ध्येय धोरणाला अनुसरून कामकाज करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.



# व्यवस्थापकाचा कंपनीला ४२.५२ लाखांचा गंडा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

बनावट बिले दाखवून व्यवस्थापकाने कंपनीत 42 लाख 52 हजार रुपयांची अफरातफर केली. या प्रकरणी सीताबर्डी पोलिसांनी कंपनीचे लेखापाल बद्रीप्रसाद रामनाथ शर्मा (63) रा. नानक सिल्क सोसायटी, स्मृतीनगर, कोराडीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. रवींद्र माणिक महाजन (50) रा. सुमन विहार, भिलगाव असे आरोपीचे नाव आहे. सिव्हील लाईन परिसरात आमदार निवासजवळ वेस्ट फिल्ड सर्व्हीर्सेस या कंपनीचे मुख्य कार्यालय आहे. कंपनीची एक शाखा रायपूरला ही आहे. कंपनीकडून जेसीबीच्या सुट्या भागांची विक्री आणि देखभाल दुरुस्तीची कामे केली जातात. बद्रीप्रसाद शर्मा हे कंपनीत लेखापाल आहेत. आरोपी रवींद्र हा सुद्धा त्याच कंपनीत गत 10 वर्षांपासून व्यवस्थापक आहे. रवींद्रने 1 एप्रिल 2022 ते 31 मार्च 2024 दरम्यान रायपूर कंपनी व मोहित ऑर्थोमूस या दोन कंपन्यांच्या नावावर खोटी बिले दाखवून कंपनीला 42 लाख 52 हजारांचा चुना लावला. त्यांनी सखोल तपासणी केली असता सर्व प्रकार उघडकीस आला.

# चलो ॲपमुळे परिवहन सेवेत सुसूत्रता

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेमध्ये चलो ॲपचा समावेश करण्यात आल्यामुळे प्रवाशांसाठी अनेक गोष्टी सुलभ झाल्या तसेच प्रशासनाच्या दृष्टीने नियंत्रण सहज झाले. चलो ॲपमुळे परिवहन सेवेमध्ये सुसूत्रता आली, असे मत चलो मोबिलिटी प्रा. लि. चे सीनिअर व्हॉइस प्रेसिडेंट श्री. अरूण गिदरोनिया यांनी व्यक्त केले.

चलो ॲपच्या कार्यशैलीबाबत श्री. गिदरोनिया यांनी बुधवारी (ता.२५) मनपा मुख्यालयातील पत्रकार कक्षामध्ये पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी ॲपबाबत सविस्तर माहिती सादर केली. याप्रसंगी परिवहन व्यवस्थापक श्री. गणेश राठोड, परिवहन विभागाचे अधिकारी श्री. विकास जोशी, श्री. अरुण पिंपरुडे, चलो ॲपचे व्यवस्थापक मन यादव, सचिन गाढवे आदी उपस्थित होते.

चलो ॲपवर रिअल टाईम मॉनिटरींग असल्यामुळे प्रवाशांना किती वेळेत बस येणार याची माहिती होतेच शिवाय बसमध्ये उपलब्ध सिटची देखील माहिती ॲपवरून होत असल्याचे श्री. अरूण गिदरोनिया यांनी सांगितले. ऑनलाईन पासेस, ऑनलाईन बस ट्रॅकिंग, ऑनलाईन बस तिकीटींग व यु.पी.आय. द्वारे तिकीट घेण्याच्या सुविधेमुळे प्रवाशांचा बराच वेळ वाचतो.

तिकिटासाठी युपीआय द्वारे पैसे देण्याची व्यवस्था असल्यामुळे सुट्या पैशांची अडचण देखील दूर झाली आहे. याशिवाय डिजिटल प्रणालीमुळे प्रशासनाच्या दृष्टीने देखील नियंत्रणामध्ये सुसूत्रता येत असल्याचे त्यांनी सांगितले.

मागील चार महिन्यापासून नागपूर शहरात आपली बस सेवेमध्ये चलो ॲपचा अंतर्भाव करण्यात आला आहे. या चार महिन्यामध्ये नागपूर शहरातील ४० हजारावर प्रवाशांना चलो ॲप डाउनलोड केले आहे. शहरबस सेवेमध्ये चलो ॲपमुळे प्रवाशी संख्या वाढली व सोबतच महसूल देखील वाढल्याची माहिती श्री. अरूण गिदरोनिया यांनी सादर केली. मागील चार महिन्यात बसच्या तिकीटासाठी डिजिटल पेमेंट पद्धतीचा अवलंब देखील वाढल्याचे त्यांनी सांगितले.

# महात्मा गांधी जयंती व घटस्थापना निमित्त मांस विक्रीची दुकाने बंद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :

महात्मा गांधी जयंती व घटस्थापना दिनानिमित्त शहरातील कत्तलखाने तसेच मांस विक्रीची दुकाने बंद राहणार आहे. या संदभार्तील आदेश मनपाचे घनकचरा व्यवस्थापन विभाग संचालक तथा उपायुक्त डॉ. गजेंद्र महल्ले यांनी निर्गमीत केले आहे. उपायुक्त यांच्या आदेशानुसार, महात्मा गांधी जयंती व घटस्थापनानिमित्त शहरातील कत्तलखाने तसेच मांस विक्रीचे दुकाने बंद ठेवण्यात येणार आहेत. महानगरपालिकेच्या दिनांक ०२ सप्टेंबर २०१८ रोजीच्या स्थगित साधारण सभेतील मंजूर ठरावा अन्वये मा. आयुक्त यांचे दिनांक ०३/०८/२०१८ चे मंजूरी नुसार नागपूर शहरातील सर्व कत्तलखाने व मांस विक्रीचे दुकाने बंद ठेवण्याचे निर्णय घेतलेला आहे.

# अध्यक्षपदी लहु घुघुस्कर तर सचिव खेमराज तितरमारे



■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. २६ :

आंभोरा गोसेखुर्द पाणी उपसा सिंचन योजनेतील जय किसान पाणी वाटप संस्थेचे अध्यक्षपदी लहुजी घुघुस्कर तर सचिवपदी खेमराज तितरमारे यांची सवार्नुमते निवड करण्यात आली.

जय किसान पाणी वाटप संस्थेच्या आयोजित बैठकीत संचालक व अधिकारी मंडळींच्या उपस्थितीत अध्यक्ष व सचिव पदी निवडीचा ठराव मंजूर करण्यात आला. सुचक इस्तारी शेंडे यांच्या सुचनेनुसार रंगराव कुलरकर यांच्या अनुमोदनाने अध्यक्ष लहु घुघुस्कर व सचिव खेमराज तितरमारे यांची एकमताने निवड करण्यात आली.

यापूर्वी लहूजी घुघुस्कर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कुही तालुका कार्याध्यक्ष पद भूषविले आहे. तर खेमराज तितरमारे हे शिकारपूर ग्रा. पं. सरपंच पदी विराजित होते. त्यांना पाच वर्षाचा सरपंच पदाचा व त्यानंतर सदस्य पदाचा दांडगा अनुभव आहे. दोघेही कर्तव्यदक्ष, अनुभवी व मनमिळाऊ स्वभावाचे व्यक्तिमत्व म्हणून प्रचलित आहेत.

प्रसंगी संचालक रंगराव कुलुरकर, इस्तारी शेन्डे, मंदाताई आजबले, रंजना तिरपुडे, तुलाराम घुघुस्कर, प्रभाकर झोडे, पुष्पा भोयर, अधिकारी सहाय्यक अभियंता 1श्रेणी सिध्दार्थ वाहाणे, कनिष्ठ अभियंता कौस्तुभ फंदी, जगदीश गाढवे व गोंडवाना विद्यापीठ प्रतिनिधी रोशन कुजेर्कार, सुचक इस्तारी शेंडे, अनुमोदक रंगराव कुलरकर उपस्थित होते.

सर्वांनी नवनियुक्त अध्यक्ष, सचिव यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. नियुक्तीबाबत तालुक्यातील सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे

# दक्षता जागृती अभियान आणि हिंदी पखवाडा अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २६ :

साउथ सेंट्रल झोन कल्चरल सेंटर, नागपूर, सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार द्वारे "दक्षता जागरूकता अभियान" आणि "हिंदी पखवाडा" अंतर्गत जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.

16 ऑगस्ट ते 15 नोव्हेंबर या कालावधीत केंद्रात "दक्षता जागृती अभियान" साजरे केले जात आहे. 30 ऑगस्ट 2024 रोजी 'क्विझ स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. यामध्ये केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते . 6 सप्टेंबर 2024 रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते . यामध्ये केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना केंद्राचे माजी उपसंचालक व माजी वरिष्ठ लेखाधिकारी मोहन पारखी यांनी दक्षता या विषयावर मार्गदर्शन केले. 13 सप्टेंबर 2024 रोजी, डॉ. रवींद्र कुमार सिंगल, कढ., केंद्राचे माजी संचालक आणि नागपूर शहराचे पोलिस आयुक्त आणि श्रीमती विनीता सिंगल, प्रधान सचिव, कामगार आणि उद्योग मंत्रालय, महाराष्ट्र सरकार. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मार्गदर्शन केले. "दक्षता जागृती अभियान" अंतर्गत, 15 नोव्हेंबर 2024 पर्यंत उपक्रम आयोजित केले जातील.

14 ते 28 सप्टेंबर 2024 या कालावधीत केंद्रात "हिंदी पखवाडा" साजरा केला जात आहे . या अंतर्गत, 24 सप्टेंबर 2024 रोजी, विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, नागपूरचे विशेष अधिकारी (राज्य भाषा) आणि खानिन भारती मासिकाचे माजी संपादक श्री एस . पी. सिंग हिंदी राजभाषा या विषयावर व्याख्यान झाले, ज्याचा केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला. "हिंदी पंधरवडा" या अंतर्गत 28 सप्टेंबर 2024 पर्यंत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# आरोग्य विभाग वर्धा येथे बहुउद्देशीय आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २६ :

मध्य रेल्वे नागपूर विभागाने श्री मनीष अग्रवाल, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) आणि डॉ. जी.एस. मंजुनाथ, मुख्य वैद्यकीय अधीक्षक (उटर) यांच्या मार्गदर्शनाखाली आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, वर्धा यांच्या सहकार्याने 25 सप्टेंबर 2024 रोजी आरोग्य विभाग, वर्धा येथे बहुउद्देशीय आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.




वर्धा कार्यक्षेत्रातील रेल्वे कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या हितासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. 60 कर्मचारी आणि 142 कुटुंबातील सदस्यांसह एकूण 202 लाभार्थ्यांनी विविध वैद्यकीय सेवा घेतल्या. आरोग्य शिबिरात स्त्रीरोग, नेत्ररोग, ऑर्थोपेडिक्स आणि दंतचिकित्सा यातील विशेष सल्लामसलत सोबतच डॉक्टरांकडून सामान्य आरोग्य तपासणी करण्यात आली. अतिरिक्त सेवा जसे की इटक मोजमाप, दृष्टी चाचण्या, यादृच्छिक रक्त शर्करा तपासणी, रक्तदाब निरीक्षण आणि विविध रक्त चाचण्या देखील केल्या गेल्या. आवश्यकतेनुसार औषधांचे वाटप करण्यात आले आणि आवश्यक तेथे पुढील उपचारासाठी विभागीय रेल्वे हॉस्पिटल, नागपूर येथे पाठविण्यात आले.

आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयातील तज्ञांसह मध्य रेल्वेच्या डॉक्टरांच्या नेतृत्वाखालील समर्पित वैद्यकीय व्यावसायिकांच्या पथकाने शिबिर सुरळीत आणि कार्यक्षमतेने पार पाडले. या टीममध्ये डॉ. सुमित गोजे (सीएमपी/नागपूर), डॉ. तेजस आणि डॉ. प्रीती अग्रवाल (डॉक्टर), डॉ. प्रीती गिरडकर (बालरोगतज्ज्ञ), डॉ. रजनीकांत आणि डॉ. यश, डॉ. प्रथमेश काळे आणि डॉ. हर्ष पटेल (ऑर्थोपेडिक्स), डॉ. सुयश सिंग आणि डॉ. संकेत (नेत्रतज्ज्ञ), आणि डॉ. वैशाली आंबटकर आणि डॉ. अदिती ठाकूर (स्त्रीरोगतज्ज्ञ) उपस्थित होते. डॉ.जी.एस. मंजुनाथ, मुख्य वैद्यकीय अधीक्षक/ नागपूर यांनी शिबिराला भेट दिली आणि लाभार्थ्यांना प्रदान केलेल्या उत्कृष्ट सेवा आणि त्यांच्या समर्पणाबद्दल वैद्यकीय पथकाच्या प्रयत्नांचे कौतुक केले. आरोग्य तपासणी शिबिर हे रेल्वे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये आरोग्य आणि निरोगीपणाला प्रोत्साहन देण्यासाठी नागपूर विभागाची सतत वचनबद्धता दर्शवते.

